

१९६७

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २३५२

# गीत ज्ञानेश्वरी

दीक्षित

REFBK-0022470



BARODA

[illegible]

— — — [illegible]

14-1-77

श्री

# गीतज्ञानेश्वरी

( ज्ञानेश्वरी गीत गंगा )

अर्थात्

श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीचें संगीत रूपांतर

गीतकार

आचार्य दत्तात्रेय दामोदर दीक्षित

REFBK-0022470

प्रस्तावना

प. पू. श्री बाबामहाराज जोशी (आर्वीकर)

गुड कम्पॅनिअन्स

प्रकाशक

बडोदें

मूल्य रु. ५/-

श्री

# मंगलाचरण

आज वर्षप्रतिपदेच्या निमित्तानें श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीची ही गेय प्रतिमा गीत ज्ञानेश्वरी आपल्या हातीं देताना मला फार आनद वाटतो. श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरीच्या अठराही अध्यायांचें हें संगीतमय रूपांतर आहे. सुमारे साडेसहाशे वर्षाच्या कालानंतरही ज्ञानेश्वरीचे विविध अविष्कार प्रगट होताहेत, यावरून तिची लोकप्रियता उत्तरोत्तर वाढतच आहे. अशा अमृततुल्य अमर वाङमयाची गीतमाला गुंफण्याचा हा माझा नम्र प्रयत्न आहे. गीतेचा बोध व ज्ञानेश्वरीचें काव्यमय ज्ञानभंडार गीतांच्याद्वारें आपणापुढें मांडावे या हेतूनें मी हा प्रपंच केला आहे. तो कितपत नेटका झाला आहे हें सहृदयीं ज्ञात्यांनीं ठरवावे. गीता ज्ञानेश्वरी मूळ ग्रंथ न वाचणाऱ्यांनाही त्या ग्रंथांतील अध्यात्मिक बोध व आनंद लाभावा व मूळ ग्रंथाकडे व पर्यायानें अेकदरींत अध्यात्माकडे अधिकाधिक जनमानस वळावें हाही त्यांत माझा एक हेतु आहे, तो सफल झाल्यास मला धन्यता वाटेल. ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रेरणेनेंच गीतज्ञानेश्वरीची निर्मिती झाली आहे. बोलाविते धनी तेच आहेत. आमचे कुलगुरु श्रीमद्वासुदेवानद सरस्वती स्वामी महाराजांचाही हा कृपाप्रसादच होय.

या वेळीं मला माझ्या वडील, काका व आत्यांची आठवण साहजिकच होत आहे. माझे वडील कै. दामोदरपंत खडतर तपस्वी व निःसिम दत्तभक्त होते. तसेंच माझे चुलते कै. गोविंदराव व थोरल्या आत्या कै. भागीरथीबाई अत्यंत भाविक होत्या. त्या सर्वांकडून मला जो भक्तीचा वारसा लाभला त्याचेंच गीतज्ञानेश्वरी हें साकार स्वरूप होय. या कार्यात सौ. शालिनीनें व धाकटा भाऊ चि. दिगबर, वहिनी सौ. मंदाकिनी व बहीण सौ. वत्सलेनें सर्व प्रकारें सहाय्य दिलें त्यामुळेंच हें कार्य पार पडू शकले.

अध्यात्मिक वाङ्मयाची भूक प्रत्येक मानवाला असते. या दृष्टीनें गीतज्ञानेश्वरी सर्व आबालवृद्ध गोड करून घेतील अशी मी आशा बाळगतो. भारताचे आधारस्तंभ अशा या युवान बंधुभगिनींना व बालगोपालांना मनोरंजक व बोधदायक असें अध्यात्मिक वाङ्मय सदा हवेंच असतें. गीतज्ञानेश्वरी त्यांची ही गरज भागवील अशी मला आशा वाटतें.

गीतज्ञानेश्वरींतील गीतांना दिलेल्या चाली मात्र सूचक आहेत. अजून मला नव्या नव्या चाली व राग सुचवावेसे वाटतात रसिक गायक भक्त याहीपेक्षां अधिक सुरुचिर चाली लावून गीतज्ञानेश्वरीची गेयता अधिकाअधिक मधुर करू शकतील.

गीतज्ञानेश्वरीच्या निर्मितीमागे माझ्या अनेक सुहृदांच्या व मित्रांच्या प्रेमभावना सामावल्या आहेत. श्री. भैयासाहेब जोशी, प्रा. द. ना. कोकिळ, प्रा. रावसाहेब वाघमारे, श्री. शा. ना. शुके, सद्विचारचे संपादक श्री. तेरेदेसाई, कवि ना. बा. पुराणिक, श्री. धर्माधिकारी, श्री. मो. ना. आठवले बुकसेलर्स, संगीतज्ञ श्री. घाणेकर इत्यादींनी मला वेळोवेळीं ज्या उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे. तसेंच मुद्रक मित्र श्री कृष्णराव मराठे यांचे उपकार मानावे तेवढे थोडेच आहेत. बरीच काळजी घेऊनही पुस्तकात कांहीं दोष राहिले आहत त्याची मला जाणीव आहे. त्याबद्दल सर्वांनी मला क्षमा करावी अशी मी विनंती करितो. माझे दोष माझ्या निदर्शनास अवश्य आणावे व उपयुक्त सूचनाही द्याव्या अशी माझी वाचकास विनंति आहे.

प. पू. श्री. बाबामहाराज जोशी (आर्वीकर) यांनी माझ्या या अल्पशा प्रयत्नाला जी प्रस्तावना लिहली त्याबद्दल मी त्यांचा अत्यत ऋणी आहे.

पार्वती निवास,<br>
काळूपुरा, बडोदें.<br>
वर्षप्रतिपदा १८८९<br>
दिनांक १०-४-१९६७

द. दा. दीक्षित

# प्रस्तावना

गीत-ज्ञानेश्वरी – ज्ञानेश्वरीचे गीतमय प्राकट्य पूर्णतः वा अंशतः भेद नाही. ज्ञानेश्वरी गीतबद्ध करावी एवढीच कल्पना. ज्ञानेश–ज्ञान–ईश लिखीत ज्ञान + ईश्वरी यांत ज्ञानच गीतमय होत असते. ईश्वर प्रेणित ज्ञान-प्राकट्य गीतरूप घेऊन प्रवर्तले. यांत भावना व साहित्य यापेक्षा ज्ञानच साकार होणार. गेयरूप ज्ञान हाच गीत-ज्ञानेश्वरीचा अंतःप्रदेश आहे. अशा गीत ज्ञानेश्वरीचे प्रास्ताविक मी लिहावे, असें कां ? केवळ प्रेम ! कोणाचे ? स्पष्ट ज्ञानेश्वरीचे. या प्रेमामुळेच कदाचित्‌ मी या कामास योग्य असें लेखकांनी ठरविले असावे.

मला आनंद होतो ज्ञानेश्वरी गीतरुप पाहून. अनेक रुपे असतील पण, "गीत" हें जीवनाचे सद्रूप आहे. गीत आहे म्हणूनच जीवन हे संगीत आहे. गीत व जीवन मिळूनच ज्ञान असतें. गीत हे स्वानुभवाचे हृदय स्वरमीलन असतें. अनेक भावांचे क्षेपण एका विशेष परिभागानें प्रत्ययी होते तेव्हां भावानुद्यीलतेला गाढ लहरींची वर्तुळें वेढू लागतात. हळुहळु भावकंपनीय नादकंपने जीवन स्थंडिलावर वर्तुळाकार स्वरांची समातापूर्ण प्रकंपने घेत प्रकट होतात. या क्षमतापूर्ण प्रकंपनांत अंतरांतील अतिसखोल भावांचे मीलन अविर्भूत होते. क्षमतापूर्ण प्रकंपनांतील अनंत भावाचे मीलनाकृती गूजन म्हणजेच 'गीत' होय. जीवनाची अंतरवेधी व बाह्यवेष्ठित कथा म्हणजे 'गीत' होय.

त्यांत काव्य-अलंकार वा व्याकरण (वाङमयाच्या साच्यातील) असेलच असें नाहीं, पण ते काव्य रस्त्यानें छेडलेल्या रुद्रवीणेच्याताराद्वारे तार मंद सप्तकातून सत्‌ निनाद उठवीत असते.

श्री. दीक्षित हें या गीत ज्ञानेश्वरीचे लेखक. प्रेरित झालेली प्रज्ञा प्रसृजित झाली व त्यालाच वरील ग्रंथ निष्पत्ति असे आम्ही म्हणतो.

श्री. दीक्षित हे कवीच्या काव्य-कलेला प्रसवावे या विचारानें स्फूरित झालेले कलाकार नव्हेत तर ज्ञानदेवीच्या आंतर व्यथेनी साकारता प्रसवावी म्हणून त्यांचे काव्य. त्याची आज गरज आहे. ते एक इशप्रेमबद्ध प्रज्ञावान आहेत.

'काव्याचा–प्रसव' ही भावना हा ग्रंथ निर्मितीची जननी नव्हे. मात्र एका भावनाशील चिंतनांतून अभिव्यक्तवलेला हा काव्यमय अनुभव-सुखास्वाद आहे.

ज्ञानेश्वरी व ज्ञानेश्वर द्वय चित्य व वंद्यच. जीवन सार्थतेच्या पंथाचा द्रष्टा व साफल्यतेचे पाथेय म्हणूनच भाविक मनात ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी विहरत असतें.

अत्युच्च स्वास्थ्य लाभ म्हणजेच निरवयव स्वानद. उत्कट दिव्योदात्त आदर्श म्हणजेच निरालंब प्राकटच. स्वानंद व प्राकटच व्यक्तिच्या परिपूर्ण कक्षा आहेत. व्यक्तिचे विशालत्व पूर्ण होताच अत्युच्च स्वास्थ्य व निरालंबन याचे प्राकटच घडते. यास्तवेंच ज्ञानाच्या ईश्वरीचे गायन करायचे ज्ञान हेच एकमेव स्वास्थ्य आहे, व निरालंब प्राकटच आहे. अज्ञान हेच अ–स्वास्थ्याचे कारण. ते मिटावे म्हणून ज्ञानाची ईश्वरी–जननी–ज्ञानेशप्रज्ञा, तिला आळवायचे तिचे आवाहन करावयाचे. असाच एक प्रयत्न श्री. दीक्षित यांनीं केला आहे.

निसर्ग निःसरणशील आहे. ज्ञानेश्वरीची अभंके ही ज्ञान + ईश्वरीचे निसर्गरम्य दर्शन आहे. तेच ईश्वराचे स्वगतसृजन आहे. निसर्ग सृजनशील आहे. ज्ञानेश्वरीची अभंके सृजितात ! सृजन गतीने घडतें गतीत क्रम आहे. नियती आहे. येथेहि तसेंच ज्ञानेश-बालकेहि सृजनाच्या गतीनें क्रमबद्ध आहेत. ज्ञानेशवत्साच्या सृजनगतीचा क्रमबद्ध सोहळा म्हणजेच श्री. दीक्षितांची 'गीत-ज्ञानेश्वरी' होय.

हरिभक्ताची उर्मि – उरमहिमा – हृदयविशालता हरिरुपाचें अनावरण

करण्यासाठींच असतें. विश्वाची मलीनता नाश करावी व यास्तव जगाचे दर्शन जगज्जीवांना घडवावें हाच हरि-भक्तिचा क्रियारुप व्यापार असतो. तो कोण कसा करील हें वेगळें अंतरसंवेदना व्यक्तवण्याचे अनेकविध मार्ग आहेत अतिजवळचा, सत्यप्रकाशाच्छादित मार्ग म्हणजेच गायन होय— गीत होय. गीत-गान गायले व ज्ञानेश्वरीचे अभंक सकंपन चेतनेने प्रबुद्ध झाले. दीक्षितांचे काव्य हे 'काव्याच्या-आत्मा' शोधणाऱ्यांना कळणार नाहीं पण आत्म्याचे मात्र ते अमोल काव्य आहे याची साक्ष ते वाचताच प्रत्ययी होईल.

ज्ञानेशाच्या पुढयांत जे विसावले ते विश्वकांडे उमगल्यानें संतुष्टी पावले. सत्प्रकाश किरणानें सारी धरा सुस्नात आहे हे ज्ञानेश्वरीशी अंत:मनानें रुंजी घालताच कळले. आणि यांतच मानवी जीवनाच्या अनेकविध श्रेणीचा अनुभव एकात्मतेनें बोलू लागतो. यामुळें आत्मज्ञता जीवन वेढूनच प्रकटत आहे, हे प्रबोधन ठरते व अद्वैत संगीत म्हणजे विश्वांर्तगत क्रियोद्-भव ! हें प्रमेय सिद्ध होते.

शब्द ज्ञाना येवढेंच अनंत आहेत. आज्ञानांतून ज्ञानांत येण्याचे सहज सामर्थ्य शब्दांत आहे. अज्ञानही अनंत आहे असें म्हटले जाते पण ज्ञानाचे अभावानें वस्तुत: नि:शब्दता अनंत आहे हें एक सत्य आहे, वास्तवरुप आहे. नि:शब्दता हे शब्दाचे केवळ भान आहे. तथापि नि:शब्दता शब्दाचे आकारानेच धावते व आपली अनंतता सिद्ध करते.

ज्ञेय व अज्ञेय दोन्हींची गांठ शब्दच सोडतो. जे ज्ञेय ते अज्ञेय, व अज्ञेय ते ज्ञेय हें शब्दानें दाखवून दिले आहे. अ–ज्ञेय हे 'अ' चा परमार्थत: विस्तार आहे. ॐ चे प्रथम भाष्य केले ते 'अ' नें. ज्ञेयाचा रहस्य विस्तार म्हणजेच अज्ञेयता. पण ज्ञेय परिव्याप्तिनेंच अज्ञेयता विस्तारते हे अगम्य रहस्य आहे. दीक्षितांनीं याच उपायानें ज्ञानेश्वरी जाणली व तिचे घडलेले रसपान स्वकांतीनें (शब्दानीं) दृग्गोचर होणारच तर ते होऊ दिले, व

' गीत–ज्ञानेश्वरी ' घडली पण ज्ञानेश्वरीच्या कातीनेंच ती सजली आहे. कोणी कांहिहि लिहावें ! ज्ञेयता ही गेयरुप होऊनच लिहिली जाते. असे गद्य गेय नसते हें खरें पण गद्यांतही गेयता खेळू शकते.

गद्य–काव्य हा प्रकार परिचित आहेच. मग श्री. दीक्षित तर काव्यानेंच अनुभव बोलू लागतात. अर्थात् त्या तत्वदर्शनास ' अनेकविध ' संगीत-स्वर–मेळावा ' जोडून ' राग ' रुप दिल्यामुळें ज्ञानेश्वरी सहज व कोठेहि गाता येईल अशी सामान्यासांठी सोय झाली आहे. भजनरुपानें ज्ञानेश्वरी घराघरातून सहज आळवली जाऊं शकेल. सुलभ रचना, उचित शब्दप्रयोग व अर्थवाही संवाद या गुणामुळें दीक्षितांचा हा ग्रथ महाराष्ट्रीयांच्या सामान्य, अतिसामान्य, शिक्षित, अशिक्षित अशा सर्व श्रेणीतून पसरुं शकेल. आज ज्ञानेश्वरी कांही विशेष अवस्थेतच नांदत आहे भावभक्तिने ज्ञानेश्वरी जरी अशिक्षित वाचतात, तरी त्यातील यथार्थ ध्वनीची उकल होणे दुर्लभच. अशा काळांत श्री. दीक्षितांनी महाराष्ट्रीयावर खरोखरच हें उपकार केले आहेत. व ज्ञानेश्वरीच्या विचारापासून वंचित असलेला बहुजन समाज या गीतामुळें सहजच ज्ञानदेवीच्या अनौपम्य वैभवाचा परिचय करून घेऊं शकेल.

काव्यदृष्टया या ग्रंथांत जरी सरसता नसली तरी ज्ञानेश्वरीचें मागल्य पूर्णतः यांत प्रतिबिंबित झाले आहे. उलट ' विशेष गीत ' या सदरात तर लेखकांच्या हृदयाची हळुवारता उघड झाली असून सरळ मने सहजच धर्म प्रवृत्त होतील अशीं त्यांतील विशेष गीतांची रचना आहे.

ज्ञानेश्वरी हा अमृतसागर असेल पण सागराच्या एका चुळीत तोच धर्म आहे कीं जो सागरांत असतो. या न्यायानें श्री. दीक्षितांची 'गीत-ज्ञानेश्वरी' त्याच गुणानें मंडित आहे लेसभरहि अमृताचा धर्म त्यांत कमी नाही.

गायनाचे रुपानें ज्ञानेश्वरीचे तत्वज्ञान मूर्त झाले आहे. कांही गीते तर सरळ सहज उतारली आहेत. हृदयाची वीणा छेडणारे ते ध्वनी आहेत. पैकी थोडेसेच वानगी म्हणून विचारात घेऊं—

प्रथम वाचकांनी ध्यानी घ्यावें कि श्री. दीक्षित हें काव्य निर्मात्याच्या रांकेत बसण्यासाठीं ही रचना करीत नाहीत. काव्य–कला खुलवावी हा त्यांचा येथे मानस नाहीं. तर भोळ्या व सर्व स्थराचे जगतास सहज गात गात ज्ञानेश्वरी कळवून देऊं असाच येथें त्याचा सत्वशील मानस आहे. ते स्वत: निष्ठावंत भक्ताच्या पथावरील पथिक आहेत. काव्यात्मक उत्कंठ वाङमय आविष्कारावे असें त्यांचे मुळी धोरणच नाहीं. कारण तो त्यांचा पिंड नव्हे. ते एक विद्वान सद्भक्त आहेत. सेवा ही त्यांच्या आयुष्याची शिदोरी, असे ते जाणतात. आतां आपण त्यांच्या काव्यप्रतिभेशीं संमुख होऊ व तत्वज्ञानाच्या पायऱ्या काव्यानंदानें सहजच चढता येईल हा अनुभव चाखू. कितीतरी नवशब्दांची रचना त्यांनीं केली आहे. त्यापैकी अ. ३ पा. ४३. विशेष गीत पहा– सहज प्रेरणेचा आविर्भाव प्रथम चरणाद्वारे उद्बोधित होतो. पान ४५ 'घटमाळा' हा शब्द पहा – जन्ममृत्यूच्या साखळीची कल्पना यासांठी 'घटमाळा' हा संयुक्तिक शब्द मोठाच अर्थपूर्ण आहे. 'सूत्रेमणिगणाइव' या सूत्राचा एकशब्दी चमत्कारच नाहीं कां 'घटमाळा' या शब्दांत !

तसेंच पान ४६ —विशेष गीत यांत 'नैष्ठिक शांति' हा शब्द घ्या. शांति हीच शब्दाची परमावधी. पण 'नैष्ठिक शांति' अर्थात ही शब्दधारणा मोठी खोचदार आहे. निरपेक्ष शांतिचे निरालंब स्थान असेच या शांतिद्वारे सूचित होते. मुक्तिचे विज्ञान दर्शन या नैष्ठिक शांति शब्दानें स्पष्ट होते. मुक्ति हा शब्द विज्ञाननिष्ठ आहे. सध्या मुक्तिचा वापर जरी वेड्यासारखा सवंग होत असला तरी मुक्तिचे दर्शन ही भारतीय द्रष्टयांची जागतिक व सार्वत्रिक अत्युच्च दशा होय. अवकाश व काल हेही निसर्गवाद्यांच्या इतिहासांत नियतीनें बंधनांत आहेत. येथें आम्ही असे स्थान शोधले आहे की जे आकर्षण नियती व दाब या पलिकडचे असेल. त्या अवस्थेचा बोधच नव्हे, तर प्रत्यक्ष अवस्था भोगहि येथें द्रष्टयांनीं घेतला आहे. भारतीयांचे परमोच्च प्राप्तव्य मुक्तिच होय हें येवढ्यासाठीच!

कारण तेंच एकमेव निरालंब अनाकर्ष, अद्वैत स्थान आहे. सकळ अत्युच्चता ती तीच. असो. येवढें या स्थळीं मुक्तिबाबत पुरे. शांतिला दीक्षितांनीं नैष्ठिकतेची वसने लेववून मुक्तिच्या रुपास आणले आहे. हें त्याचे शब्दमर्म मला सांगायचे आहे. वाचक ते जाणोत.

तसेंच अ. ११ श्लोक ६ चे गीत वाचतांना एक गंभीर ध्यानमुद्रा प्राप्त व्हावी असा प्रबोधपूर्ण प्रमाद वाचकासमोर येतो. अशी अनेक पवित्र व चित्य स्थानें त्यांच्या या ग्रंथांत समावेशित आहेत.

केवळ वाङमय निर्मिति हा त्यांचा मानस नाहीं; हे आम्ही मागेच सांगितले. केवळ भक्तभगवंताचा मधुर सुखसंवाद जीवासमोर गेयतेची वसने नेसवून व साधी भोळी सुखदा तिचे ठायीं राखून गीत-ज्ञानेश्वरीचे निर्माण घडले आहे. खड्या सरळ व सुटसुटीत शब्दांनीं श्री. दीक्षित यांनीं हें कार्य साधले आहे. हिरमुसलेले जडजीव या सुखस्वादानें उप्लवीत होऊन त्यांची मनोवेल वहरावी, फुलावी आणि जीवनाचा चढ सुखानें चढत ईश्वरासंनिध जीवास जाते करावें हीच या लेखनामागें दीक्षितांची धारणा आहे.

मोठ्या परिश्रमानें गीतरचना. तदंतर त्याला उचित असे ' राग ' रुप देणें इत्यादि गोष्टी मोठ्या कष्टप्रद आहेत पण सेवाभावाने ही कष्टप्रद कामे करून श्री. दीक्षितांनीं मराठी साहित्यास हा ग्रंथ देऊन उत्तम सेवा केली हें निर्विवाद आहे. त्यांच्यासेवेनें महाराष्ट्र वाङमय-देवता निश्चित प्रसन्न होईल. महाराष्ट्र सारस्वताचे हे गायन सकळांनी करावे ही मनिषा.

मोक्षधाम,
माचणूर.

बाबा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. ........

# अनुक्रमणिका


| | | | पुष्ठ |
|---|---|---|---|
| | | गणेशस्तवन | १ |
| १ | अध्याय | अर्जुनविषादयोग | ३ |
| २ | ,, | सांख्ययोग | १२ |
| ३ | ,, | कर्मयोग | २६ |
| ४ | ,, | ज्ञानकर्मसंन्यासयोग | ३६ |
| ५ | ,, | कर्मसंन्यासयोग | ४१ |
| ६ | ,, | आत्मसंयमयोग | ५० |
| ७ | ,, | ज्ञानविज्ञानयोग | ५८ |
| ८ | ,, | अक्षरब्रह्मयोग | ६३ |
| ९ | ,, | राजविद्याराजगुह्ययोग | ६८ |
| १० | ,, | विभूतियोग | ८३ |
| ११ | ,, | विश्वरूपदर्शनयोग | ९२ |
| १२ | ,, | भक्तियोग | ११२ |
| १३ | ,, | क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग | १२० |
| १४ | ,, | गुणत्रयविभागयोग | १४१ |
| १५ | ,, | पुरुषोत्तमयोग | १५५ |
| १६ | ,, | दैवासुरसंपद्विभागयोग | १६९ |
| १७ | ,, | श्रद्धात्रयविभागयोग | १७६ |
| १८ | ,, | मोक्षसंन्यासयोग | १८२ |

2362
दा. क्र. 22800

॥ श्री ॥

# गीतज्ञानेश्वरी.

## गणेशस्तवन.

( राग :—यमनकल्याण किंवा शंकरा त्रिताल. )

हे आदिदेव ॐकार !
गणादिनाथा, वेदवर्णिता,
स्वसंवेद्या आद्यस्वरूपा,
हो तव जयजयकार ॥ धृ० ॥

बुद्धि प्रकाशा, प्रकाशहेतु,
वेदतनू, श्रुतिअवयवयुत तू,
सुंदरार्थ लावण्यखाणि तू,
मंगलमय अवतार. ॥ १ ॥

पुराण अष्टादश मणिभूषण,
ज्ञान सुकुंदन, प्रमेयरत्न,
पदलालित्यहि रंगिन वसन,
शोभे तुज शृंगार. ॥ २ ॥

अलंकार सुंदर जरितार,
काव्य नाटच घुंगुरु पदिं मधुर,
अर्थ घुंघुरूंचा सुमनोहर,
मधुर मधुर झंकार. ॥ ३ ॥

तत्वार्थाच्या सुरत्नमाला,
व्यासबुद्धि ती कटीमेखला,
तेज तिचें कटिवस्त्र नेसला,
शोभा अपरंपार. ॥ ४ ॥

मोदक तो हातीं वेदांत,
खंडित देत असे बौद्धमत,
ब्रह्मवादिकर कल्याणयुत,
विलसे अति साचार. ॥ ५ ॥

धर्महस्त नी विवेक सोंड,
शुभ्रदंत तो सुरसंवाद,
ज्ञानदृष्टि ती नयनें द्वंद्व,
सान सान सुकुमार. ॥ ६ ॥

मिमांसाहि त्या तुझे कर्णद्वय,
अद्वैत गंडःस्थल मदमय,
प्रमेय परवाळें तीं चिन्मय,
करिसी जगदुद्धार. ॥ ८ ॥

अकार चरणें उकार उदर,
मकार मस्तक विलसें शरिर,
त्रिवेणीसंगम शोभे सुंदर,
शब्दब्रह्म ॐकार ! ॥ ९ ॥

## गीतज्ञानेश्वरी.

# अध्याय १ ला.

## अर्जुनविषादयोग.

गीता अ० १ श्लोक १

धृतराष्ट्र वदे :— (साकी)

धर्मक्षेत्रीं कुरुक्षेत्रि त्या समवेता संजया,
युयुत्सु मत्सुत पांडुसुतांच्या लीला वद सखया.

गीता अ० १ श्लोक २ ते ४

संजय वदे :— (साकी)

पांडवसेनाव्यूह देखुनी दुर्योधन आचार्या,
वदे पहा हो भीष्मपितामह पांडवचमुस महा या.
शिष्य आपुला धृष्टद्युम्नच व्यूह तयें हा रचिला,
जणू धावते डोंगरकिल्ले सज्जच कीं समराला.
धनुर्धारि युयुधान द्रुपद ते विराट वीरहि येथें,
भीमार्जुनसम पराक्रमी हे प्रचंडकाय महा ते.

गीता अ० १ श्लोक ५, ६

(चाल :–दत्तदयाळ म्हणति तुजला.)

धृष्टकेतु चेकीतान, काशिराज तो बलवान ॥ धृ० ॥
पुरुजित् कुंतीभोजहि तो, नरपुंगव शैब्यहि दिसतो.
युधामन्यु विक्रान्त महा, वीर्यवान तो उत्तमुजा.

अभिमन्यू द्रौपदि बाळ, महारथी हे प्रतिपाळ.
मंडित योद्ध्यांनीं नाना, अैसी ही पांडवसेना.

गीता अ० १ श्लोक ७ ते ११

( राग :–भूप त्रिताल. )

आतां आपुलें सैन्य पहा,
जें आपण रचिलें स्वयें अहा ! ॥ धृ० ॥

सेनापति हे किति नामांकित
आपण कर्ण कृपाचार्यायुत
अश्वत्थामा विकर्ण शोभत
सौमदत्ति हे वीर महा. १

अन्य कितितरी वीरशिरोमणि
मजस्तव आले पहा रणांगणि
जीवावरती उदार होउनी
युद्धविशारद भयावहा. २

अपर्याप्त बळि सैन्य आमुचें
आपण अभिरक्षित हें साचें
भीमें रक्षित सैन्य तयांचें
पर्याप्तच रणसंगरि या ! ३

सेनापति हो परिसा वचना,
भीष्मांची या आज्ञा माना,
नीट विभागुनि अपुली सैना
रक्षा भीष्मपितामहा. ४

गीता अ० १ श्लोक १२ ते १४

**गीत** ( राग :–भूप. )

परिसुनी वचन दुर्योधनाचे
सिंहनादा करिति भीष्म साचे.
शंख निज फुंकिला
प्रतिध्वनी गाजला
काळभैरव जणू गात नाचे. १

भेरि नौबति झडे,
वीज जणू कडकडे
हृदय ते धडधडे भ्याड त्यांचें. २

देव अर्जुन गुणी
दिव्य रथिं बैसुनी
करिति शंखध्वनी घोर साचे. ३

परिसुनी तो रव
म्हणति ते कौरव
येइ बोलावणें कीं यमाचें. ४

गीता अ० १ श्लोक १५ ते १९

( साकी )

हृषिकेशानें पाञ्चजन्य अन् देवदत्त अर्जुनें,
शंख फुंकिले त्या नादानें दुमदुमलीं त्रिभुवनें ! १

भीमानें निज पौण्ड्र फुंकिला धर्मे अनंतविजया,
सुघोषमणि पुष्पका फुंकिले नकुलें सहदेवें त्या. २

शंखनाद तो तुमुल नादला हादरलीं ब्रम्हांण्डें,
ब्रम्हादिक ही भ्याले, होतीं काळीं कौरवतोंडें. ३

शंखध्वनिनें जणू उघडिलें शौर्याचे भंडार,
विजयश्री मूर्तिमंत करि ती पांडवमनिं संचार. ४

काशिराज ते वीर शिखंडी धृष्टद्युम्न विराट,
अजित सात्यकी अभिमन्यू तो द्रौपदिसुत ही सुभट. ५

सकल महिपती वेगवेगळे शंख फुंकिती घोर,
धरा हादरे गगन कोसळे झाला हाहा: कार ! ६

घोषानें त्या प्रलय मांडिला देखुनिया देवानें,
शंखनाद थांबविला म्हणुनी जगत वाचलें त्यानें. ७

( राग :—देस, त्रिताल. )

कडडड कडाडली धरणी
झाला प्रचंड शंखध्वनि. ॥ धृ० ॥

शृंगें भेरी झर्डति दुंदुभी धमधमधम करुनी,
व्याघ्रसिंहही गुहेंत दडले कापति थरथरुनी. १

भीष्मांनी गर्जना गर्जली, अन्य भटांनीं ती अनुसरली,
कुरुक्षेत्र भूमी ती सगळी गेली दुमदुमनी. २

धनंजयानें देवदत्त अन् पांञ्चजन्य देवें फुंकियला,
महाकाल विक्राळ पातला विश्व सकल कीं—
ग्रासायाला करररररर करुनी. ३

गीता अ० १ श्लोक २० ते ३१

## ( कटाव )

शंखनाद तो यदा थांबला
झाली व्यवस्थित कौरवसेना
महारथी मानावरि येतां
देति स्फुरण ते अन्य भटांना,
सावध व्हा हो, सावध व्हा हो,
युद्धाला हो तयार व्हा ना !
बाणवृष्टि मग करते झाले,
कौरव पांडव भट ते नाना
श्राद्धपक्ष ते होतील नाना
मोद म्हणूनी अन्य भटांना !
देखुनि हें मग घेइ अर्जुन
उचलुनि अपुल्या धनुष्यबाणा,
वदे तदा तो हृषिकेशाला,
" रथा आपुल्या मधेंच न्या ना !
कुणाकुणाशीं मला झुंजणें
उत्सुक अति मी असे जाणण्या
दुष्टबुद्धि हे कौरव नाना
अंगीं बळ तें मुळि नसताना
युद्धाचें अवडंबर करुनी
मिळेल का कधि यश तें यांना ? "
सैन्यामध्यें देव नेउनी

करिती मग ते रथस्थापना,
देव बोलले तदा अर्जुना,
"पहा पहा या भीष्मा द्रोणा
पहा पहा हे कौरव नाना
पहा पहा रे उभयहि सेना!"
अर्जुन पाही आचार्यांना
मामांना निज बंधुसुतांना
पाही पौत्रांना मित्रांना
श्वशुरांना सकलहि सुहृदांना,
पाहुनिया ते स्वकीय नाना
तया मनीं मग उपजे करुणा,
वदे तदा तो वच श्रीकृष्णा,
"रणांगणीं पातले झुंजण्या
पाहुनिया रे या स्वजनांना
गात्रें माझीं शिथिल झालि ना!
कोरड पडली माझ्या वदना,
घाम येइ बघ मम अंगाला
गांडिवही खाली पडलें ना!
शक्त नसे मी उभा राहण्या
बुद्धिभ्रम रे, झाला मज ना!
काय करू मी मला सांग ना!
विपरीतच मज दिसे केशवा
रणांगणीं या हरे माधवा
श्रेय न कांहीं मारुनि स्वजना!"

गीता अ० १ श्लोक ३२ ते ३६

अर्जुन वदे :— ( गजल )

( राग–मांड. चाल :–असे पति देवचि ललनांना. )

नको मजला विजय कृष्णा, नसें राज्याचिही तृष्णा
कायरे अर्थ राज्यांत, भोगमय त्या जीवितांत. ॥ धृ० ॥

जयांस्तव राज्य वांछावें, तेच समरांगणीं यावे
लढायाला मरायाला, प्राणधन तें त्यजायाला. १

गुरु पितरें सुत हि आजे, श्वशुर मामा पौत्र गुणि जे
तसे शालकहि संबंधी, तयां मारीन काय कधीं ? २

अम्हीतर एक गोताचे, कुलाचे रक्तमांसांचे
घोर संहार स्वकुलाचा, स्वहस्तें काय करु साचा ? ३

महापापीच तो व्यक्ति, जगामध्यें स्वकुलघाती
भले मारोत ते मजला, नाहि धरणार शस्त्राला. ४

महीचें वा त्रिलोकांचें, नको साम्राज्य मज साचें
अशा या कौरवा वधुनी, मला रे सौख्य कोठोनी ? ५

मारीतां आततायींना, लागतें पाप मनुजांना
कराया घोर पाप या मला रे धैर्य होईना ! ६

गीता अ० १ श्लोक ३७ ते ३९

अर्जुन वदे :—

(राग :–मांड, चाल :–श्री शिवछत्रपति महाराज.)

कौरव बंधूंना, उचित का वधणें या स्वजना ?
मारुनि रे यांना कसा मी होइन सुखि वद ना ?

लोभी कौरव चित्तभ्रष्ट ते निजहित बघती ना?
कुलक्षयीं मित्रद्रोहिं जरि ते बघति न दोषांना. १

कुलक्षय असें महत्पाप तें समजुनि जनार्दना,
पापसिंधुमधिं वृथा बुडू कां करु का विषपाना ? २

गीता अ० १ श्लोक ४० ते ४६

अर्जुन वदे :— ( राग :–दुर्गा, त्रिताल.)

कुलक्षयांत कुलधर्म नाश रे, अधर्म ग्रासी स्वकुलाला,
अधर्म होतां बहुत कुलांमधिं दोषित होती कुलमहिला. ।।धृ।।

होतो अपसुख वर्णसंकर,
कुलघातक जो रौरवद्वार,
श्राद्धकर्म लोपतें सत्वर,
अधोगतिहि होउनि पितरांची जाति सकल ते निरयाला. १

वर्णसंकराच्या दोषानें कुलजातीच्या धर्माला
मिळे मूठमाती ना तो मग शाश्वत धर्म कुठें उरला ?
होतां कुलधर्मांचा ऱ्हास
नर्कवास त्या मनुजा खास
असें अैकितो जगन्निवास !
राज्यसुखाच्या लोभानें या स्वजना वधु कां सांग मला. २

कुलघाताचें पाप भयंकर साहवे न कल्पना मला.
उचित काय मी तयार व्हावें महत्पाप हें करण्याला ?
शस्त्र टाकिलें खालीं आतां,
प्राणरक्षणाची ना चिंता
शस्त्रधारि कौरव मज वधतां
कल्याणच मज त्यांत गमे रे, वाटे मज हा मार्ग भला. ३

**संजय वदे :—**

**गीत** (चाल :—घटका जाती पळेंहि जाती.)

**असें म्हणुनि तो पार्थ रथामधिं, मायासर्पे दंशियला**
**टाकुनि निज शरचापा खालीं खुशाल शोकाकुल बसला.**

इति श्री गीतज्ञानेश्वरीचा अर्जुनविषादयोग नामें पहिला अध्याय समाप्त.

ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु.

# अध्याय २ रा.

## सांख्ययोग.

गीता अ० २ श्लोक १

संजय वदे :— ( चाल :—नरवर कृष्णासमान. )

नरवर झाला म्लान, राया.
देखुनि स्वकुला, अंतरिं द्रवला;
व्याकुळ झाले प्राण. ॥ धृ० ॥

दंश करी त्या मोहफणीधर
घालवि विष तें फुंकुनि यदुवर
गीतामंत्र महान. १

गीता अ० २ श्लोक २–३

( राग—दरबारी कानडा, त्रिताल. )

घनश्याम घननीळ वोळले. ॥ धृ० ॥

गभीर भाषण मेघगर्जना
दंतप्रभा सौदामिनि माना
अंतरिं गीतामृत भरलें. १

मोहदाह तो कौंतेयाचा
शांत कराया स्वयेंच साचा
बोधवृष्टि करिते झाले. २

**श्री भगवान वदे :—** ( राग :—बागेसरी. )

बलसागर तू वीरशिरोमणि
शोक तुला कां उचित रणांगणीं ?
नाम तुझें रे मात्र परिसुनी
हादरती वीरहि अभिमानी. ॥ धृ० ॥

आर्यत्व तुझें आण निजमनीं
अपकीर्ती तव होइल अवनीं
नरकावा होशील तू धनी
टाक टाक हा शोक तू झणी. १

समर तुझा हा खेळच असुनी
दुर्बलता आठवली कुठुनी ?
मर्दपणा कां गेला त्यजुनी ?
उचल करीं शरचापा फिरुनी. २

**गीत** ( जाति—नववधू. )

कर विवेक कांहीं परंतपा,
व्यामोह उचित कां रणि बापा ? ॥ धृ० ॥

करित नाहि ते पंडित साचा
शोक वृथा रे गतागताचा,
शोकाकुल तू, पांडित्याच्या
मारिसि कां मोठ्या थापा ? १

शरिर जन्मतें शरिरच मरतें
जन्ममरण नाहीं आत्म्यातें
रणांत कसलें नातें गोतें ?
उचित काय इह अनुकंपा ? २

प्राप्त तुला ही संधी नामी,
जाउ न देती क्षत्रियधर्मी,
वीर लढाया सज्ज नेहमीं,
उचल करीं त्या शरचापा. ३

गीत ( राग :–भूप, त्रिताल. )

स्वस्थ कसा तू ऊठ नरवरा
करि रे समरा, करि रे समरा. ॥ धृ० ॥

आठवली अवदशा कुठूनी ?
शोक तुला कां उचित रणांगणि ?
म्हणविसि मोठा वीरशिरोमणि
तुझा दरारा ना अमरां ? १

करीं कंकणें कां ना भरसी ?
नाहीं कां तुज चाड कीर्तिची ?
दिक्कत नाहीं कां स्वर्गाची ?
उचल चाप शर धैर्यधरा. २

युद्ध असें कां नवीन तुजला ?
टाक क्षुद्र या मनदौर्बल्या
ऊठ ऊठ नामर्द कोठला !
पहा मजकडे पहा जरा ! ३

गीता अ० २ श्लोक ४ ते ८

अर्जुन वदे :— ( चाल :–हो प्रसन्न मजवरि. )

भीष्म तथा गुरु द्रोणा
पूजनीय गुरुजना

मारु कसा अरिदमना
वद रे मधुसूदना. ॥ धृ ॥

द्रोण गुरु महानुभाव
मारुनि त्यां भोगु विभव ?
रुधिरभरित भोगाहुनि
भीक बरी, होय ना ? १

संगर या भिक्षाटन
उभयिं काय श्रेयान्
जयाजयीं अज्ञान
विचल करी मन्मना. २

रे, जयास मारून
जगण्याची वांछा न
तेच उभे संगरास
काय करू बोलना ! ३

अज्ञानें दूषित मी
धर्ममूढ झालो मी
श्रेय तेंच सांग अतां
शिष्य मी तुझाच ना ! ४

महिराज्यहि इन्द्रपदहि
शोका या हरु शके न
शोषी जो इंद्रियांस
दाहतसे मन्मना. ५

गीता अ० २ श्लोक ९ व १०

**संजय वदे :—**

भ्रांतचित्त अर्जुन
चाप बाण टाकुन
विनविते दयाघना
' संगरास लावि ना. १

मग प्रसन्न होउन
ते पतीतपावन
समरांगणि आत्मज्ञान
बोधिताति अर्जुना. २

गीता अ० २ श्लोक ११ ते १५

**श्री भगवान वदे :—** ( साकी )

शोक कराया नको तयाच्या शोका कां करिसी ?
प्रज्ञावादी पांडित्याची भाषा कां वदसी ? १

गतागताचा शोक करिति कां पंडित कधिं बा रे ?
जन्ममरण होणें तें मानी भ्रान्तिच अवघी रे. २

तू मी अन् हे सफल नराधिप झालो गेलोही,
होऊ जाऊ भविष्यांतही शंका मुळी नाहीं. ३

देहा बाल्या यौवन वृद्धावस्था येई ती
तशीच देहान्तरप्राप्ती ये धीर न मुळीं ढळती ४

इन्द्रिय विषयांचा संयोगच सुखदुःखात्मक तो,
अनित्य मिथ्या मानुनि त्याला सहन करी तू तो. ५

सुखदुःखीं समधीर भारता भय न मुळीं ज्यासी,
विषय जयाला चलित न करिती तो रे अविनाशी. ६

गीता अ० २ श्लोक १६

( चाल :—मंद मंद लाग सख्या. )

प्रपंच हा असत्य रे, ब्रह्म अेक सत्य रें,
तत्वज्ञानी जाणती, तत्वज्ञान हें खरें. ॥ धृ० ॥

असत्य तें असत्य रे, सत्य नित्य सत्य रे,
असत्य सत्य होइना, सत्य अनृत ना बरें. १

तत्वदर्शि लोक ते, त्यागिती असत्य तें,
सत्यमेव अेक रे, ईश पूजिती खरे. २

गीता अ० २ श्लोक १७ ते १९

( चाल :—धावत येइ अतां, माधवा. )

परमात्मा अविनाशी, पार्था ॥ धृ० ॥

त्रैलोक्याचा कर्ताहर्ता,
नामरूप ना ज्यासी. १

अव्यय त्याचा नाश कधीं रे
होइल कां वद मजसी. २

देह स्वभावें अंतवंत हे,
शरीरधारी नित्यच राहे,
होइ सिद्ध युद्धासी. ३

आत्म्याला कुणि वधू शकेना,
मारि न तो कवणासी. ४

गीता अ० २ श्लोक २० ते २३

( चाल :—अर्जुनको रणभूमि विषे. )

अर्जुनास रणभूमिमधें हरि ब्रह्मज्ञान दे चिरसुखदायी,
तू कोणाचा, कोण तुझे रे अेक येइ जगीं अेक तो जाई. ॥ धृ ॥

जन्महि नाहीं मरणहि नाहीं आदि मध्य ज्या अंतहि नाहीं,
नित्य अजन्मा शाश्वत आत्मा देह पडो तो अमर सदाही. १

जाणुनि घे अविनाशी नित्य अज अव्यय आत्म्यासी सतत,
मारितो न तो कधिं कोणाही, मरत नसे तो जाण कदाही. २

जीर्ण वसन जन टाकुनि देती, नव प्रावरणें धारण करिती,
तेवी शरीरें जीर्ण टाकुनी, नविन धारितो आत्मा पाही. ३

शस्त्र तयाला छिंदु शकेना, अग्नि तयाला दाहु शकेना,
सलिल तया ओलावु शकेना, शोषि न वारा कधिं त्या भाई. ४

गीता अ० २ श्लोक २४ ते ३०

**अभंग.**

अच्छेद्य अदाह्य अक्लेद्य अशोष्य,
सर्वव्यापि नित्य अविनाशी. १

अचल शाश्वत आत्मा स्थीर सत्य,
अव्यक्त अचिंत्य अविकारी. २

जाणुनिया अैसे आत्म्यासी कौंतेया,
शोक अतां वाया करू नको. ३

मान घडीभर आत्मा हा जन्मतो,
तैसाची मरतो शोक वृथा. ४

जन्मला तयाचा मृत्यु तो अटल,
मृत तो जन्मेल निश्चयेंच. ५

घटमाळ ही रे अपरिहार्य पाही,
शोक वृथा भाई करू नको. ६

भूतमात्र सारे आधीं ते अव्यक्त,
मध्यंतरीं व्यक्त होती न कां? ७

अव्यक्तची पुन्हा निधनानंतर,
त्याचा शोकभार वाहसी कां? ८

आत्म्यातें बघती कुणी कौतुकानें,
सांगताति अन्य कथा त्याच्या. ९

अैकताति कोणी कथा अेकचित्तें,
परी न कुणातें आत्मज्ञान. १०

आत्मा तो अवध्य असे सर्व देहीं
उचित न पाही शोक बापा. ११

गीता अ० २ श्लोक ३१ ते ३९

**गीत** ( चाल :—सत्वपालनाविना नाहिं मानवा.
किंवा—भक्तजन सदा. भूप राग. )

धर्मदृष्टिनेंहि सख्या शोक उचित ना.
क्षत्रियास युद्धधर्म अन्य धर्म ना. ॥धृ॥

ईशकृपें स्वर्गाचें द्वार तें खुलें
संग्रामीं आनंदच क्षत्रियामना. १

संग्रामच धर्म तुझा टाळु नको ना !
धर्मकीर्तिनाश घडे पाप तें पुन्हा. २

लोक तुझी अपकीर्ति गातिल बघ ना,
निंदेहुनि मरण बरें सज्जनामना. ३

वीर मानितील भयें सोडिलें रणा
लौकिक जाईल तुझा हर्ष दुश्मना. ४

बोलतील वैरि तुला अनुचित वचना
निजनिंदेसम पार्था अन्य दुःख ना. ५

मरशिल तरि स्वर्गलाभ, जिंकिताच महिराज्य
ऊठ ऊठ कौंतेया झुंज झुंज ना. ६

लाभ हानि जयाजया सुखदुःखांना
सम मानुनि झुंजण्यांत पाप किमपि ना. ७

ऐसा हा सांख्ययोग, कर्मयोगही
परिसुनि घे तोडी मग कर्मबंधना. ८

गीता अ० २ श्लोक ४० ते ४४

अपूर्ण सत्कर्मे, तयांचा अंत न कधि होत.
प्रत्यवाय नाहीं, तयामधि कधि रे तो येत. ।।धृ।।

लघु धर्माचरणें, महाभय टळतें निमिषांत.
स्वकर्म नित्य करी, सांगती पार्था भगवंत. १

कर्मयोगियांची, बुद्धि ती असे अेक ठाम,
ईशपरायण ती, नीतिमय अविचल निष्काम. २

अव्यवसायींच्या, बुद्धिला भेद असंख्य पहा,
वेदवादि रत जे, काम्यकर्मांची करिति स्पृहा. ३

कामी लंपट ते, भोगैश्वर्य वांछितातीं
मरणोत्तरही ती, तयांची स्वर्गावरि दृष्टी. ४

भोगेश्वर्यात, तयांच्या चित्तां आसक्ति,
कधीं न स्थीर मति, तयांची आत्मज्ञानीं ती. ५

सकाम कर्मांच्या, वर्णनीं महा पटाईत.
सुखलोलुप जन ते, जाति नर्काच्या खाईंत. ६

गीता अ० २ श्लोक ४५ ते ५०

( राग–मांड, चाल :–श्रीशिव छत्रपति महाराज. )

वेद त्रिगुणविषयी, होइ तू गुणातीत भाई. ॥ धृ ॥

निर्द्वंद्वी हो सात्विक पार्था करी बुद्धि स्थिर ही,
निर्वाहाची न करी चिंता आत्मवान होई. ? १

स्नान नद्यांचें पुण्य नसें कां मोठ्या जळाशयीं ?
ब्रह्मज्ञानीं वेदफळें तू मुक्तपणें घेई. २

कर्माचा रे तू अधिकारी फलाशेस नाहीं,
कर्मफलाची न धरी वांछा कर्म करित राही. ३

योगि होउनी कर्म करित जा टाक संग दुरिही,
सिद्धी लाभो असिद्धि लाभो समचित्तें राही. ४

काम्यकर्म तें झुगारूनि दे बुद्धियोगि होई,
फलवांछी जन हीन दीन रे समबुद्धि राही. ५

बुद्धियुक्त तो इहलोकांतच विमुक्त झणिं होई,
पापपुण्य या जंजाळातुन विलंब त्या नाहीं. ६

योगमार्ग तो म्हणुनि आदरी समता धरि हृदयीं,
कर्माचें कौशल्य अर्जुना तो योगचि पाही. ७

गीता अ० २ श्लोक ५१ ते ५३

**गीत** ( चाल :–क्षण आला भाग्याचा. )

बुद्धियुक्तची फलासि त्यजुनी
जन्मबंधनातीत होउनी
अव्ययपद तें प्राप्त करोनी
शांति भोगितो योगिशिरोमणि. ॥ धृ० ॥

मोहाच्या पातकांमधूनी
श्रुतिवचनांच्या पाशामधुनी
जाइल बुद्धी यदा सुटूनी
विमुक्त होशिल तदा तूं झणी. १

श्रुतिवचनें मति जाइ भ्रमूनी
आत्मस्वरूपीं स्थिर होऊनी
रत होइल जधिं योगसाधनीं
योगसिद्धि मग तुझीच मानी. २

**अर्जुन वदे** :— गीता अ० २ श्लोक ५४

**गीत** ( चाल :–भरा दरबार सोनेका. )

महात्मा जो स्थितप्रज्ञ, समाधींत सदा मग्न।
तयाचीं लक्षणें सकल, केशवा सांग मज ना रे ! ॥ धृ० ॥
कसा राही कसा बोले, कसा वर्ते कसा चाले ?
षड्गुणैश्वर्यसंपन्ना परब्रह्मा कथी मज रे. १

**श्रीभगवान वदे** :— गीता अ० २ श्लोक ५५ तें ५८

**अभंग** ( राग :–पिलु. )

कामवासना त्यजून, झाला आत्मरूपीं लीन
सदा स्वानंदीं रममाण, तोची जाण स्थितप्रज्ञ. १

मन दुःखीं अनुद्विग्न, स्पृहा सुखाची मुळीं न
राग भय क्रोध हीन, तोची जाण स्थितप्रज्ञ. २

सर्व जीवा दयावान, शुभाशुभीं जो समान
नाहीं हर्ष वा द्वेष न, तोची जाण स्थितप्रज्ञ. ३

इंद्रियांना विषयांतून, आवरी जो कूर्मसमान,
ज्याचीं इंद्रियें स्वाधीन, तोची जाण स्थितप्रज्ञ. ४

गीता अ० २ श्लोक ५९ ते ६१

**गीत** ( राग :–पिलु. )

वासना न शिवे योगिमना. ।।धृ।।

इंद्रियांस निज विषयातून
घेती कोणी आवरून
परी वासना मुळि जाती न
वृथा त्यांचि वल्गना. १

दशेंद्रियें ही अति बलवान
प्रयत्न करुनी होती वश न,
नेती विषयांप्रति ओढून
भल्याभल्यांच्या मना. २

इंद्रियांस जो घे जिकून
होउनिया नित मत्परायण
जितेंद्रिय असा झाला निर्गुण
त्याची स्थिर प्रज्ञा. ३

गीता अ० २ श्लोक ६२, ६३

## अभंग.

जडे विषयध्यानरोग, आणि त्यांतुनि उपजे संग. १
संगें जडे कामविकार, कामें क्रोधाचा संचार. २
जीव पडे संमोहांत, स्मृतिभ्रम होई त्यांत. ३
बुद्धिनाश तदा होत, तोची सर्वस्वाचा अंत. ४

गीता अ० २ श्लोक ६४ ते ६७

( चाल :–भरा दरबार सोनेका )

इंद्रियां चरु दे विषयान्न, राहि पार्था उदासीन,
रागद्वेषासि टाकून, सदा राही सुप्रसन्न. १
व्यथा जाती प्रसादानें, मति स्थिरवे प्रसन्न मनें,
युक्त जें नाहिं बुद्धिमन, शांति सुख त्यास कोठून? २
जसा सिंधूत रे पवन, नाव ती नेइ ओढून,
मनाला इंद्रियें तैशी, भ्रमविती या भवातून. ३

गीता अ० २ श्लोक ६८ ते ७२

( राग :–बहार, त्रिताल. )

जगिं जाण स्थितप्रज्ञ तो
इंद्रियांस विषयांच्या मधुनी
परावृत्त करितो. ॥ धृ० ॥

सकल जिवांची तममय रात
संयमी जागृत असतो तींत,
जेव्हां जागति भूतें, रात
संयमी मानितो. १

जललाभांत जलहानींत
सिंधू मर्यादित तो तृप्त,
कामि अशांत ऋद्धिसिद्धित,
संयमी शांत तो. २

काम वासना जो धिःकारी
निर्गुण निस्पृह निरहंकारी
शांति सुखातें तोचि रे वरी
वांछात्यागि तो. ३

लाभे ज्याला ब्रम्हदशा ही
मोह तया न शिवेच कदाही,
स्मरुनी मजला अंतकाळिंही
ब्रम्हीं लीन तो. ४

इति श्री गीतज्ञानेश्वरीचा सांख्ययोगनामें दुसरा अध्याय समाप्त.

ॐ तत्सत्ब्रह्मार्पणमस्तु.

# अध्याय ३ रा

## कर्मयोग

गीता अ० ३ श्लोक १ ते २

( चाल :–हे प्रभो विभो )

अर्जुन वदे :—

हे जनार्दना, सरल बोध मज दे ना ! ॥ धृ० ॥

कर्माहुनि बुद्धि पर ना ?
या घोर कर्मि मज अधुना,
योजिसि कां मग श्रीकृष्णा ?
वाचवि ना दयाघना ! १

परिसुनी द्विधा तव वचना
मन्मना भ्रांति पडली ना !
साधीन जयें कल्याणा
वद निश्चित त्या वचनां. २

गीता अ० ३ श्लोक ३

(राग :–मांड, त्रिताल. )

श्रीभगवान वदे :—

संशय कां मनिं आला ? पार्था ॥ धृ० ॥

कारण काय तयाला ?
ज्ञानमित्र तव सन्निध दिपतो
दुरविल घोर तमाला. १

या जगदांतरिं उभय मार्ग मी
दावियले मनुजांना. २
ज्ञानमार्ग चिंतकास दिधला
कर्मयोग योग्याला. ३

गीता अ० ३ श्लोक ४ ते ६

( गज़ल )

( राग :–दरबारी कानडा. )

कर्मि त्या चालेच ना रे मानवाची मात्र इच्छा,
कर्म त्यजुनी ना मिळे निष्कर्मता रे जाण पार्था. १
मात्र भगवें धारुनी संन्यासि कां कुणि होइ रे ?
ज्ञानविन सिद्धि कशी बापा मिळे ती वद बरें ? २
कर्म केल्यावीन कोणी प्राणि राहु शकेच ना,
प्रकृतीचे तीन गुण ते लाविती कर्मी जना. ३
जोंवरी या देहिं नाना वृत्ति तैशा वासना,
तोंवरी कर्मे करावीं लागती अवघ्या जना. ४
संयमी जो इंद्रियें परि विषय चिंती अंतरीं,
मूढ मिथ्याचारि मानी तोच रे जगदांतरीं. ५

गीता अ० ३ श्लोक ७ ते ९

गज़ल ( चाल :–तुला घे शाहिरि मुजरा )

मनानें इंद्रियांना जो नियमुनी अर्जुना नित्य,
सदा सत्कर्मि लावी त्या राहुनीया अनासक्त. ॥ धृ० ॥
तोच रे श्रेष्ठ नर मानी जो जळीं कमळवत् राही,
दिसे सामान्य तो वरुनी तयासम वंद्य कुणि नाहीं. १

नियत कर्मे बरी बापा तया निष्कर्मतेहून,
विना कर्मे कशी होई देहयात्राच संपूर्ण ? २

कर्म यज्ञार्थ असतें रे अन्यथा बंधनिय लोकीं,
तरी कर्तव्य कौंतेया करी निष्काम भावें कीं. ३

गीता अ० ३ श्लोक १० ते १३

( साकी )

यज्ञासह ती प्रजा निर्मुनी प्रजापती बोलले,
धर्मानें वागणें हितावह कर्म करावें भलें. १

निजधर्माला यज्ञच मानुनि घ्या त्याची सत्फलें,
धर्माचरणच देवपूजा ती स्वर्गद्वार त्या खुलें. २

सकल देवता प्रसन्न होउनि करितिल तुमचें भलें,
यज्ञपूजका देव देति ते इष्टभोग चांगले. ३

देवाला रे दिल्याविना बघ देवानें जें दिलें,
सेविति जे जन तसेंचि अवघे तस्कर ते जन्मले. ४

यज्ञाचे अवशिष्टसेवि ते पापमुक्त जाहले,
सेविति अन्ना मात्र तृप्तिस्तव पाप तयें भक्षिलें. ५

गीता अ० ३ श्लोक १४ ते १७

( चाल :—दत्तदयाळ म्हणति तुजला. )

अन्न उद्भवी भूतांना, पर्जन्यहि उद्भवि अन्ना. १
यज्ञ उद्भवी पर्जन्या, कर्म उद्भवी त्या यज्ञा. २
वेद उद्भविति कर्मांना, देव उद्भविति वेदांना. ३
कर्ममूर्ति त्या वेदांत, वेदब्रह्म राही नित्य. ४
यज्ञचक्र हें गतिमान, मानव करि ना जो यज्ञ. ५

मान तोचि रे पापात्मा, भोगविलासी लिप्तात्मा. ६
दुराचारि तो उन्मत्त, जन्मा आला तो व्यर्थ. ७
आत्मस्वरूपीं जो मग्न, आत्मज्ञानीं संपूर्ण. ८
संतुष्टच स्वानंदांत, कर्म करुनिही तो मुक्त. ९
सांगति पार्था यदुनाथ, कर्माचा हा मतितार्थ. १०

गीता अ० ३ श्लोक १८ ते २१

( राग :-दरबारी कानडा त्रिताल )

सांगताति श्रीहरी, अर्जुना धन्य तोचि भूवरी. ॥ धृ ॥

आत्मज्ञान रे झालें ज्याला
स्वार्थ मूळींही कर्मी नुरला
पराशाच न धरी. १

कर्मफलाशा त्यजुनी सारी
होउनिया निष्काम अंतरीं
धर्माचरण करी. २

कर्मयोगि जनकादिक ज्ञानी
सिद्धि जयें मिळविलि कर्मांनीं
त्यांना जो अनुसरी. ३

लोकसंग्राहास्तव तू पार्था
कर्तव्यीं राखी तत्परता
बोध धरी अंतरीं. ४

वागति जैसे जगीं श्रेष्ठ जन
अनुसरती त्यां ते जन अज्ञ
त्यास्तव कर्म करी, ५

गीता अ० ३ श्लोक २२ ते २४

( चाल :–भरा दरबार सोनेका )

अर्जुना रे त्रिलोकांत, कार्य कांहीं मला नुरत.
प्राप्य अप्राप्य मज कांहीं, असें कां सांग रे भाई. ॥ धृ ॥

तरी मी आचरी कार्या, लोककल्याण साधाया.
जरी मी कर्म त्यागीन, तसें करितील सर्व जन. १

कल्पना मलाच करवेना, जगाची या तदा दैना!
जरी मी स्वस्थ बैसेन, नाश पावेल प्रजा दीन. २

स्वधर्मी वर्णसंकर तो, तदा होईल मजमुळें तो
जगाचा तोच रे अंत, मीच ना कारणीभूत. ३

गीता अ० ३ श्लोक २५, २६

**गीत** ( चाल:–सत्य वदेवचनाला. )

लोकसंग्रहास्तव या अवनीं
सत्कर्मं ते करीत ज्ञानी. ॥धृ॥
कर्मसांगि अज्ञानि जनांचा
बुद्धिभेद ना होवो म्हणुनी. १
कर्म करो विद्वान निरिच्छ
कर्मसुरुचि प्रेराया सुजनीं. २

गीता अ० ३ श्लोक २७ ते २९

(चाल:–सुजन नच सोडी निज गुणा)

प्रकृति करी कार्ये निज गुणें.

अहंकारि तो विमूढ आत्मा
कर्ता मीच म्हणे. ॥ धृ ॥

गुणकर्मांचे विभाग जाणी
तामस, राजस, सात्विक, ज्ञानी
कर्म सकल गुणलीला मानी
'मम कांहीं न' म्हणे. १

प्रकृतिगुणांनीं मोहित होउन
कर्मासक्तच मूढमती जन
करू नये त्यां चलायमान
सूज्ञें आचरणें. २

गीता अ० ३ श्लोक ३० ते ३२

**गीत** (चाल :–येईगा तु येईगा तु. किंवा भक्तजन सदा सारखी)

अर्पि सकल कर्मं मजसी धरुनि विवेकाला
सोड रे अहंता ममता व्याप तो कशाला ? १

करी युद्ध आतां वीरा त्यजुनि कुतर्कांना
धर्मरक्षणास्तव बापा मार दुर्जनांना. २

आदरेंच स्वीकारी जो माझिया मताला
निस्पृहीच श्रद्धावंत कर्ममुक्त झाला. ३

कर्मपंकिं रे रुतती जे निंदुनी मताला
ज्ञानहीन मूढच ते रे पावती लयाला. ४

गीता अ. ३ श्लोक ३३ व ३४

**अभंग**

प्रकृतिनुसार वर्तताति प्राणी,
आणि तेहि ज्ञानी तैसेची रे. १

चालेना तिथें तो निग्रहाची मात्रा,
व्यर्थ कां शरीरा चोजवीता? २

विषयीं रागद्वेष इंद्रियांचा गुण,
होइ ना आधीन रागद्वेषा. ३
विषयांत सदा राहि रममाण,
जाई तोचि जाण नाशपंथा. ४

गीता अ. ३ श्लोक ३५

गीत ( चाल :–परमकृपाळू ईश्वरा )

निजधर्म सदा श्रेयस्कर रे
जरि असें तयीं वैगुण्य हि रे. ।।धृ।।
परधर्माचे डोंगर सारे
दुरुनि साजरे दिसती रे. १
श्रीमंतांच्या प्रासादाहुनि
गरिब खोपटें तेंचि बरें. २
नटी रुपेरी पडद्यावरिच
दिसती जरि त्या मोहक रे. ३
रूपवती कामा न येति कुणि
कलत्र अपुलें कुरुप बरें. ४
परधर्मच तो असे भयावह
निजधर्मी तें निधन बरें. ५

गीता अ० ३ श्लोक ३६

अर्जुन वदे :— ( चाल :–माझा प्राणसखा जिवलग )

मोठे मोठे पंडित ज्ञानी, रत होती कां पापाचरणीं ?
वांछा नसतानाहि निजमनीं, कोणाची करणी ? १
सर्वसंगपरित्याग करोनी, जाति विजनिं संन्यासि होउनी
पुन्हा पडति संसारिं मोहुनी, ऐसे कां म्हणुनी? २

गीता अ० ३ श्लोक ३७ ते ३८

श्रीभगवान वदे :— अभंग ( राग :–यमन. )

| | | |
|---|---|---|
| अरे काम क्रोध जाण, | जयां उपजवि रजोगुण | १ |
| महा पापी ते खादाड, | जगतवैरी महा द्वाड. | २ |
| ज्ञानभंडाराचे नाग, | विषयगुहेमाजीं वाघ. | ३ |
| काम क्रोध महा ठग, | रुंधताती मुक्तिमार्ग. | ४ |
| अविद्या ती माया भ्रान्ति, | तियेवरी यांची प्रीति. | ५ |
| मानवांचे दोन अरि, | तयां मान यमपुरीं. | ६ |
| रजोपुत्र काम क्रोध, | त्यांचे साथी मोह प्रमाद. | ७ |
| तेच तृष्णाधारस्तंभ, | पसरीती गर्व दंभ. | ८ |
| ज्ञान वैराग्य उपशम, | तयां हाणिति क्रोध काम. | ९ |
| धैर्य संतोष आनंदा, | करीती ते परागंदा. | १० |
| अग्निविना हे जाळीती, | जळाविना बूडवीती. | ११ |
| शस्त्राविना संहारीती, | पाशाविना हे गोंवीती. | १२ |
| काम क्रोधाची ही रीति, | ज्ञानी पंडितही त्यां भीती. | १३ |
| धूम वेष्टीतो अग्नीला, | मल वेष्टीतो भिंगाला. | १४ |
| अल्ब वेष्टीतो गर्भाला, | वेष्टि काम तो ज्ञानाला. | १५ |

गीता अ० ३ श्लोक ३९ ते ४१.

गीतः-( चालः–येई गा तु येई गा तु. किंवा राग पिलु)

ज्ञानाचा तो वैरी, काम, ॥ धृ० ॥

अग्निसम सर्व फाकी, कांहीं राखीना तो बाकी
ज्ञान तेहि झाकुनि टाकी, त्याची बलिहारी. १

इंद्रियांत बुद्धिमनांत, वसे काम तो सुखांत,
तेचि तया सहाय्यभूत, मोहि जिवापरी. २

जितेंद्रिय होई तू रे, ज्ञानरिपू पापी क्रूर.
कामा करी त्वरें ठार, सांगती मुरारि. ३

गीता अ० २ श्लोक ४२ व ४३.

**अभंग** (चालः—धांवत येइ अतां सारखी)

परेंद्रियें तनुहून, तयांहून पर मन, १
बुद्धि पर मनाहून, आत्मा पर बुद्धीहून. २
बुद्धिनें हें घे जाणून, करी आत्मसंयमन. ३
अजित कामारीलागून, घेई खुशाल जिंकून. ४

## अध्यायसार : विशेषगीत.

**श्रीभगवान वदे :—** (राग—मांड.)

कर्म तर कर्मा लागलें
पाटच्यांवरि पुजिले. ॥ धृ० ॥

कर्माविन कुणि राहु न शकत,
कर्मचारि साधे परमार्थ,
कर्म त्याग करणे तें व्यर्थ,
पद्मनाभ बोलले. १

इंद्रियभोगा चिंतित राहुनि
कर्म करित ना मुळि जे कोणी
मिथ्याचारी ते मानूनी
दूर राखणें भलें. २

कर्म करी निजधर्मप्राप्त,
हाच मार्ग जगिं मानी उचित,
होउ नको कर्मीं आसक्त.
मग बंधन कुठलें ? ३

अनासक्त होउनिया तूंहीं
कर्तव्याला करितचि राही
तरीच मी रे प्रसन्न होई
काय तुला पटलें ? ४

चित्त ध्यानमय करि संपूर्ण
आशाममतारहित होउन
सर्व कर्म करि मला समर्पण
हितगुज तुज कथिलें. ५

संसार महायज्ञ खरोखर,
उन्नति त्यांतच असे निरंतर,
दानाविन सुख भोगिति जे नर,
तस्कर ते जन्मले. ६

परधर्माहुनि पार्था जाण
श्रेयस्कर निजधर्माचरण
धर्मांतर दुर्मतिच भयाण
स्वधर्मि निधन भलें. ७

कदा नावरे जरि हा काम,
करि वश त्या तू होउनि ठाम,
इंद्रियांस घालुनी लगाम,
कामा जिंकि बळें. ८

इति श्री गीतज्ञानेश्वरीचा कर्मयोग नामें तिसरा अध्याय समाप्त.

ॐ तत्सत्ब्रह्मार्पणमस्तु.

# अध्याय ४ था

## ज्ञानकर्मसंन्यासयोग

गीता अ० ४ श्लोक १ ते ३

**श्रीभगवान वदे** :— (राग–यमनकल्याण, त्रिताल)

लागे हृदयीं हुरहुर, पार्था. ॥ ध्रु ॥

कर्मयोग तो तुज सांगाया झालो अतिशय आतुर,
हाच योग मी पूर्वी कथिला, त्या सूर्याला, सूर्यें मनुला,
मनुनें दिधला इक्ष्वाकूला, कालें हरिला नंतर. १

गीता अ. ४ श्लोक ४

**अर्जुन वदे** :— ( राग :–दरबारी कानडा )

जन्म तूझा वर्तमानीं, सूर्यजन्म पुरातन,
योग कथिला तूं कसा त्या, सांग रे करुणाधन. १

गीता अ० ४ श्लोक ५ ते १७

**श्रीभगवान वदे** :— (चाल:–तोच चंद्रमा नभांत.)

अनेक जन्म जाहले, आपुले जगांतरीं
मीच जाणतों तया, विसरलासि तू जरी. १

जन्मरहित मी खरा, भूतमात्रईश्वर,
वश करोनी प्रकृतिला, प्रगट होइ भूवरीं. २

धर्मग्लानि ती यदा, अधर्मवृद्धि होतसे
परमधाम सोडुनी, अवतरे धरेवरी. ३

साधूजनरक्षणा, दुर्जनसंहारणा,
धर्मस्थापनेस्तव, अवतरे युगांतरीं. ४

दिव्य जन्मिच्या कथा जाणति जे सात्विक,
जन्म फिरुनि ना तयां, वसति ते मदांतरीं. ५

जो मला जसा भजे, मीहि त्या तसाच रे,
वर्ततोच मी जसा, भक्त मजसि अनुसरी. ६

वांछुनी मनोरथा, भजति अन्य देव जे
सिद्धि प्राप्त होइ त्यां मी न लभ्य रे परी. ७

चार वर्ण भागले, कर्म गुणा देखुनी,
करुनि पुन्हां मोकळा, मी न कांहि रे करी. ८

लिम्पती न कर्म ते, मला कधीं नसे स्पृहा.
जाणताति जे जन, कर्ममुक्ति त्या खरी. ९

मुमुक्षु सर्व पूर्वज, यथा जगांत वर्तले,
तसाच वर्त रे सख्या तू हि या भवांतरीं. १०

कर्म जाण तू सख्या अकर्म तेहि जाण रे,
निषिद्ध कर्म जाण तू, गहन कर्मगति खरी. ११

## विशेषगीत

( राग :–हंसध्वनि. ताल :–दादरा
चाल :–झाले युवतिमना किंवा राग :–यमन कल्याण )

पार्था जगीं यदा धर्मग्लानि होतसे जरी,
आणि अधर्महि तो जनतेवरि राज्य जधि करी,

अवतरि मी, वसुधेवरि
साधूजन परित्राणा, दंडण्यास दुर्जना
धर्मस्थापनेस्तव, संभवे युगांतरीं. १

गीता अ० ४ श्लोक १८ ते २२

( राग–मांड. धुमाळीं )

गुजगोष्ट सांगतो तुज सुमते
जन कर्म करुनि ही मुक्तच ते. ॥ धृ ॥

कर्मि अकर्मा अकर्मि कर्मा, बघती जे धीमंत महात्मा
करिती जरि ते सकलहि कर्मा, नाहि तयां मुळि बाधक ते. १
कर्मे ज्यांची कामाविरहित, संकल्पहि लवलेश न ज्यांत,
तयां ज्ञानिही म्हणती पंडित, निष्कामी जन वंद्यच ते. २
कर्मफलांच्या संगा त्यजिले, संतत तृप्त निराश्रयि झाले,
कर्मामधि जरि रत ते असले, परी तयांमधि लिप्त न ते. ३
वश केले रे तनमन ज्यांनीं, भोग त्यागिले सकलहि मानी
आवश्यक जीवनालागुनी, कर्मा आचरती जरि ते. ४
यदृच्छालाभें संतुष्ट, द्वंद्वातीत मत्सररहित,
समान सिद्धित आणि असिद्धित, कर्म फलेच्छा ज्यां नसते. ५

गीता अ० ४ श्लोक २३ ते ३२

( राग :–भूप, त्रिताल. )

विविध यज्ञ हे पहा पहा. ॥धृ॥

ब्रम्हयज्ञही देवयज्ञही, याज्ञिक करिती महा महा.
संयमि करिती इंद्रियहोम, इन्द्रियांत विषयांचें भस्म,
योगाग्नित कुणि जीवनकर्म, करिती प्रेमें स्व : स्व : १

द्रव्ययज्ञही तपोयज्ञही, स्वाध्याय ज्ञानयज्ञ तोही,
करिती अविरत निःसंदेही, यज्ञ सूज्ञ ते महा महा. २

करिती कोणी प्राणायाम, जाणुनि याज्ञिक यज्ञमहात्म्य,
यज्ञें पापा करिती भस्म, व्रतवैकल्यें करुनि अहा! ३

ज्ञानामृत लाभे यज्ञांतीं, योग्यां होते भगवत्प्राप्ति,
यज्ञरहित पुरूषातें शांति, लाभते न ती कुठें पहा. ४

वेदकथित हे विध विध यज्ञ, जाणुनि घे सखया संपूर्ण,
संसाराच्या बंधनातुन, मुक्तिस्तव निष्काम रहा. ५

गीता अ० ४ श्लोक ३३ ते ४२

( गज़ल )

( राग :–दरबारी कानडा. )

ब्रम्हज्ञानीं सर्व कर्मे पावती विश्राम तो,
सर्व यज्ञाहूनि म्हणुनी ज्ञानयज्ञच श्रेष्ठ तो. ॥ ध्रु ॥

साधुसंतां नमन करितां नम्रभावें सेवितां
प्रश्न पुसतां तत्वदर्शी ज्ञान देती बोध तो. १

ज्ञान होतां मोह डोहीं फिरुनि कधिं कुणी ना बुडे,
होऊनी मद्रूप पाही सर्वभूतीं ब्रम्ह तो. २

सर्व पाप्याहून पापी तू जरी असशील रे,
पापसिंधू तरुनि जाशिल ज्ञाननौकेनेंच तो. ३

प्रज्वलित वन्ही जसा करि इंधनाचें भस्म तो,
सर्व कर्मे भस्म करितो ज्ञानरूपीं अग्नि तो, ४

ज्ञानसम रे शुद्धिकर्ता अन्य कोणी नाहिं तो,
ज्ञान ऐसें प्राप्त करितो योगिजनसमुदाय तो. ५

अज्ञ श्रद्धाहीन देही संशयात्मा नाशतो,
संशयी इहलोकिचें परलोकिचें सुख गमवितो ६

कर्म देवा अर्पितो अन् संशया दुरि सारितो,
कर्मबंधनमुक्त होतो प्रभुपरायण पुरुष तो. ७

संशया अज्ञानमूलक ज्ञानखड्गें छेदुनी,
हो उभा युद्धास पार्था, काय आतां पाहतो ? ८

इतिश्री गीतज्ञानेश्वरीचा ज्ञानकर्मसंन्यासयोग नामे चौथा अध्याय समाप्त.

ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु.

श्री. ग्रंथालय
रा. क्र.



# अध्याय ५ वा

## कर्मसंन्यास योग

गीता अ० ५ श्लोक १

अर्जुन वदे :— अभंग

कर्मसंन्यासा वानिसी, कर्मयोगा प्रशंससी. १
श्रेयस्कर उभयांत, सांग ना मज निश्चित ! २
तुझा अज्ञ दास पार्थ, मज ना कळे गूढार्थ. ३
करी हरी माझी कीव, सुलभ मार्ग मज दाव. ४

गीता अ० ५ श्लोक २ ते १२

श्रीभगवान वदे :— साकी

मोक्षप्रदचि रे उभय मार्ग ते कर्मयोग संन्यास,
संन्यासाहुनि कर्मयोग परि असे विषिष्ठच खास. १

द्वेष न करितो निराभिलाषी संन्यासी तो जाण,
निर्द्वन्दी तो मुक्त होइ संसारबंधनातून २

सांख्ययोग अन् कर्मयोग ते भिन्न पंडिता नाहीं,
अनुष्ठान ते अेकाचेंही उभय फलातें देई. ३

स्थान मिळें जें सांख्या तेंची योग्यां होतें प्राप्त,
सांख्य योग जो अेकचि पाही दृष्टा तोची खचित. ४

कर्मयोगविन संन्यासामधिं दुःखच रे अनिवार,
योगयुक्त मुनि संन्यासातें त्वरित ग्रही साचार. ५

योगयुक्त तो शुद्धात्मा तो जितेंद्रियहि विजितात्मा,
सकलहि भूतांचा तो आत्मा कर्म करुनि मुक्तात्मा. ६

अहंकार मुळि नुरला त्याला कर्तृत्वाचा कांहीं,
शरीरधारी जरि तो कर्में करितो जाण सकलही ७

अशन शयन नी पान हि करितो पाहे स्पर्शे ऐके.
गमनहि करितो वासहि घेतो श्वासोश्वासहि नाकें. ८

मलत्यागा करि बोले चाले ग्रहण करी तो ग्रास,
नयनांना तो उघडि झाकि परि कर्तापण ना त्यास. ९

त्यजुनि फलेच्छा कर्में करि तो ब्रम्हार्पणबुद्धीनें,
जळकमळासम कधीं न होई लिप्त कर्मजाळानें १०

टाकुनिया दे कर्मसंग तो त्यजी अहंकाराला,
काया वाणी मन बुद्धी अन् इंद्रिय व्यापाराला. ११

करितो योगी कर्माचरणा कर्तापण ते त्यजुनी,
निष्कर्मच तें त्याचें होई मुक्तच तो रे ज्ञानी. १२

योगी टाकुनि कर्मफलातें भोगी नैष्ठिक शांति,
अयुक्त कामी फलासक्त त्या बंधनेंच प्रिय गमती. १३

गीता अ० ५ श्लोक १३

( चाल :—लोटु नको मज दूर कन्हैया. )

योगि अर्जुना तोचि जाण
मनसा कर्में संन्यासून
देहाच्या नवद्वारपुरींत
राहि सुखें निष्कर्म होऊन. ॥ धृ० ॥

पडे जिथें मग त्याची दृष्टी
होई सुखमय अवघी सृष्टि
शब्द निघे जो तया मुखातुन
मानि तोचि बोधामृतवचन. १

देहीं त्याचा वास असून
अहंभाव अवघा टाकून
कर्में करि तो जरी खुशाल
कुठलें त्याला कर्मबंधन? २

## विशेषगीत

( राग :–बहार, त्रिताल. )

श्रीभगवान वदे:—

जळिं कमळासम राही,
शरीरव्यापारा चालू दे त्यामधि तू नाहीं. ॥ धृ० ॥

द्वेष वासना द्वंद्व न मुळि ही,
संसारी जरी वर्तत राही
संन्यासिच तो मानुनि घेई,
बंधन त्या नाहीं, १

सांख्य कर्म पंडिता अभिन्न
अज्ञानी ज्या मानिति भिन्न
अेक योगि त्या स्थिर राहून
उभय फला घेई. २

कर्मयोग संन्यासयोगही
भगवद्धामा नेती द्वयही

अेक दृष्टि जो उभया पाही
तोची खलु पाही: ३

संन्यासी अति क्लेश साहुनी
करिति साध्य मत्पदालागुनी,
योगयुक्त तो सहजच मानी
मिळवी लवलाही. ४

विशुद्ध आत्मा योगि जितेन्द्रिय
भजतो मजला भूतमात्रमय
प्रपंच करुनी ही तो निष्क्रिय
लेप तया नाहीं. ५

इन्द्रियांस विषयांत रमू दे,
शरीरव्यापारा चालू दे,
ब्रम्हार्पण कर्मा करूनि तू
मुक्त क्षणी होई. ६

गीता अ० ५ श्लोक १४ व १५

( राग:-दरबारी कानडा, त्रिताल. )

निर्मो ना कार्ये सर्वेश्वर
कर्तृत्वहि सृजिना विश्वंभर ॥ ध्रु० ॥
उदासीन श्रीहरि जगदीश्वर,
कर्ममुक्त तो जाण निरंतर. १
कर्मफलाच्या संयोगातें
निर्मो ना मी प्रभु जगदीश्वर. २
स्वभावेंच तो माये करुनी
प्रवर्ततो अवघा संसार. ३

पाप पुण्य तें कोणाचेंही
घेई ना प्रभु निज माथ्यावर. ४

अज्ञानें आवृत्त रे ज्ञान
मोही जीवातें साचार. ५

गीता अ० ५ श्लोक १६

( चाल :—क्षण आला भाग्याचा. )

ज्ञानोदय होतां, चित्तीं
विवेक तोही होय जागता. ॥ धृ ॥

ज्ञानाची ती प्रभात मान, सकल दिशा मग प्रकाशमान
अज्ञानाचा गाढ तिमिर तो, न दिसें कोठें त्रिभुवनि पार्था
भेट तदा परब्रम्ह अनंता. १

गीता अ० ५ श्लोक १७ ते १९

(राग :—सोहनी, त्रिताल, किंवा चाल :—बघ अेका सुमनांत)

मुक्तच योगी जाण, सदा ते. ॥ धृ ॥

आत्मा ईश भजनिं तल्लीन, निष्ठा देवामाजीं पूर्ण,
ईश परायण सेविति मौन, बुद्धि ब्रम्हि रममाण. १

आत्मज्ञानें पाप धुवून, जन्ममृत्यु घटमाळेतून,
सुटले असंगि ते होऊन, उदासीन विद्वान. २

ब्राम्हण ज्ञानविनयसंपन्न, धेनु हस्ति चांडाळहिं श्वान,
निशिदिनिं ब्रम्हबुद्धि राखून, पंडित बघति समान. ३

योगी साम्यस्थितमन जाण, प्राणिमात्र त्या सर्वसमान,
श्रीरंगहि रंगले गाउन, योग्यांचे गुणगान. ४

## विशेष गीत ( राग दरबारी कानडा )

सकल सुकर्म करी, योगी, असंगि संत परी. ॥ धृ० ॥
कर्मफला देऊन तिलांजलि, नैष्ठिक शांति वरी १
कर्मफलाच्या घोर कर्दमीं, रुते अयोगि परी. २
सर्व कर्म संन्यासुनि मनसा, सांख्ययोगि तो मन्मयि स्थिरसा,
तनुनवद्वारपुरीं. ३
पडलें ज्ञानाज्ञानावरण, मोहित जीव तरी. ४
अशा जीवांचें पाप नि पुण्य, ईश न मुळिं स्विकरी. ५
ज्ञानें यत् अज्ञान नाशिलें, त्याचें रविसम ज्ञान तें भलें,
प्रकाशवीत हरी. ६
अर्पिलि मज मन बुद्धि निष्ठा, पुनरावृत्ति न त्यासि क्लिष्टा,
कधीं न त्यांना हाल अपेष्टा, वसती मदांतरीं. ७
पंडित तोची ज्ञानें नमला, द्विज गो हस्ति श्वान चांडाला
समदृष्टीनें पाही सकलां, मी तच्चरण धरी. ८
संसाराचा बेडा पार, केला राखुनि सम निज अंतर,
परब्रम्ह पावले निरंतर, गंगासिंधुपरी. ९

गीता अ० ५ श्लोक २० ते २१

( राग :—शंकरा त्रिताल. )

प्रिय प्राप्तिचा ज्या हर्ष ना, अप्रिय ज्या दुखवीच ना ॥ धृ० ॥
स्थिरबुद्धि तो, ब्रम्हज्ञ तो,
समदृष्टि तो, परब्रम्ह तो,
वानू किती त्याच्या गुणा. १

विषयाहुनी राही दुरी,
राही सुखी निज अंतरीं,
ब्रम्हार्पण करि जीवना.

गीता अ० ५ श्लोक २२

( चाल :—बहुरूपी हा जीव प्रवासी )

विषयीं सुख नाहीं, नाहीं,
आदि अंत विषयांना राही
क्षणभंगुर त्या विषयसुखामधिं
बुध न रमति कधिंही ॥ धृ० ॥

मंगलग्रह तो नांवाचाच
कधीं न मंगल करितो साच,
मृगजल भागविना कधिं प्यास,
नागफणी कां छाया देई? १

गीता अ० ५ श्लोक २३

## अभंग.

देहपतनापूर्वीच, कामक्रोधाच्या वेगास १
साहण्यासी जे समर्थ, नर तेची योगयुक्त. २
बाह्यविषयभोगत्यागी, सदा आत्मसुखीं रंगी. ३
अहंकार जयां नाहीं, आत्मरंगी ते सदाही. ४
द्वैतभावनेचा लोप, करुनि होती सुखरूप. ५

गीता अ० ५ श्लोक २४, २५

## अभंग

सदा सुखी अंतरांत, आत्मस्वरूपीं जे स्थित. १
जया चित्तीं प्रकाशित, सदा दिव्य ब्रम्हज्योत. २

तेची ब्रम्हरूप शांत, ब्रम्हनिर्वाणा पावत. ३
झालीं कल्मषें ती क्षीण, द्विधाभाव जाइ विरून. ४
सर्वभूतहितीं रत, ब्रम्हनिर्वाणा पावत. ५

गीता अ० ५ श्लोक २६ ते २८

### अभंग

झाले कामक्रोधरहित, केलें स्वाधीन जें चित्त १
आत्मरूपा जे जाणती, ब्रम्हनिर्वाणा पावती. २
जितेपणीं मरणोत्तरही, तयां लाभे ब्रम्हदशा ही. ३
करुनी मना उपराम, झाले कैवल्याचे धाम. ४
विषयांना सारुनि दूर दृष्टि भ्रुकुटीं करुनी स्थीर. ५
आणि वायू प्राणापान, प्राणायामें समवून. ६
बुद्धि इंन्द्रियें नी मन, राखोनीया त्या स्वाधीन. ७
तेंसे इच्छा भय क्रोधा करिती नष्ट जे सर्वदा. ८
मुनि मोक्षपरायण, तेची योगी मुक्त जाण. ९

गीता अ० ५ श्लोक २९

( राग :–बिहाग, त्रिताल. चाल :–वेध तुझा लागे सतत मनीं. )

यज्ञतपाचा भोक्ता मीच
सकलहि लोकमहेश्वर साच. ॥ धृ० ॥

सकल जिवांचा सुहृद् सखा मी,
जाणुनि मजसी असा नेहमीं
शांति पावली योगी तेच. १

योगमार्ग तो अवलंबून
यमनियमांना सांभाळून
योगाभ्यासा नित्य करून
होती योगी ब्रम्ह खरेच. २

### विशेषगीत (गज़ल)

हर्ष ना प्रियप्राप्तिचा ज्या अप्रियाची खंत ना,
संशयातित ब्रम्हवेत्ते भक्त नित्य स्थित मयीं. ॥ धृ० ॥

योगि जे आसक्तिरहित मत्त भगवद्भूर्जानिही
ब्रम्हयोगी युक्त आत्मे पावती सुख अक्षयीं. १

विषयभोगच दुःखकारी आदि अंत असे तयां,
मृगजलासम ते असत्य, बुध न रमती त्यांमयीं, २

आत्मस्थित जे आत्मश्रांत आत्मज्ञानी योगीही
पावती ते ब्रम्हभूत ब्रम्हनिर्वाणासही. ३

पाप संशय धुवुनि गेले, लोककल्याणीं रत,
पावती ते ब्रम्हभूत ब्रम्हनिर्वाणासही. ४
कामक्रोधा सांडिले जें आत्मचित्ता जिंकिलें
पावती ते आत्मविद रे ब्रम्हनिर्वाणासही. ५

विषयभोगा त्यजुनि प्राणपान वायु निरोधिले
बुद्धि मनसा मोक्षलक्षी मुक्त संसारांतही, ६

यज्ञतपभोक्ता मला रे, सर्वलोकमहेश्वरा,
सर्वभूतांचा सुहृद् जे जाणती अन् भजतिहीं,
भक्त नित्य स्थितमयीं, ७

इतिश्री गीतज्ञानेश्वरीचा कर्मसंन्यासयोग नामें पांचवा अध्याय समाप्त.

ॐ तत्सत्ब्रम्हार्पणमस्तु.

# अध्याय ६ वा

## आत्मसंयमयोग

### प्रास्तविक अभंग १

(चाल :—कशी छंद लावी ललना सारखी)

अहा ! अध्याय सहावा, बुद्धियोगाचा हा ठेवा, १
येथें शद्धाशद्धातून, ब्रम्हरस झरे पूर्ण. २
सकलही इन्द्रियें तीं, पहा स्पर्धा कीं करितीः ३
ज्ञानभूक शमवाया, सेवुनि सहाव्या अध्याया. ४
घेति शद्धाशद्धातून, मोक्षरस परिपूर्ण. ५

### अभंग २. ( चाल :—वरील )

गीतारस सेविण्याचें, काम नाहीं कामीयांचें. १
इथें हवे निष्कामीच, आत्मज्ञानाची ज्यां आच. २
जयें निज संसाराला, ओवाळीले परब्रम्हाला. ३
तोची जाणे याची रुचि, परां गमे परगांवची. ४
नमूनीया ज्ञानेशातें आरंभीतो अध्यायातें. ५

### भजन. (चाल : वरील सारखी)

बोला गोविंद, लागु द्या विठूचा छंद,
भक्तमंडळी भजन करा हो टाकुनिया द्वंद्व. १
टाळ मृदंग झांजा झण झण करा मंजु नाद. २

भक्तिरसामृत गोड गोड हो घ्या त्याचा स्वाद. ३
हरिविन अपुली सांगा कोण घेइल जगिं दाद. ४
दिसे न ज्या विश्वीं विश्वंभर ते जन मतिमंद. ५
प्रेम शांति सुख भक्तांलागी दे निजसुखकंद. ६
हरिभजनीं तल्लीन रहा हो घ्या हा मतिबोध. ७

**प्रास्ताविक गीत** (चाल :–वद घनश्याम श्रीराम, ममात्माराम)

मग बोलति यदुराया, कौंतेया,
रे, पार्थ सख्या तुज गौप्य सांगतो तुजवरि मम माया ॥ धृ० ॥

उचलितो चराचरभार
नी शमुनी होतो चूर
हें माझें शिणलें शीर
रे, तुजविन टेकू उरीं कुणाच्या सांग प्राणसखया. १

माहेरीं जाते बाळी,
मातेच्या अंकीं लोळी
करि हृदय खुलें तिजजवळी,
रे, अर्भक मी तुजविना कुठें वद उकलू मम हृदया. २

मागतो अेक मी तुजला
दे चित्त तुझें रे मजला;
तुज कथिन योगविद्येला;
ती परिसुनिया संसारसमरिं या प्राप्त करी विजया. ३

उद्धरि तू निज, आत्म्याला,
त्या नेउ नको अवनतिला,
रे मान सत्य या बोला,
ते बंधू रिपू आपणाचि आपुले जशी वृत्ति मनिं या. ४

युद्धाचा असा प्रसंग !
निज कर्तव्याला जाग,
मोहाचा करूनी त्याग
दे टाकुनि मजवरि सर्व भार रणिं झुंज धरुनि धैर्या. ५

गीता अ० ६ श्लोक १ ते ६

**गजल** ( चाल :–चित्तीं तुलाच ध्याते. )

सांडोनिया फलाशा, कर्मे करील कोणी
संन्यासि योगिही तो, होता न मात्र मानी. ॥धृ०॥
संन्यास योग दोन्ही, रे अेक मानी ज्ञानी,
संकल्प ते धरोनी, योगी न होति कोणी. १

रे साधकास कर्मी, निष्कामभाव हेतु,
योगारूढास शम तो, हेतू असे परंतु. २

रें, उद्धरी निजात्मा, नच नाश होउ देई,
रे, बंधु तूच तूझा, शत्रूहि तूंच पाही. ३

आत्म्यासि जिंकिलें जें, रे बंधु तोच त्याचा,
रे शत्रु तो अनात्मा, होतो स्वतः स्वतःचा. ४

गीता अ० ६ श्लोक ७ ते ९

( चाल :–मेरे नयन बहे जलधारा )

तो योगी असतो, अर्जुना तयांत मी रमतो. ॥ धृ० ॥

सम दुःखसुखीं शीतोष्णीं, अन् जाण मान अपमानीं
जिंकिला निजात्मा ज्याने, नित शांत स्थिरमति तो. १

रे तृप्त ज्ञान विज्ञानीं, कूटस्थ जितेन्द्रिय कोणी,
सम लोह हेम जो मानीं, निर्द्वन्द्वी प्रेमल तो. २

ते स्वजन सखेच उदासी मध्यस्थ बंधु वा द्वेषी,
समभाव साधु पाप्यासी राखितो निजांतरिं तो. ३

गीता अ० ६ श्लोक १० ते १५
( राग :–विहाग )

हो मत्परायण ॥ धृ ॥

आत्मरंगि रंगूनी, अेकांतीं राहूनी,
संग्रह कल टाकूनी, अन् निरास होवोनी १
शुद्ध स्थान देखोनी, विजनीं रमणीय स्थानिं
स्थिर आसन मांडूनी, मृगचर्म कुश वसनीं. २
ध्यानमग्न होवोनी, चित्तेंन्द्रिय आवरोनि,
आत्मशुद्धि साधूनी, बैस योग साधनीं. ३
निज शरिर शिर ध्यानीं, स्थिर अचलित धारूनी,
नासिकाग्र लोचनीं, अन्यत्र न देखुनी. ४
ब्रम्हचर्य पाळोनी, तें प्रशांतदायिनी,
मनसंयम साधोनी, मजसि चित्त जोडूनी. ५
आत्मलीन होऊनी, नियतचित्त राहूनी
परमशांति निर्वाणीं, येई मम भव्य भवनिं ६
हो मत्परायण.

गीता अ० ६ श्लोक १६, १७
( चाल :–मम जीवा सुखवाया )

दुःखनाशि योग हा. ॥ धृ ॥

अतिसेवि, उपवासी, कधिं न तोहि साधितो,
अति निद्रित अति जागृत कधिं न तोहि साधितो. १

आहारीं समसमान, विहारिंही युक्त जाण,
करितो निजकर्मे तो, युक्तचित्त राहून. २

जागृति निद्राहि मान, रे ज्याची सप्रमाण
साधितसे तोचि कठिण, दुःखनाशि योग हा. ३

गीता अ० ६ श्लोक १८ ते २३

अभंग

योगी तोची जाणा, जया नाहीं हो वासना, १
लावि चित्त माझे ठायीं, मनीं स्पृहा नसे कांहीं. २
चित्त लावी तो अेकांतीं, जैसा दीपक निर्वातीं. ३
योगसेवेनें निरुद्ध, चित्त उपराम विशुद्ध. ४
लीन श्रीहरीचरणीं, सदा आनंदित मुनी. ५
निजबुद्धि इंद्रियातीत, सुख भोगी तो नितांत. ६
अैसी स्थिति होतां प्राप्त, कधीं होई ना चलित. ७
तोची मानी परम लाभ, महादुःखें ना त्या क्षोभ. ८
दुःखी प्रपंच वियोग, करी जाण तोची योग. ९
अैसा योग जाण तयें, साध्य केला दृढ निश्चयें. १०

गीता अ० ६ श्लोक २४ ते २६

( चाल :—मेरे तो गिरिधर गोपाल )

मंद मंद लाग सख्या योगसाधना ॥ धृ० ॥

संकल्पातुनि जन्मति सर्व कामना,
आसक्तिरहित त्यजी सकल वासना. १

चंचल संसारगमी इंद्रियां मना,
आत्मरूपिं लावि त्या करुनि नियमना. २

स्थीर बुद्धि मन लावी ईशकारणा,
ईशाविन करि न मुळीं अन्य चिंतना. ३

गीता अ० ६ श्लोक २७ ते ३२

**अभंग**

गेला राजस पसारा, ब्रम्हभूत झाला खरा,
ज्याचें मानस प्रशांत, सुख भोगी तो नितांत. १

गेलें किल्मष अवघें, परमात्मीं लय लागे,
ज्यांत ब्रम्हस्पर्श होत, सुख भोगी तो नितांत. २

योगी सर्व भूतांमाजीं, सर्व भूतें योग्यामाजीं,
समदर्शन करीत, सुख भोगी तो नितांत. ३

मज देखे सकला ठायीं, सकलां देखे माझ्या ठायीं,
तयासवें मी संयुक्त, सुख भोगी तो नितांत. ४

स्थित भूतमात्रीं सर्व, पाही मीच वासूदेव,
जरी सर्वथा वर्तंत, सुख भोगी तो नितांत. ५

सर्व भूतमात्रा देखे, योगी आपणासारीखे,
सुखदुःखा सम मानीत, सुख भोगी तो नितांत. ६

गीता अ० ६ श्लोक ३३ व ३४

अर्जुन वदे :— (रागः—बागेसरी)

कथिला तूं मजसी समयोग,
परी न त्याचा मज उपयोग. ।। धृ० ।।

मन प्रमाथि चंचलहि भयंकर,
तन्निग्रह वायूसम दुष्कर. १

गीता अ० ६ श्लोक ३५ व ३६

श्रीभगवान वदे— ( राग:- धनाश्री )

मन दुर्निग्रहि जरि निःसंशय,
वश करितील ज्ञान वैराग्य ॥ धृ० ॥
असंयम्यास योग दुष्प्राप्य,
प्रयत्नशीला परि मन वश्य. १

गीता अ० ६ श्लोक ३७ ते ३९

अर्जुन वदे :— ( चाल :-मधुरा बिंबाधरा )

गति त्याची कोणती ? ॥ धृ० ॥

योगाच्चलित चित्त यत् झालें,
प्रयत्न अवघे मंदहि घडले,
योगसिद्धिचें चिह्नहि नुरलें,
नच भगवत्प्राप्ति. १

संसाराची केली माती,
झाली ना परि भगवत्प्राप्ति
अतोततोहि भ्रष्ट दुःस्थिति,
छिन्न घनासम ती ! २

संशय हा मम छेदिल कोण
सांग सख्या रे, तुजविन अन्य,
बोधुनि मजला करि तू धन्य,
चरणीं ही विनती. ३

गीता अ० ६ श्लोक ४० ते ४७

श्रीभगवान वदे:— गज़ल

योगपतिता नाश नाहीं अखिल ब्रम्हाण्डांतरीं,
जाणुनी घे कधि न मिथ्या होइ माझी वैखरी ॥ धृ० ॥
जो कुणी करि तात रे, कल्याणकार्या अल्पही,
दुर्गती केली तयाची सांग मी कां कधि तरी ? १
पुण्यलोकीं शाश्वतासम स्थान रे, लाभे तया,
जन्मतो मग योगभ्रष्ट कुलिन श्रीमंताघरीं. २
पावतो वा जन्म तो रे, ज्ञानवंताच्या कुलीं,
जाण दुर्लभ जन्म ऐसा बोलले पार्था हरी. ३
पूर्वजन्मीं राहिलेला आत्मसंयमयोग तो
साधण्या कुरुनंदना रे, फ़िरुनि यत्ना तो करी. ४
पूर्व अभ्यासेंच होई योगि तो विषयी जरी,
योगजिज्ञासूहि टाकी वेदकर्मफला दुरी. ५
मंदगति योगी असा जरि प्राप्त करि परमागति,
नवल काय वदे जरी ती लाभली योग्याप्रति. ६
श्रेष्ठ सकलांहूनि योगी ज्ञानि कर्मि तपस्वि वा,
म्हणुनि योगी हो कसा तू वदति पार्था श्रीहरि. ७
योगियांमाजींहि पार्था, लीन नित मद्रूपिं जो,
भजत श्रद्धेनें मला, तत्पाउलें माझ्या उरीं. ८

इतिश्री गीतज्ञानेश्वरीचा आत्मसंयमयोग नामें सहावा अध्याय समाप्त.

ॐ तत्सत्ब्रम्हार्पणमस्तु.

# अध्याय ७ वा

## ज्ञानविज्ञानयोग

गीता अ० ७ श्लोक १ ते ३

**श्रीभगवान वदेः—** अभंग

( राग :–शिवरंजन )

ऐसा योग साधूनीया, मयीं चित्त लावूनीया. १
जाणशील मग समग्रा, तेची गुज सांगतो भद्रा. २
ज्ञान विज्ञान संपूर्ण, तुज कौंतेया कथीन. ३
तत्वज्ञान तें जाणतां शेष नुरे रे सर्वथा. ४
अरे सहस्त्र नरांत, ऐका योगसिद्धि प्राप्त. ५
आणि ऐशा त्या सिद्धांत, मज ऐकादा जाणत. ६

गीता अ० ७ श्लोक ४ ते ७

**अभंग** ( चाल :–प्रेम कुणीहि करीना )

ऐक प्रकृति अपरा, जीवसृष्टि प्रकृति परा. १
तयां उभयांच्या संयोगें, जग वघ चालें वेगें. २
उभय प्रकृतिपासून, जीव होती भिन्न भिन्न. ३
पाठि लागे जन्ममरण, तया मीच रे कारण. ४
धनंजया मजवीन, नाहीं अन्य कांहीं जाण. ५
गोवियेले सकल मयीं, जैसे मणिगण सूत्रीं पाही. ६

गीता अ० ७ श्लोक ७ ते १५

( राग:- यमनकल्याण. त्रिताल )

सर्वांतरिं वघ मी, पार्था ।। ध्रु० ।।

जलांत रस शशिसूर्यप्रभा मी,
प्रणव वेदिं अन् शब्द नभीं मीं
सकल जिवांचा जीव प्राण मी
नरांत पौरुष मी. १

पृथ्वीमाजीं पुण्य गंध मी
अग्नीमाजीं दिव्य तेज मी
जीवन सकलहि भूतांचें मी
तपसांमधि तप मी. २

सकल जिवांचें बीज असे मी
सनातन सख्या जाण नेहमीं
बुद्धि बुद्धिमंतांची ती मी
तेज तेजसीं मी. ३

नच अनुरागी नच जे कामी
बलवंतांचें बल तें ही मी
धर्मशास्त्रानुकूल काम मी
पडसी काय भ्रमीं ? ४

सात्विक राजस तामस गुणमय
सकल भाव ते मानी मन्मय
भावोद्भव मजमुळेंच होय
त्यांत तरी नच मी. ५

त्रिगुण विकारें मोहित जगत
त्रिगुणातीता अव्ययाप्रत
नाहीं मजसी कुणिही जाणत
दुःखीं यास्तव मी. ६

त्रिगुणमयी ती माझी माया
दुस्तर अतिशय पार कराया
भजती मज जे अेकमात्र त्यां
तारितसे हरि मी. ७

मूढ पापि ते मान नराधम
भ्रमवीं ज्यांना मायाविभ्रम
असुर कधिं न ते घेति नाम मम
बुडती घोर तमीं. ८

गीता अ० ७ श्लोक १६ ते १९

## अभंग.

आर्त जिज्ञासू अर्थार्थी, ज्ञानी, भक्त चारी रीती. १
त्यांत ज्ञानी नित्ययुक्त, जाण माझा परम भक्त. २
भक्त सर्वची उदार, परी ज्ञानी त्यांत थोर. ३
ज्ञानी युक्तात्मा उत्तम, मयीं स्थित तो निष्काम. ४
अरे अनेक जन्मांतीं, ज्ञानियासी मम प्राप्ति. ५
वासुदेव वासुदेव, पाही ज्ञानी ठायीं सर्व. ६
अैसा दुर्लभ महात्मा, तयावरी माझा प्रेमा. ७

गीता अ० ७ श्लोक २० ते २३

( चाल:– मंगलमय नाम तुझें )

विषयी तो भजत सदा अन्य देवता,
स्वभावास औषध रे नाहिं सर्वथा ॥ ध्रृ० ॥

त्याच्या त्या श्रद्धेला स्थीर मी करी
त्याचिया उपासित त्या देवतेवरी. १

श्रद्धेनें आराधुनि प्राप्त तो करी
इष्टकामसिद्धिस मजपासुनी वरी. २

अल्पबुद्धि नाशवंत तृप्त त्यामुळें
इष्टकामसिद्धिच ती त्यास लाभतां. ३

मद्भक्ता परि पाही अन्य ना गति
पावे मद्भक्त अंति मत्स्वरूपता. ४

गीता अ० ७ श्लोक २४ ते ३०

**अभंग** ( राग:–भूप )

योगमायें आच्छादित, होत नाहीं प्रकाशित. १
मूढ जाणती ना राया, मज अजन्मा अव्यया. २
पूर्वीं गेलीं जी होऊनी, आणि स्थित वर्तमानीं. ३
पुढें होणारीं जीं भूतें, मज ज्ञात अज्ञातातें. ४
इच्छाद्वेषाच्या योगानें, द्वंद्वरूपाच्या मोहानें. ५
सर्वभूतें तीं संमोहीं, पतित परंतपा पाही. ६
जाहले जे पापमुक्त, पुण्यवंत माझे भक्त. ७
तेची द्वंद्वमोहनिर्मुक्त, मज भजती दृढ व्रत. ८

जरामरणातून मुक्त, होती भक्त ममाश्रित. ९
तेची जाणताती परम, ब्रह्मकर्म नी अध्यात्म. १०
अधिभूत अधिदेव, अधियज्ञ मीच सर्व. ११
जाणती त्यां अंतकाळीं, भेटतो मी वनमाळी. १२

इतिश्री गीतज्ञानेश्वरीचा ज्ञानविज्ञानयोग नामें सातवा अध्याय समाप्त.

ॐ तत्सत्ब्रह्मार्पणमस्तु.

गीतज्ञानेश्वरी

# अध्याय ८ वा

## अक्षरब्रम्हयोग

गीता अ० ८ श्लोक १ व २

अर्जुन वदे :— (राग :—भूप. चाल :—उगवे पहा प्रभात.)

मति माझी भ्रमते, देवा
तुझ्या मुखीचें शब्दब्रह्म तें
संभ्रम उद्‌भवितें. ॥ धृ० ॥

ब्रह्मकर्म अध्मातम काय तें
अधिभूत अधिदैव कसें तें
कोणा बाहू अधियज्ञहि तें
सांग सख्या मातें. १

गीता अ० ८ श्लोक ३ ते ८

श्रीभगवान वदे :— अभंग

मीच अक्षर परब्रह्म, जीवभावे म्हण अध्यात्म. १
भूतभावें जें उद्भवें, यज्ञ, त्याग, कर्म नावें. २
प्रकृति ती रे अधिभूत, अधिदैव पुरुष ज्ञात. ३
अधियज्ञ नामें मी रे, विष्णुरूपानें संचरे. ४
अंतकाळीं मजला स्मरत, कलेवर जे ठेवीत. ५
तेची होती मजला प्राप्त, नाही संशय तयांत. ६
देह त्यागाचीये समयीं, येती भाव जे जे हृदयीं. ७

सदा चिंतनें कौंतेया, लाभती ते अंतीं तया. ८
म्हणुनि स्मरण माझें सदा, करित होई सिद्ध युद्धा ९
मन बुद्धि मज अर्पितो, मत्स्वरूपची होई तो. १०
योगयुक्त करी अभ्यास, नाहीं असाध्य कांहीं खास. ११
तया दिव्य परम पुरुषा, प्राप्त करणें रे सर्वेशा. १२

गीता अ० ८ श्लोक ९ ते ११

(चाल :–सुखसाधना भजनागणा)

स्मर श्रीहरि, जन्मभरी,
वसतो सदा सकलांतरीं, अणुहूनि जो लघुता धरी
दीपे महा द्युमणीपरी, तिमिरास जो सारो दुरी. १
जो अंति रे निश्चल मनें, भक्तीमय योगाबलें,
लावी मयीं अपुल्या जिवा, अंतीं तया मी स्वीकरी. २
म्हणती विद ॐकार ज्या, ब्रह्मस्थित मुनिवर जया
धामास रे जाती त्वरें, पद तें तुला नाहीं दुरी. ३

गीता अ० ८ श्लोक १२ ते १५

( राग :–बहार त्रिताल. )

बघ तेंच परम मम धाम ॥ धृ० ॥
वेदमूर्ति ज्या अक्षय म्हणती,
वीतराग ते ज्यांत प्रवेशति,
पदधांछी संसार त्यागिती,
मुनिजनमनविश्राम. १
संयमि करिती योगधारणा,
ॐकारें मम करिति चिंतना,

देह टाकुनी भक्त अर्जुना,
पावति सुखाभिराम. २

चिंतन करिती माझें सतत,
होइ त्यांस मी सहजचि प्राप्त,
महात्म्यांस त्यां परमस्थितिगत,
जन्म न कधिं सुतराम्. ३

गीता अ० ८ श्लोक १६ ते २३

(साकी)

ब्रह्मादिकही लोक फिरति जे जन्ममृत्युफेरे,
मद्भक्ताला बघ कौंतेया भय न तयाचें रे. १

ब्रह्मयाचे ते दिवस रातिही सहस्त्रहि युगांचे,
ब्रह्मलोकही म्हणुनि अशाश्वत मानी हें साचें. २

ब्रह्मयाच्या त्या दिवसामाजीं सर्व जीव व्यक्त,
रात्री होता ब्रह्मयाची ते होती अव्यक्त. ३

असा प्रगटे भूतग्राम हा पुन्हाच लय पामे,
शंभर वर्षे भरतां त्याची ब्रह्माही विरमे. ४

पूर्णब्रह्म परमात्मा अव्यय कधीं न लय त्याचा,
भूतमात्र जरि नाश पावतीं अक्षय तो साचा. ५

म्हणती त्याला अव्यक्तहि अक्षरही परमगति,
जेथें जातां पुन्हा न येणें परमस्थिति मम ती. ६

ज्याच्यातुनि होताती व्यक्त भूतमात्र सारे,
परमात्मा तो भक्तीनें वश होइ अर्जुना रे. ७

अंक अतां तू कालमार्ग ते चित्तां देउनिया,
पुन्हा जन्म जें लाभे अथवा ना लाभे मुनया. ८

गीता अ० ८ श्लोक २४ ते २७

( राग :—भैरवी )

उत्तरायणीं शुक्लपक्ष तो
दिवस ही असे अग्नि साक्षि तो
जे कुणी तदा अंत पावती
लाभते तयां उत्तमा गति. १

दक्षिणायनीं कृष्णपक्षि त्या
रात काल ही धूममय धरा,
चंद्रलोक तो प्राप्त करि सख्या
स्वर्ग भोगुनी येइ मागुता. २

देवयानही पितृयानहीं
मार्ग द्वय भले जाण प्राचिन
परमगति पहा अेक दे जिवा
आणि रे दुजा दावितो भवा. ३

योगियां परी मार्ग मोकळे
मुक्तता सदा माळ घालि रे
म्हणुनि हो सख्या योगयुक्त तू
सांगु किति तुला मर्म जाण तू. ४

गीता अ० ८ श्लोक २८

( राग:— आसावरी, त्रिताल )

मानी सम सकलां, योगी ॥ धृ० ॥
श्रुतिपठनाच्या यज्ञतपाच्या

दानादीच्या निज कर्मांच्या
वांछि न किमपि फलां. १

लक्ष लावुनी अेका ठायीं
सम योगा आचरी सदाही
प्राप्त करी तो निःसंदेही
परम पदास भला. २

इतिश्री गीतज्ञानेश्वरीचा अक्षरब्रह्मयोग नामें **आठवा अध्याय** समाप्त.

ॐ तत्सत्ब्रह्मार्पणमस्तु.

# अध्याय ९ वा

## राजविद्याराजगुह्ययोग

**प्रार्थना** (राग :–छायानट)

सुजनहो दया करा मजवरी
बाळक तुमचा अज्ञ लाडका विनती हीच करी ।। धृ० ।।
तुम्हिं भक्तीचें सुखामृतनिधि त्यामधिं मी विहरी
बोल बोबडे माझे देवा गोड करुनि घ्या तरी. १
सरस्वतीच्या पुत्रांना मी सांगू काय तरी ?
तृप्त करिल जो आपणास हो अशी न मम वैखरी. २
अपुल्यावरिच्या भक्ति प्रेमें धैर्य धरी अंतरीं
मातपित्यांनो वच बाळाचे गोड करुनि घ्या तरी. ३
सर्वस्वी मी अपुला माना घ्या मजला पदरा
थोर मंडळी गोड करुनि घ्या ज्ञानेश्वरि माधुरी. ४
वसो तुम्हामधिं ब्रह्मरूपिणी गीता ज्ञानेश्वरी
पामर मी वदु काय आपणा बोलविता श्रीहरि. ५

### प्रास्तवीक अभंग

आजि भक्ती फळा आली, आनंदाची सीमा झाली. १
कृष्ण परब्रह्म बोळले, सांगे ज्ञान अर्जुना भलें. २
आली ज्ञानाची पर्वणी, स्नान करा हो साजणी. ३

प्रेमसिंधूत न्हाऊन, करा जीवन पावन. ४
भक्तिगंगा आली पूरा, पिऊनी घ्या अमृतधारा. ५
वडीलांची पुण्याईच, फळा आली म्हणा साच. ६
जणू मलाच श्रीकृष्ण, कथी भक्तीचें महिमान. ७
अहो प्रेमळ भक्त हो, लुटा भक्तीचा हा लाहो. ८
प्रेमसुख देतां घेतां, आळवा श्री भगवंता. ९

**दिंडी** ( राग :–बागेसरी, ताल:–दादरा )

अहा ! नववा अध्याय गोड साचा
असे ठेवा हा सकलही सुखाचा
राजविद्या नी राजगुह्ययोग
जाणुनी व्हा श्रीरंगचरणिं दंग.

गीता अ० ९ श्लोक १ ते ३

**श्रीभगवान वदे** :— ( राग:– हमीर, त्रिताल )

किती किती सांगू तुला
भरती येई प्रेमसिंधुला ॥ धृ० ॥

देइ तुज गुह्यतम ज्ञान
विज्ञानही भक्तीचें साधन
राजविद्या करील पावन
अविनाशी अनुभवपूर्ण
धर्मयुक्त सुखवि सकलां. १

असती जे श्रद्धाविहीन
तया दर्शन मम कोठून?
मृत्युसंसारचक्रामधून
भ्रमति ते जन भक्तिहीन
त्यजिती ना कधीं भ्रान्तिला. २

गीता अ० ९ श्लोक ४ ते १०

## अभंग ( राग:– तिलककामोद )

मम अव्यक्त मूर्तीचा, सकल व्याप हा विश्वाचा. १
मूळ निर्गुण निराकार, सृष्टिरूपें मी साकार. २
मीच भूतांचा धारक, सर्व भूतीं असुनी देख. ३
नाहीं भूतें माझ्या ठायीं, मम योगैश्वर्या पाही. ४
ममात्मा हा पार्था जाण, करी भूतभाव निर्माण. ५
मीच मीच रे अखंड, भूतरूपें त्या उदंड. ६
मात्र माझीं रूपें नाना, मायायोगें दिसतीं जनां. ७
मूळ रूप निरुपाधिक, भूतें अभासची देख. ८
चराचर मी अभिन्न, ममैश्वर्ययोगा जाण. ९
भूतें दिसताती अनेक, कल्पनेचा खेळ देख. १०
दिसे जन्म लय भूतां, तया कारण अज्ञानता. ११
वायु जेवी रे आकाशीं, सर्व भूतें मयीं तैशी. १२
सर्व भूतें तीं कल्पांतीं, प्रकृतींत लीन होती. १३
आणि पुन्हां कल्पारंभीं, सर्व भूतें निर्मीतो मी. १४
स्वभावेंच भूतग्रामें, मीच नीर्मी जैसी कर्मे. १५
लय निर्मितीच्या कामीं, नामानिराळा पुन्हा मी. १६
रचे माया चराचर, अधिष्ठाताच मी मात्र. १७
हेतुनें या फिरे साचें, रहाटगाडगे विश्वाचें. १८

गीता अ० ९ श्लोक ११ व १२

## अभंग (राग:– काफी)

अैशा मज मूढ जन ते नेणती
मानव मानीती महेश्वरा. १

नेणती ते माझा भाव तो परम
नाहीं मज जन्म मृत्यु कांहीं. २
मानिती ते कर्ता मज अकर्त्यास
देती अनाम्यास विविध नामें. ३
निरुपाधिकातें लावीती उपचार
कर्तव्यें साचार अकर्तव्या. ४
जातिगुणातीला गुण ते लावीती
स्थान ते कल्पीती विश्वव्याप्या. ५
अकर्णासि कर्ण, नेत्र ते अनेत्रा
गोत्रहीना गोत्रा लाविताती. ६
अव्यक्तासि व्यक्त, निरिच्छासि इच्छा
तैसी क्षुधातृषा नित्यतृप्ता. ७
वस्त्रालंकारही मज लेववीती
करी वस्त्रपूर्ति जरी मीच. ९
अजन्म्याचा जन्मोत्सव ते करीती
प्राणप्रतिष्ठाहि स्वसिद्धाची. १०
मानीती मजसी मानवावतारी
मूढ तयांपरी कोण सांग. ? ११
भवित ज्ञान कर्म त्यांचे सर्व व्यर्थ
मोहमायाश्रित असुर तेची. १२
व्यर्थ रे तयांचा मानी विद्याभ्यास
नाहीं ज्ञान ज्यांस यथार्थ तें. १३

गीता अ० ९ श्लोक १३ व १४

## साकी

दैवि प्रकृतिचे आश्रित पार्था महात्मेच ते थोर
अनन्य मनसा भजती मजला अव्ययादि साचार. १

धार्मिक ते वैराग्यशील ते ज्यांच्या अंतरिं मीच,
ज्ञानी अंतर्बाह्य शुद्ध ते ब्रह्मरूप नत साच. २
शांत धीर आनंदी त्यासम नाहिं अन्य जगिं कोणी,
भजन करिति जे सदाच माझें प्रेमें आनंदोनी. ३
अविरत रत ते भगवत्कीर्तनिं दृढव्रतधारी तेच,
भजती मजला अनन्यभावें उपासतीहि मलाच. ४
पाप तयांना लागे कोठुनि यमदम लवति बिचारे,
तीर्थस्नान तें तयांस कसलें स्वयंतीर्थ ते बा रे. ५
नामघोष मम चालवुनी ते दुःखें करिती नष्ट,
परोपकारी स्वयं साहती हालअपेष्टा कष्ट. ६
भेदभाव तो टाकुनि सकलां सौख्या देती नित्य,
आनंदाचे भंडारचि ते वैकुंठचि साक्षात्. ७
नामभजनमहिम्यानें करिती विश्वा अखिल पवित्र,
भक्त सखे मम पूर्ण उदारचि प्रति शंकरअवतार. ८
वैकुंठीं मी वसतो अथवा क्षीरसागरीं रमतो,
भ्रामक ही कल्पना अर्जुना भक्तांघरिं मी असतो. ९
केशव हरि गोविंद नाम ज्या मुखीं सर्वदा नाचें,
तिथेंच रे वास्तव्य आमुचें अन्य कुठें ना साचें. १०
मीच विश्विं या चराचरीं मी जीवीं सान महान,
मानुनि सकलां प्रणिपाता ते करिति नम्र होऊन. ११

गीता अ० ९ श्लोक १५

( रागः– भीमपलास. )

ज्ञानयज्ञ करिती ते कोणी
उपासती मज महंत ज्ञानी. ॥ धृ० ॥

यज्ञस्तंभ आदि संकल्प
पंचभुतांचा यज्ञमंडप
इन्द्रियेंच साहित्य अमूप
द्वैताचें बलिदान करोनी. १

मन बुद्धीच्या यज्ञवेदित
प्रज्वलीत त्या ज्ञानाग्नींत
अज्ञानाच्या आहुति देत
विवेक मंत्रा उच्चारोनी. २

अेक मानुनी पृथक् मानुनी
कुणी विश्वतोमुखहि कल्पुनी,
भजती मज नित्ययुक्त होउनि,
पूजिति मज निज सत्कर्मानीं. ३

गीता अ० ९ श्लोक १६ ते १९

**गज़ल** ( रागः– काफी )

श्रौत कर्म स्मार्त कर्म रे स्वधा औषधिहि मी,
याज्ञिकांचें यज्ञकर्म शास्त्रविधियुत जाण मी. ॥ ध्रु० ॥

मंत्रघृत अग्नीहि मी अन् हवनरूप क्रियाहि मी,
वेद्य मी ॐकार मी ऋक् साम् यजुः अथर्व मी. १

मी सुहृद् शरणीय पालक भक्तवास नि साक्षि मी,
प्रभव प्रलय स्थान मी निधान अव्यय बीज मी. २

विश्वजननी गुणमयी त्या प्रकृतिचा आधार मी,
विश्वलक्ष्मीचा पति त्रयलोकस्वामी तोहि मी. ३

बघ नभाचें व्यापकत्व वायुचें चंचलपण,
मेघवृष्टी अग्निज्वाला सकल माझ्या आधिन. ४

अचल पर्वत सहनशीला पृथ्वि वाहि भार हा,
सिंधु मर्यादा न त्यजितो माझि आज्ञा ती पहा. ५

वेद बोलवि सूर्य पेटवि प्राण चेतवि मीच रे,
काळ गिळितो भूतमात्रा माझिया आज्ञें बरें. ६

सकल शिरसावंद्य मानुनि वचन मम आचरति ते,
साक्षिभूत मी समर्थ या जगाचा नाथ मी. ७

जगतवसतिस्थान मी रे येति शरण मलाच जे,
जन्ममरणातून त्यांना मुक्त करितो त्वरित मी. ८

अेक असुनी प्राणीमात्रीं प्राणरुपें भिन्न मी,
सान थोरहि जीव ते रे मित्र सकलांचाच मी. ९

पान गवताचें न हाले माझिया आज्ञेविन,
आदि मध्य नि अंतही तो या जगाचा जाण मी. १०

सूर्य तेजोमयहि मी रे, वर्षवी पर्जन्य मी,
मृत्यु मी अमृतहि मीच सत्यमिथ्यारूप मी. ११

दाखवी मज स्थान अैसे रे जिथें तो नाहिं मी,
रे, अभागी जीव ते कीं, ना दिसे ज्यां असुनि मी. १२

रे, महदाश्चर्य हें कीं ना दिसे जीवांस मी,
असुनि मी रे ते अभागी मानिती नाहींच मी. १३

अमृताच्या डोंहि जो रे प्राशि भक्ती जान्हवी,
त्यां दिसे मद्रूप विश्वीं, ठायिं ठायीं मीच मी. १४

गीता अ० ९ श्लोक २० व २१

**गज़ल** ( राग:— माड. )

त्रिवेदी सोमरस पिउनी करूनी थोर यज्ञांना,
होउनी धूतपापी ते मागती स्वर्गसौख्यांना. ॥ धृ० ॥

पुण्य तें पापची त्यांचें गमे ज्यां स्वर्ग मजहूनी,
मागती कल्पतरूखालीं भीक ते झोळि घेऊनी. १

भक्तिचा राजपथ त्यजुनी जाति ते आड त्या रानी
उभय ही स्वर्ग नर्क हि ते चोरवाटाच तू मानी २

जेथ ना होत मत्प्राप्ती मुळीं तें पुण्यकर्म न हो,
म्हणति जे पुण्य कर्म तया तयांचीं जीभ ती जावो. ३

लोक लाभे सुरेन्द्रांचा अशा त्या पुण्यवंतांना,
तिथें ते दिव्य देवांच्या सुभोगा भोगिती नाना. ४

संपता पुण्य पुंजी ते परतती मृत्युलोकांत,
भोगिती आपदा कामी पडुनि संसारचक्रांत. ५

क्षणिक त्या स्वर्गसुख काजीं गमविती थोर लाभातें,
जाणती ना मला जे रे, त्रिवेदी पढतमूर्खच ते. ६

## विशेषगीत

### अभंग ( राग :–शिवरंजन. )

स्वर्गी त्रिवेदी जाउनी, बसति अमर सिंहासनी. १
ऐरावत रत्न थोर, तया मिरवाया साचार. २
पाटनगर भव्य किती, तया नाम अमरावती. ३
अष्ट महा सिद्धि द्वारीं, तिष्ठताती दासीपरी. ४
कामधेनूंची खिल्लारें, अमृताचींही भंडारें. ५
तिथें सारे राजपथ, जाण चिंतामणीयुक्त. ६
कल्पतरूंच्या उपवनीं, मधुर गंधर्वाचीं गाणीं. ७
अप्सरांचीं नृत्यलीला, देई प्रमोद चित्ताला. ८
तिथे मदनही साचार, देई रतिसुखा अपार. ९

चंद्र तिथें भांडीं घांसी, वायु वरुण चपराशी. १०
आणि द्याया आशीर्वाद, ब्रहस्पती सदा सिद्ध. ११
देव गाती स्तुति अपार, लोकपाल सरदार. १९
भोगुनी ते परतता, किती दुःख होई चित्ता. १३
पुरे पुरे असे भोग, नको देवा त्यांचा संग. १४

गीता अ० ९ श्लोक २२

( चाल :– या नवनवलनयनोत्सवा. )

जे चिंतिती मज नित्यही,
अनुदिनिं पर्युपासना मम चालविती जगीं
अन्य भाव ज्या नाहीं. ॥ धृ० ॥

झाले जे जन मत्परायण, नित्ययुक्त भजनीं रममाण,
त्यांच्या योगक्षेमा जाण, मीच अर्जुना वाही. ॥१॥
करिती जे दृढ ममोपासना, त्यांची चिंता सदा मन्मना,
सारिन अवघ्या त्यांच्या विघ्नां, भवचिंता त्या नाहीं. ॥२॥
भक्तरक्षणचि माझा बाणा, जाणुनि घे मम हीच प्रतिज्ञा,
आण तुझी मज सख्या अर्जुना, वाण तयां मुळिं नाहीं. ॥३॥

गीता अ० ९ श्लोक २३ ते २५

**अभंग** ( चाल:– ध्यानी अशनी शयनी. )

अन्य देवभक्त अन्य देवतांना । भजती अर्जुना श्रध्दान्वीत. १
वास्तवीक तेही मलाच भजती । नाहीं तया रीती विधी कांहीं. २
अग्नि, चंद्र सूर्य इंद्र देव हेची । मानुनी तयांसी आराधीती. ३
बीजाला टाकून शाखापत्रादींना । सिंचणें जीवना काय युक्त ? ४

अन्न ते रे कोणी कानानें खाईना डोळ्यांनीं सेवीना पुष्प कोणी. ५
तैशी पूजा माझी माझ्यास्तव व्हावी प्रीती रे असावी माझें ठायीं. ६
मज न जाणतां जे जे भजताल । भजन त्यांचें व्यर्थ जाण तात. ७
कर्म तें अवघें ज्ञानें आचरावें । निर्दोष असावें ज्ञाननयन. ८
सकल यज्ञांचा भोक्ता मीच स्वामी । नेणती सकामीं देवभक्त. ९
अन्य देवभक्त मज न पावती । रूप तेची होती भाव जैसा. १०
देवव्रतधारी जाती देवांप्रती । पितृभक्त होतो पितृरूप. ११
भूतांचे पूजक पिशाच्च ते होती । मद्भक्तासी अंतीं भेटी माझी. १२

## विशेषगीत. अभंग

मम भक्तांचें नयन, घेती माझेंची दर्शन. १
आणि पार्था त्यांचे कान, करिति मन्नामश्रवण. २
मम भक्तांची ती वाणी, रत माझीया गुणगानीं. ३
मम भक्तांचें तें मन, मम चिंतनीं तल्लीन. ४
मम भक्त ते साचार, करिती मलाच नमस्कार. ५
तयांचें तें दान पुण्य, सकल माझ्यास्तव जाण. ६
मम वांछेनें सकाम, मम प्रेमें ते सप्रेम. ७
अध्ययन त्यांचें सर्व, जाण माझ्या प्राप्तीस्तव. ८
धरीती ते माझी कास, माझ्यावीन न दुजी आस. ९
याच जन्मीं याच डोळा, देखती ते मज घननीळा. १०
देह जावो अथवा राहो, मजवरी दृढ भाव. ११
सदा राबे त्यांच्या गेहीं, मीच भार त्यांचा वाही. १२
केल्यावीन रे स्वार्पण, कधीं लाभे ना मी जाण. १३
घमेंड जे करीतात, महा तपस्वि आम्हीं मुक्त १४
तेची जाती अधोगति, कधीं नाहीं त्या मत्प्राप्ति. १५

शेष सहस्र मुखें तो, स्तवन करीतां शीणतो. १६
महावक्ता शेष पाही, पडे अंतीं माझ्या पायीं. १७
वेद मज न जाणती, अंतीं म्हणती 'नेति नेति'. १८
इथें अभिमान तो साचा, मुळीं चालेना कोणाचा. १९
महामुनि सनकादिक, जाणती ना मजला देख. २०
महादेव त्यजुनी हेका, घेती शिरीं चरणोदका. २१
लक्ष्मी महान संपन्न, जिची दासी सिद्धि जाण. २२
लीला दासीची अपार, रची अमरावती नगर. २३
आणि इन्द्रादी ते देव, तिचीं खेळणीं ते सर्व. २४
क्षणामाजीं खेळ मोडे, विरति इन्द्रही बापुडे! २५
टाकी जया वृक्षीं नजर, कल्पवृक्ष होतो थोर. २६
अैसी आहे जिची दासी, तिची महति काय पुसी? २७
परी लीन कमलाही, करी चरणसेवा पाही. २८
त्यजी अभिमान तो साचा, विद्वत्तेचा महत्तेचा. २९
ज्ञाहला जो अति नम्र, त्याचा करि मी अंगीकार. ३०
पहा लक्ष्मीच्या ऐश्वर्या, शंकराची तपश्चर्या. ३१
जिथें नाहीं कामा येत, क्षुद्र जीवा कोण पुसत? ३२
त्यजी त्यजी रे तू सर्व, देहसंपत्तीचा गर्व. ३३
काय सांगू वारंवार, भक्तसखा मी साचार. ३४
टाकी सर्वस्व जीवन, मजवरी ओवाळून. ३५
हेची जाणून संपूर्ण, सर्व कांहीं देवाधीन. ३६

गीता अ० ९ श्लोक २६ व २७

( चाल :– रघुवर बांका )

मज ओढ लागली भक्ताची,
मज भूक लागली प्रेमाची. ॥ ध्रु० ॥

अनंत ब्रम्हाण्डाचा स्वामी, भक्तासाठीं घेउनी लक्ष्मी,
उतरुनि येतो अवनीवरि मी, करि पूर्ण मनीषा मी त्याची १
अर्पी भक्त मला जो सुमनें. फूल फळें जल किंवा पानें,
सेवितसे मी अति प्रेमानें, पी दूध वाटि त्या नाम्याची. २
भक्तानें अर्पिली जलधार, अमृताहुनी लागे मधुर,
भक्ताचें फल फूलहि पत्र, अनमोल भेट ती मज साची. ३
अलंकार ते मधुउटणींही, जरी लाविल्या रविवातीही,
दिले कल्पतरु कामधेनुही, तीं फोलच भक्तीविन साची. ४
सुदाम्याचिया पोह्यासाठीं, हात पसरितो मी जगजेठी,
शबरीचीं तीं बोरें उष्टीं, मी चाखलीच ना प्रेमाचीं ? ५
अवघीं तूझीं कर्में जाण, यज्ञ हवन तप दान भोजन,
करी अर्जुना मला समर्पण, घे प्रचीति मग मम वचनाची. ६

गीता अ० ९ श्लोक २८ ते ३४

( चाल:– झुगारा या जगता जगता )

सांगतो योगेश्वर पार्थास, कधि न मम भक्ताचा रे नाश. ॥ धृ० ॥

त्यागि सर्वस्वा मजस्तव रे
कर्मफल शुभाशुभहि सारें
तोचि मज पावे निश्चित रे
साधि जो संन्यासा योगास. १

लाडके जीव मला सारे
तयांवरि मम माया सम रे,
भजत जो अनन्य भावें रे,
तोचि मज जीवप्राण कीं खास. २

जरी तो असे देहधारी
उदासिन निरहंकारि परी
विदेही सदाच संसारीं,
नाहिं त्या भवबाधेचा त्रास. ३

असो मद्‌भक्त दुराचारी
मजवरी अनन्य भाव धरी
साधु तो होइ कृतार्थ तरी
साधुनी सकल साम्ययोगास. ४

व्यर्थ रे जाति कूल पाही
रूप वय प्रतिष्ठा नि धनही
त्यजी ना मद्‌भक्ती कधिंही
पसरि जो जगीं सुकर्मसुवास, ५

क्षिप्र तो होई धर्मात्मा
करुनि घे प्रसन्न परमात्मा,
किती मी वानू तत्प्रेमा !
पावतो शाश्वत शांति सुखास. ६

वैश्य अन् शूद्रादिक सर्व
अखिलही पापयोनि जीव
धारुनी मयि अनन्य भाव
पावती अंतीं परमपदास. ७

ब्राह्मण राजयोगि भक्त
सुकृतां लाभे मी खचित,
अनित्यहि असुखी जगतांत
भजावें मलाच सर्वस्वास. ८

होइ तू अनन्य मद्भक्त
करी मज नमन यजन सतत
मत्परायण होउनि युक्त
सदा तू मदांतरीं करि वास. ९

## विशेष गीत ( राग:- शंकरामिश्र )

नश्वर हा संसार पार्था !
अनेक छिद्री नाव देह हा, कोण कसा तरणार ? ॥ धृ० ॥
पाषाणांचीं वृष्टि होतां, ढाल न का धरणार ?
रोग जिवाला जडला असतां, करणार न उपचार ? १
दावानल भडकला चहुकडे, कसा जीव तगणार ?
दुःखरूपि मालानें भरला, जगीं मानवि बाजार ! २
विद्याधन तारुण्य भोगही, नाहीं त्यांमयीं सार
तरणोपाय अेकचि बापा, भक्ति धरी साचार. ३

## विशेष गीत

अशाश्वत मृत्युलोकीची रीत !
( चाल:- क्षण आला भाग्याचा )

मृत्युलोकिचीं रीतच न्यारी, चंद्राला क्षयरोग विदारी ॥ धृ० ॥
उदय होइ तो अस्तालागी
दुःख सुखाचें सोंग घे जगीं
मोहवि जीवालाच परोपरि. १
अकल्याण कल्याणा झाकी,
मृत्यु उदरिं गर्भाही फाकी,
यमदूतांची मिरवे स्वारी. २
जिथें मृतांचीं कथापुराणें
लोक अैकती तन्मयतेनें,
स्वस्थ कसा हा जीव वावरो ? ३

धन संपादुनि मार्गें नाना
विषयभोगिं जन करिती फन्ना,
परोपकारी वृत्ति न अंतरिं, ४
विषयभोगि तो सुखी मानिती,
महा लोभि त्या पंडित म्हणती,
जिथें शठांची महती भारी. ५
मान पावती जगीं म्हातारे,
वाढदिवस होताति साजरे,
मरणाची तर गोष्टच विसरी. ६
मृत्युलोकिं या जन्म पावणें
जिणें इथें रे लाजिरवाणें,
भूषण मानिति लोक त्या परी! ७
यदृच्छेनें जन्म पावला,
झाडुनि टाकी या मायेला,
हरिचिंतन रे करी अंतरीं. ८

गीता अ० ९ श्लोक ३४

**विशेष गीत** ( राग :- गरुडध्वनि )

प्रिय अर्जुना नच धरि मुळि शंका अणुहि मनीं तू कदा.
भक्त मज रे, प्रिय फार रे,
तत्पालन मम परम धर्म. १
होइ मम तू, मजसि नमी तू,
विमल भक्तिचें पुण्य परम. २

इतिश्री गीतज्ञानेश्वरीचा राजविद्याराजगुह्ययोग नामें नववा अध्याय समाप्त.

ॐ तत्सत्ब्रह्मार्पणमस्तुः

# अध्याय १० वा

## विभूतियोग

गीता अ० १० श्लोक १

श्रीभगवान वदे :— (राग :-भूप, ताल-दादरा.)

परम वचन करि श्रवण फिरुनि अर्जुना,
असुनी जे प्रियमाण करिलहि कल्याणा. ॥ धृ० ॥

वचन न हें परब्रह्म येइ मोलना,
जिंकिलेस प्रेमानें तूं मज अधुना,
उत्सुक मी म्हणुनी रे, तुजसि बोधण्या,
आत्मज्ञान करि पावन मनुज जीवना, १

गीता अ० १० श्लोक २

( राग :-भीमपलास, त्रिताल. )

मी सकलांचें आदिकारण, सनकादिक ते महर्षि सुरगण ॥ धृ० ॥
मत्प्रभाव तो कळे न कवणा, युगें युगें करुनी तपसाधन. १
बुद्धि कुंठते ज्ञानीयांची, वेदहि अंतीं सेविति मौन. २

गीता अ० १० श्लोक ३

अभंग ( राग :-भीमपलास. )

मज जाणे महेश्वर, तोचि ज्ञानाचें माहेर. १
मी अजन्मा अनादि, जाणे तोची रे सुबुद्धि. २

त्याचें रुप मनोहर, जणु सुखाचे अंकुर. ३
धरी मानवावतार, परी त्याहूनी तो पर. ४
तयासमीपही जाण्या, पाप मुळींही धजेना. ५
जपे मंत्र हरि हरि, माया पळवाट धरी. ६

गीता अ० १० श्लोक ४ ते ६

( चाल :–कृष्णातिरिच्या वसणाऱ्या. )

बुद्धि ज्ञान असंमोह, क्षमा सत्य शम दम भाव. १
भाव दुःख सुख अभाव ते, भयाभयहि मम भावच ते. २
समता तृप्ती तप दान, यशापयशही ते जाण. ३
अहिंसाहि मम भावच ती, मीच उपजवी त्या भूतीं. ४
सप्तर्षी ते मनु चार, मीच निर्मिले साचार. ५
प्रजा तयांची हे लोक, पंडित कोणी, कुणि शंख. ६

गीता अ० १० श्लोक ७

( चाल :–पाणपोई. )

भाव ते माझ्या विभूती, जाणि जो तो धन्य जगतीं. १
तोचि निश्चल योगयुक्त, नाहिं रे संशय तयांत. २
भेददृष्टी त्यास नाहीं, भूतमात्रीं मीच पाही. ३
नाहिं त्याला अधमोत्तम, सकल जीविं समान प्रेम. ४

गीता अ० १० श्लोक ८ व ९

**अभंग** ( चाल :–रघुनंदन आले आले. )

मीच विश्वाचा या कर्ता, सकल लोकांचा पोषीता. १
मज भावासमन्वित, जाणती ते बंधनमुक्त. २
रत माझीया भजनीं, तेथें जाई मी धावूनी. ३

हरपलें देहभान, जया चित्तीं मी भगवान. ४
त्यजूनीया मायाभव, जीवीताती माझ्यास्तव. ५
सांगताती परस्पर, कथा माझीया सुंदर. ६
माझ्या भक्ताचें तें घर, तेंची माझें रे मंदिर. ७
चाले तेथें अहोरात्र, मन्नामाचा मधुर गजर. ८
तेथें विठ्ठल रखुमाई, आम्हि सुखें नांदतो पाही. ९

गीता अ० १० श्लोक १०

( राग :–काफी, त्रिताल. )

योगयुक्त जे सदा अर्जुना,
प्रेमें करिती माझ्या भजना,
बुद्धियोग मी देई त्यांना,
मग मी त्यांचा ते माझे ना ! १

जननी जैसी चोजवि तान्हा,
चालवि त्यांची मी उपासना. २

रमा मनोरम प्रिया माझि ना !
परि मी दीनच भक्तावीना. ३

कधिं न अंतरे मी भक्तांना,
कळे अनुभवें हें सुजनांला. ४

गीता अ० १० श्लोक ११

अभंग ( राग :–बागेसरी–मिश्र )

लागे भक्तांचा मज छंद, तयांसाठीं मी गोविंद. १
त्यांचा होवोनी मशाली, त्यांच्या पुढें पुढें चाली. २
तयां देतो आत्मज्ञान, घालवोनीया अज्ञान. ३
ज्ञानप्रदीप प्रज्वालोनी, देई तमा घालवोनी, ४

गीता अ० १० श्लोक १२

**अर्जुन वदे :—** (राग :—धनाश्री किंवा यमन त्रिताल.)

परम पवित्र परधामा, शाश्वत पुरुष परब्रह्मा. ॥धृ०॥
जगन्नाथ निर्मल देवा, ब्रह्मा विष्णु सदाशिवा. १
परमदैवता अधितत्वा, मायातीता सद्भावा. २
अनादिसिद्धा सुखठेवा, जगत्पालका सर्वस्वा. ३
कृष्ण माधवा श्रीरामा, चराचराच्या विश्रामा. ४

**विशेष गीत** (चाल :—देवा कुठे गुतला)

देवा! तृप्त जाहलो, तव उपदेशामृत प्यालो. ॥धृ०॥
संसाराचा कचरा सारा, मायेचा हा सकल पसारा,
तूंच श्रीहरि, झाडला खरा, शुद्ध मानसीं मी झालो. १
जन्ममृत्युचें बंधन तुटलें, जन्माचें या सार्थक झालें,
रूप खरें तव दिसू लागलें, शरण तुला हरि मी आलो. २

गीता अ० १० श्लोक १३.

**गज़ल** ( राग :— बागेसरी, झपताल )

येत असती नित्य गेहीं आमुच्या नारदमुनि.
गाति ते तव नाममहिमा सुस्वरें आलापुनी. ॥ धृ ॥
लुटत होतो आजवरि त्या संगीताचा रंग रे,
कोण देतो लक्ष अर्थी यौवनाच्या मदभरें. १
धन्य ते ऋषिमुनिहि भेटुनि कथित होते तव कथा,
असित देवल बोध त्यांचा ऐकिला ना सर्वथा. २
मजसि गुरुवर व्यासमुनि ते अंकि घेउनि बैसती,
सांगती चरितें तुझीं धड ऐकिलीं नाहींच तीं ! ३

विषय महिमा तो असा कटु लागतें अध्यात्म रे.
कटु असुनि संसारविष परि लागतें मधु मधुर रे. ४
व्यास नारद ऋषिमुनि जे ज्ञानरत्नांची खनी
लाभलो परि मी अभागी दुर्मतिनी दुर्गुणी ? ५
बोध आतां जाहला परमार्थ तो कळला मला
आपणाचि जेव्हां स्वयें मज बोध देते जाहला. ६

गीता अ० १० श्लोक १४

( राग :–काफी मिश्र. त्रिताल )

झाली आत्मप्रतीती, केशवा. ॥ धृ ॥
कथिता आपण मज जी गोष्टी मानी सत्यचि मी ती
क्षुद्र बिचारे देवदानव जाणती न तव महति. १
भाग्यवंत मजसम जगिं कोण लाभे मज तव प्रीति.
ज्ञानकिरण अंतरीं चमकती, पटतीं मुनि वचनें तीं. २
शास्त्राध्ययन तपोसाधना कामा ना ये कधि तीं
गुरुकृपेविन कधि ती जगतीं होइ न भगवत्प्राप्ति. ३

गीता अ० श्लोक १५ ते १८

**गज़ल** (राग :–काफी)

जाणसी नत नाममहिमा तूच रे पुरुषोत्तमा,
भूतभाव जगत्पते हरि भक्तिचा तू चंद्रमा. ॥ धु ॥
ब्रह्माण्डनायक तू कुठें, अन् मी कुठें रे पामर !
पात्रता नाहीं ममांगीं, महत् अपुलें अंतर. १
चातका जशि मेघधारा बोध तव मजला हवा,
सांग ना अपुल्या विभूती सांग ना रे माधवा. ! २

दर्शवा दिव्या विभूती व्यापिती लोका तीन्ही
जाणण्या आतूर झालो, धीर ना आतां मनीं. ३
पाहु मी कोणामधें तुज करू कसा तव चिंतना,
सांग मज योगेश्वरा हरि सकल तव ते भाव ना ! ४
सांग देवा मज पुन्हा विस्तारुनीच जनार्दना,
पिउनि तव वचनामृताहि तृप्ति ना माझ्या मना. ५

विशेष गीत (राग :—बहार—त्रिताल)

हरि ॐ विश्वकर्मा परमधामा
परब्रह्मा रे अजन्मा ! ॥ धृ ॥
असित व्यास देवल नारद ही
कथिता प्रभो स्वयं आपण ही
सत्य मानि मी तव वचना ही
मुनिजन विश्रामा ! १
तव लीलामय स्वरूप देवा
न कळे कोणा देव दानवा
तूच जाणसी तुझिया भावा
कथि ते मनोरमा. २

गीता अ० १० श्लोक १९

श्रीभगवान वदे :— अभंग

( चाल :—चित्ती तुलाच ध्याते. )

मम विभूती अनंत, तया मीच रे जाणत. १
सांगतो तुज कांहि प्रधाना, हे प्रिय तात अर्जुना ! २
देव म्हणती तात पार्था, मान नुरे त्या सर्वथा ३
तात जगताचे असूनी, अहा! प्रेमाची पर्वणी ! ४

## विशेष गीत (ग़ज़ल)

अर्जुना तू अेक बापा तुजसि हृद्गत सांगतों,
तुजवरी मम प्रेम भारी म्हणुनि सत्पथ दावितो ॥ १ ॥
नेणती ते मद्विभूति ऋषिमुनि वा सुरगण
आदिकारण मी तयांचें अज्ञ ते या लागुन. १
बुद्धि ज्ञान अमूढताही सत्य करुणा दम शम,
दुःख सुख उत्पत्ति प्रलयहि भयाभय प्रतिमा मम. २
तुष्टि समता नी अहिंसा दानही जय अपजय,
माझिया पासोनि निर्मित भाव हे निःसंशय. ३
विश्वनिर्मित हें जहालें जाण रे मजपासुनी,
भक्तजन मम भजति मजला तत्व हें मनिं धारुनी. ४
अर्पुनी निज चित्त मानस गाति ते माझ्या कथा,
भक्तजन रममाण होती वासुदेवीं सर्वथा. ५

## विशेषगीत ( चाल :–पाणपोई )

अर्जुना घे दिव्य दृष्टि, या पहा माझ्या विभूति.
कां तुला पडलीच भ्रान्ति, या पहा माझ्या विभूति. ॥ धृ ॥
दिव्य ज्या ज्या वस्तु पाहे, तेज त्यांचे मीच आहे,
कां तुला पडलीच भ्रान्ति, या पहा माझ्या विभूति. १
मी अजन्मा मी अनादि, जाणती जे ते सुबुद्धि,
कां तुला पडलीच भ्रान्ति, या पहा माझ्या विभूति. २
जाणणें रे बहु कशाला, विश्वव्यापि या धरेला
अंशमात्रें व्यापिली ती, या पहा माझ्या विभूति. ३
भक्त तो दिङ्मूढ होई, नमन करितो ठायिं ठायीं
ती अनन्या मीच भक्ति, या पहा माझ्या विभूनि. ४

## गीता अ० १० श्लोक २० ते ४२

### गज़ल ( राग :–दुर्गा )

मम विभूति अनंत रे सांगतो तुज अल्प मी,
सर्व भूतीं मीच आत्मा आदि मध्य नि अंत मी. ॥ ध्रु ॥

मी असे अदितींत विष्णु ज्योतिमध्यें सूर्य मी,
मारूतांमधि मी मरीची तारकांमधि चंद्र मी. १

वेदिं मी रे सामवेद देवतांमधि इन्द्र मी,
इन्द्रियांमधि मीच मन हें चेतना भूतांत मी. २

सांब तो रूद्रांत मी रे यक्ष असुरिं कुबेर मी,
वसुमधें मी अग्निदेव पर्वतांत सुमेरु मी. ३

गुरुजनांत बृहस्पती मी सैनिकांत स्कंद मी,
जलधिमध्यें मीच सिंधू जाण मज तू नेहमीं. ४

ऋषिमुनीमधि भृगुऋषि मी अक्षरीं ॐकार मी,
स्थावरीं हिमगिरिही मीच यज्ञि तो जपयज्ञ मी. ५

अश्वि मी उच्चैःश्रवा अन् तो गजीं ऐरावत,
रे नरांमधिं नृमणि मी तो आणि मत्स्यीं मकर मी. ६

शुद्धिकर्ता पवन मीच मार्गशीर्षहि मास मी,
द्यूत मी छलकपट मी अन् त्या समासीं द्वंद्व मी. ७

देवऋषिमधिं नारद अन् वृक्षिं त्या अश्वत्थ मी,
चित्ररथ गंधर्वि मी अन् कपिलमुनि सिद्धांत मी. ८

धेनुमध्यें कामधेनु वज्र आयुधांत मी,
प्रजनकर्ता काम मी अन् वासुकी सर्पांत मी. ९

काल अक्षय जाण मी रे, जन्म मृत्यु तोहि मी,
कीर्ति श्री वाक् नारिमध्यें स्मृति क्षमा मेधाहि मी. १०

सर्व ऋतुमाजीं वसंत छंदरांस गायत्रि मी,
जयहि मी व्यवसाय मी अन् सात्विकांचें सत्व मी. ११
वृष्णिवंशीं वासुदेव पांडवीं अर्जुनहि मी,
कविमधें उशना कवि मी मुनिमध्यें श्री व्यास मी. १२
दमन मी रे दंड मी अन् मौन मी विज्ञान मी,
तें चराचरबीज मी रे सर्व ठायीं मीच मी १३
दिव्य तेजस्वी गुणी जन जे जगीं तू पाहसी,
प्राण ते माझे सख्या तेजांशुरूपें त्यांत मी. १४
विश्वरूपें मम अनंत नेणती कोणी जगीं,
जाण तू हें या जगातें अंशुमात्रें व्यापि मी. १५

गीता अ० १०, श्लोक ४१ व ४२

## विशेष गीत

( रागः– तिलककामोद, त्रिताल )

बघसी तू ज्या नररत्नांना
श्रीमंतांना उर्जीतांना
सुंदर सकलैश्वर्ययुतांना
मम तेजांशच निर्मी त्यांना ॥ ध्रु० ॥

पार नसे रे मम रूपांना
सार हेंच तू घेइ अर्जुना
व्यापियलें मी अेकांशानें
चराचरमय जग हें बघ मा ! ॥ १ ॥

इतिश्री गीतज्ञानेश्वरीचा विभूतियोग नामें दहावा अध्याय समाप्त

ॐ तत्सत्‌ब्रह्मार्पणमस्तु.

# अध्याय ११ वा

## विश्वरूपदर्शनयोग

### प्रास्तविक गीत

(चाल :–जय दुर्गे दुर्गतिहारिणी.)

निशिदिनी मनीं श्रीकृष्ण स्मरावा,
अंतरिं गीताबोध धरावा. ॥ धृ० ॥

अकरावा अध्याय पवित्र
माना प्रयाग तीर्थक्षेत्र
त्रिवेणिसंगम झाला अत्र
घेइ इथें भगवंत विसावा. १

संगमिं सकल करा आंघोळी
संसाराला द्यावि तिलांजलि.
विमुक्त व्हा देखुनि या डोळीं
विश्वनाथ श्री बिंदुमाधवा. २

देवाला विश्वरूप दर्शविण्यास्तव विनविण्यापूर्वी अर्जुनाची मन:स्थिति

( चाल : अमलकंद हसत मद. त्रिताल. )

देवा विनवु कसा !
विश्वरूप हरिचें बघण्याची
लागे लालसा. ॥ धृ० ॥

कमलादेवी प्रिय गोपाला, धैर्य वदाया होइ न. तिजला,
काय अधिक मी त्या श्रीहरिला, झालो मात्र पिसा. १

गरूडापाठीं बसे श्रीहरि, तोहि बिचारा भीतो अंतरिं,
सनकादिकसम दोन हात दुरि, नच मी त्यांजसा. २

गोकुळिचे ते गोपगोपिजन, बालकृष्ण बघुनीच प्रसन्न,
अंबरिषास्तव ये अवतरुन, भोगी गर्भदशा ! ३

विराट विश्वरूपा त्या अपुल्या, दावियले ना परी कुणाला,
दिसेल कां तें या नयनांना, पुरेल कशि मनिषा ? ४

गीता अ० ११ श्लोक १ ते ४

अर्जुन वदे :— (राग:—बागेसरी. त्रिताल : चाल :—प्रेम नच जाई.)

कळला मला, आशय,
बोध मना झाला. ॥ धृ० ॥

अहंभाव हरपला सकलही,
मायावलयहि विलया जाई,
ममतेचें तर नुरे नांवही,
मोह पार गेला. १

भूतांचें तें होणें जाणें,
अव्ययत्व आत्म्याचें असणें,
आत्मज्ञान तूं विस्तारानें,
कथिलें हरि मजला. २

जसे वर्णिता आपण अपणा,
विराट रूपा मज दावा ना !
नयनें उत्सुक झाली बघण्या,
ऐश्वर्या अपुल्या. ३

अव्यय रूपा बघण्यास्तव मी,
पात्र आपणा जरी हरि गमी,

दर्शन द्या योगेश्वर स्वामी,
सकल लोकपाला ! ४

गीता अ० ११. श्लोक ५ ते ८

**गज़ल** ( चाल :–चित्ती तुलाच ध्याते. )

**श्रीभगवान वदे :—**

मम जिवलगा सख्या रे, रूपें पहा पहा रे !
हीं शेकडो हजारो, रूपें पहा पहा रे ! ॥ धृ० ॥

नानाविध दिव्य किती, नाहि त्यांचि गणती,
वर्णाकृति अमित रे, रूपें पहा पहा रे ! १

वसु अर्क अश्विन मरूत, रूपें बहू अपूर्व,
आश्चर्यमय अनंत, हीं भारता महा रे ! २

तनु कोपऱ्यांत जगत, बघ चराचरासहित,
जें जें तुला हवें रे, तें तें मयीं पहा रे. ३

झालासि काय शांत, घे दिव्य दृष्टि पार्थ,
मग योगशक्ति माझी, ऐश्वर्य हें पहा रे ! ४

गीता अ० ११ श्लोक ९

**संजय वदे :–** **अभंग**

( चाल :–रघुनंदन आले आले. )

आजी उदेला या भुवीं, अर्जुनाचा भाग्यरवि. १
मिळे सकलांना प्रकाश, पुण्य आलें फळा खास. २
देव दावी विश्वरूप, ब्रह्मसुखमय अमूप. ३
लक्ष्मी गरुड शुकदेवा, कां न हेवा हो वाटावा ? ४
ध्रुवा प्रसन्न होउनी, शंखस्पर्श केला ज्ञानी. ५

दिव्य दृष्टी तशि देऊन, केलें अर्जुना पावन. ६
रूप दिसें यशोदेला, तैसें आज अर्जुनाला. ७
विश्वरूपाचे ते रंग, जणू सिंधूचे तरंग. ८
जणू भूमीवरी अनादि, मांडियेलीं चित्रें आदि. ९
अहो, आकाशें पाताळें, विश्वरूपीं लय पावले. १०
आणि तैशा दाहि दिशा, झाल्या झाल्या ना नाहींशा! ११
अहो, विश्वरूपापोटीं, लुप्त झाली सकल सृष्टि. १२
चतुर्भुज मूर्तीच्या त्या, दिसति अनंत आवृत्या. १३
अहो, बिचारा तो पार्थ, भ्रमे आश्चर्य गरकांत. १४
विश्वरूपाचें दर्शन, सकल ऐश्वर्याची खाण. १५
आला ब्रह्माण्डाचा राणा, चला चला हो दर्शना. १६
जीव टाका ओवाळून, नजराणा हो म्हणून ! १७

गीता अ० ११. श्लोक १०

## अभंग

(चाल :– नाथ तुम जानत हो सब घटकी.)

विश्वरूप अपार वदनीं. जणु लावण्याच्या खाणी. १
मुख सौंदर्य कमाल, सकल सुखाचे महाल. २
पार्थ पाही निज डोळा, अनंत डोळीयांच्या माळा. ३
भासतातीं ती नयनें, जणु कमलांचीं उपवनें. ४
अहा, डोळीयांचें तेज, जणु मेघामाजीं वीज. ! ५
आणि दुजीं भयंकर तोंडें, जणु जळतीं अग्निकुंडें. ६
आणि अनत त्या हातीं, अनंत आयुधें चमकती. ७
जीवरूप देहरूप, वस्त्ररूप शस्त्ररूप. ८
ऐसें अद्भुत स्वरूप, पार्थ पाही विश्वरूप. ९

गीता अ० ११ श्लोक ११ ते १४

**अभंग** ( चाल :–उगाच मी रुसले. )

अहा ! देवाचीया गळां, रुळती तेजस्वी त्या माळा. १
कमरेचा पीतांबरु जणू सुवर्णाचा मेरु. २
दिव्य सुगंधाचे लेप, लावी अंगाला निर्लेप. ३
सकल आश्चर्याची खाण, विश्वतोमुख तें महान. ४
पार्थ जेथें जेथें पाही, देवावीन न दिसें कांही. ५
म्हणुनी नयनें केलीं बंद, तरी दिसे सच्चिदानंद ! ६
जरी हजारो ते रवि, प्रकाशले हो या भुवीं. ७
सरी न ये त्यांना साची, विश्वरूपाच्या तेजाची. ८
विश्वरूपीं जगतावली, अनेक भेदांचीं तीं जाळीं. ९
अनेक जगतांचे ते मेळे, जणु मुंग्यांचीं वारुळें ! १०
देखुनीया त्या रूपाला, पार्थ विस्मयीं पडला. ११
शांत झालीं अवघीं गात्रें, प्रेमें आसवलीं नेत्रें. १२
अंगीं रोमांच उभेले, झरती स्वेदाची बिंदुलें. १३
भावें देवाला नमूनी, पार्थ बोले ऐसी वाणी. १४

गीता अ० ११ श्लोक १५

(राग :– बहार त्रिताल)

हे अनंत विश्वाधार !
हे परब्रह्म ॐकार !
हो तुझाच जयजयकार. ॥ध्रु. ॥

गिरिवरि असती श्वापदें गुहीं
सकल लोक तेवी तव देहीं,
तरूवरि विहंगांच्या माळ्यांसम
तुझ्यांत हे संसार ! १

स्वर्गलोक तो देवांसहित
तुझ्यांत जीवांसह हें जगत,
ब्रह्मलोक तो लोकही सत्य,
शिवलोकहि ,साचार. २

सांबसदाशिव शंभु पार्वती
ब्रह्मदेवही तुझ्यांत वसती
कश्यपादि मुनि सर्पहि न मिति,
करिती त्वयिं संचार. ३

तवावयविं चौदाही भुवनें
चित्रें जणु वा कविची कवनें,
त्यांतिल प्राणी जणू खेळणीं
तुझींच अपरंपार ! ४

गीता अ० ११, श्लोक १६

(चाल :-वेल सुकुमार नवतीचा बहर किंवा राग :-शंकरा-खमाज मिश्र)

तू अजन्मा तू स्वयंभू
तूच अंबा तूच शंभु
तूच ब्रह्मा तूच विष्णु
आदि देव तूच कृष्ण ॥ धृ० ॥

सर्व ठायीं तूच कृष्ण
कांहि नाहीं तूजवीन
आदि नाहीं नांहि मध्य
नांहि अंत तू अनंत ! १

अमित बाहू अमित उदरें
अमित वक्त्रें अमित नेत्रें

विश्वरूपीं पाहतां रे
शीणलो रे, शीणलो रे! २

अमित मूर्ती त्या सुरांच्या
विश्वकर्त्या विश्वहंत्या
पाहतो मी तूझियांत
हे अनंत! हे अनंत! ३

कोण तुम्ही कोठले हो ?
गूढ सांगा ना मला हो!
मानिले मी मनुज तुम्हा
मायबापा पदरिं घ्या हो! ४

गीता अ० ११ श्लोक १७

(चाल:– कृष्णातिरींच्या बसणाऱ्या.)

किरिटें चक्र गदा नाना, तेज चढें अद्‌भुत त्यांना ॥ धृ० ॥
प्रखर भूषणें तीं नाना, दिव्य दृष्टिहीं बघवेना. १
आश्चर्यहि मज करवेना, बुद्धि कुंठली दयाघना. २
तेजाच्या या सिंधूंत, सृष्टीचा दिसतो अंत. ३
अग्नीचें काजळ झालें, सूर्यतेज विलया गेलें. ४
तेजाच्या राशी नाना, ज्वाला व्यापिति त्या गगना. ५
पंचभुतात्मक शरिरें तीं, जळुनी झालीं भस्म किती! ६
दिव्य अलौकिक हा होम, ब्रह्माण्डहि झालें भस्म! ७
श्रीहरि मजसी वाचवि ना! शरण मी आलो तव चरणा. ८

गीता अ० ११ श्लोक १८, १९

( चाल:- घटका जाति पळें हि जाती सारखी )

परब्रह्म ॐकारातीता । प्रणतवत्सला दीनानाथा. ॥धृ०॥
धाम आपुलें न दिखे मजसी । हे अव्यय स्वामी अविनाशी. १
धर्मजीवना अनादिसिद्धा । नित्यनूतना श्रुतिप्रतिपाद्या. २
सनातना त्रयलोकस्वामी, तुज नमितो मी, तुज नमितो मी. ३
रविशशि नेत्र अनंत हस्त, आदि मध्य तुज नाहीं अंत. ४
तुझ्या मुखातुनि निघती ज्वाला, दाहति त्याना या विश्वाला! ५

गीता अ० ११ श्लोक २०

**गजल** ( चाल :- भरा दरबार सोने का )

कसा पाहू किती पाहू कुठें पाहू कुणा पाहू ?
कळेना कांहि मजलागी विश्वरूपा कसा खेवूं? ॥ धृ० ॥

सकल भुवनें तिन्ही लोक, दिशा आदि तुझ्या रूपीं,
बुडाल्या रे, बुडाल्या रे, कुठें जाऊ कुठें राहू ? १

सहन होई न तव तेज, जगत झालें महा दुःखी,
अतां हें प्राण वाचविण्या, तुझ्यावीना कुणा ध्याऊ? २

अम्ही व्हावें भयाभीत, दर्शनें विश्वरूपाच्या
नवल वाटें दुःख दाटें, अशा दुःखा कसा साहू ? ३

कशाला प्रार्थिले मी रे, तुला हें रूप दावाया ?
बरा संसार सुखि होता, अतां कोणा जगीं चाहू ? ४

दुःखि संसार तो मागे, पुढें त्रिकाळ तव रूप,,
चिरडलें जात ब्रह्माण्ड, तरफडति जीव करिति टाहो! ५

गीता अ० ११ श्लोक २१ व २२

( राग:– काफी. त्रिताल )

ज्ञानी झाले लीन, रूपीं. ॥ धृ० ॥

तव तेजांतरिं जाळुनि अवघ्या निज कर्मांस मलीन,
आणि कुणी भयभीत बिचारे प्रार्थिति होउनि दीन. १

सोडवि आम्हा संमोहांतुन सर्वस्वी स्वाधीन,
ऋषिमुनिगण ते साधुसंतही तव स्तवनीं तल्लीन. २

रुद्रादित्य साध्य वसु मरुत यक्ष सिद्ध अश्विन,
विस्मित होउनि गंधर्वहि ते नमिती तुज स्वामिन्, ३

गीता अ० ११ श्लोक २३ व २४

( राग:–दरबारी कानडा. त्रिताल )

रूप भयंकर रे ! तूझें, ॥ धृ० ॥
अनंत वक्त्रें अनंत नेत्रें
अनंत बाहू अनंत उदरें
उर चरणा तर नाहिं अंत रे
बघवे ना मज रे ! १

रुधिरभरित त्या दाढा लाल
अति कराल विक्राळ विशाल.
भीतो बघुनी त्यांना काल
सुरनर भयभित रे. २

कीं आतंकें प्रलय मांडिला,
कीं शंभू करि संहाराला,
जगदंबेचा क्रोध भडकला
काल मूर्त विचरे. ३

अखिल जगत हें झालें दीन
दुःखामाजीं जाई बुडुन.
वर्णु काय स्थिति माझी करुण
कंप सुटे मज रे. ! ४

रुद्रानेंही मजला भ्यावें,
पराक्रमी मी असा स्वभावें
उभे न परि मज इथें राहवे
त्राहि त्राहि हरि रे ! ५

अमित मुखें दावानलराशी,
अनंत उदरें फार उपाशीं,
अेकच ग्रासें विश्वा गिळिसी ?
जिव्हा चाटसी रे ! ६

देहभान मम विलया गेलें,
चैतन्यहि तें विरमु लागलें,
बुद्धि हरपली मनहि हरपलें,
अमरात्माहि मरे ! ७

गगनस्पर्शि ते अनेक वर्णीं
व्यात्तानन अन् प्रदिप्त नयन
पाहुनिया प्रव्यथित मन्मन.
शमि रे विष्णु हरे ! ८

ग्रासशील कां अवघ्या विश्वा ?
घेऊ कोठें सांग विसावा ?
धीर न धरवे माझ्या जीवा,
राम गोविंद हरे ! ९

गीता अ० ११ श्लोक २५ ते ३०

( चालः– तें रूप पाहू चला )

आवरि रे तव माया, बापा.
प्राणांतिक वेदनामधुनिया वाचवि रे प्रभुराया! ॥ धृ० ॥

कालालाहो ना भीणारा
भीती माझी वाटे असुरां
लागे मी कंपाया. १

मृत्यूहुनि हे रूप भयंकर
विश्वाला कां हो प्रलयंकर
आला तुम्ही गिळाया? २

किति प्रचंड विक्राळ मुखें तीं
दाढां दातां नाहींच मिति
शस्त्रांच्या रांगा या ! ३

तारक तू ना कृष्ण मुरारे ?
संहारक झालास कसा रे ?
दुःखि बुडाली दुनिया ! ४

देखुनिया विक्राळ रुपाला
वेडा झालो, आला आला
अंतच माझ्या धैर्या. ५

अहो वीर हे कौरवकुलिचे
योद्धे तेही अवघे अमुचे
गेले तुझ्या मुखीं या ! ६

किती मढीं तव दांतिं गुंतलीं
किति वीरांचीं डोकीं फुटलीं
लागलासि चावाया ! ७

कौरव पांडव गेले मिटले
सकल तुझ्या आननांत दडले
लागसि तयां गिळाया ! ८

हौसच फिटली विश्वरूपाची
शंभर वर्षें भरलीं अमुची
यत्न मानवी वाया ! ९

नद्या जशा सिंधूत वाहतीं
सकल वीर तव मुखीं लोपती
शक्त न कुणि वाचाया ! १०

पतंग घाली झडप ज्योतिवरि
तसे जीव हे तव वदनांतरि
जाती सारे विलया ! ११

सकल जिवांना स्वः करोनी
जिभा चाटसी तू फिरफिरुनी
तरी भुकेला भैया ! १२

तुझी प्रभा ती अतिशय उग्र
तिनें व्यापिलें विश्व समग्र
गोष्टि न तव गावीं या ? १३

नको उग्रता दावू आतां
जगत्पालका हे भगवंता
लागे तुझ्या पाया ! १४

गीता अ० ११ श्लोक ३१

(राग :—दुर्गा त्रिताल.)

आपण कोण कोठुनी आला ?
देवा ! सांगा ना हो मजला ! ॥ ध्रु ॥

उग्र वृत्ति ही धरिलि कशाला ?
शस्त्रें करिं कां उचित दयाळा ?
क्रोधें आली लाली डोळां ?
कां भय दर्शविता आम्हाला ?
व्यापें लाजविलें गगनाला !
कां हो आला क्रोध तुम्हाला ? १

मस्तक नमवी मी चरणांना.
प्रसन्न व्हा ना दीनदयाळा ! २

गीता अ० ११ श्लोक ३२ ते ३४

श्रीभगवान वदे:— ( राग :—बहार त्रिताल. )

मी कालरूप राया
क्रूरांना या संहाराया
धरि अवतारा या. ॥ धृ ॥

वीर सकल हे दंभी दुर्मति
यमालाहि जे अवमानीती
देहबलाचा गर्व वाहती
गर्वा उतराया. १

शस्त्राहुनिही तीक्ष्णच करणी
अग्निहुनिही दाहक वाणी
हलाहलहि तें भलें यांहुनी
मत्तां जिरवाया. २

भंडारच गंधर्व नगरिचे
गुच्छे किंवा गगन फुलांचे

निर्जिव बाहुलेच चिध्यांचे
धुळींत मिळवाया. ३

संहारातुनि तुम्हि वाचाल
करीन तुमचा मी प्रतिपाळ
नेक तुम्ही रे पांडवबाळ,
दुर्जन दंडाया. ४

केलें मृतवत् कधींच यांना,
निमित्त तू परि होइ अर्जुना,
खुशाल मग यश राज्य भोगि ना,
झुंजी कौंतेया. ५

द्रोण भीष्म हे कर्ण जयद्रथ,
केलें सकलां मीच समाप्त
खिन्न न होई न धरी भीत,
घे यश जिंकुनिया. ६

गीता अ० ११ श्लोक ३५

संजय वदे:— (राग:– काफी त्रिताल)

नमितो गोपाला. अर्जुन, ॥ धृ ॥

श्रीरंगाचें वचन परिसुनी,
थर थर कंपित कर जोडोनी
'कालाय नमः' असें म्हणोनी
लागे भजनाला. १

कंठ तयाचा भरुनी आला
पुन्हा पुन्हा तो धरि पदकमला,
प्रेमाश्रूंनीं न्हाणि तयांना,
तल्लीनचि झाला. २

गीता अ० १० श्लोक ३६ व ३७

**अर्जुन वदे** :— (चाल :–सुख साधना, भजनागणा.)

तव कीर्ति रे ती परिसुन, जग डोलतें आनंदुन. ॥ धृ ॥
ते राक्षस दाही दिशा, पळती दुरी तुज भिऊन,
मुनि साधु ते नमिती तुला, फिरूनी प्रभो करिती नमन, १
ब्रह्मादिक तव निर्मित, धरिताति ते अपुले चरण,
तू अक्षर सतसत्पर, सर्वेश्वरा जगकारण. २

गीता अ० ११ श्लोक ३८ ते ४६

(चाल :–जय करुणाघन निजजन जीवन.)

तू आदिदेव पुरूष पुराण
रे तूंच विश्वास परंनिधान
वेत्ताहि तूच तू वेद्य ज्ञान
तूझ्यामुळें हें जग भासमान. १

वायुर्यमोग्निर्वरुण शशांक,
प्रजापते तू प्रपिता महाच्च,
अशा तुला रे शतशः नमून
पुन्हा पुन्हा ही लववीत मान. २

मागे पुढे तूच तुला प्रणाम
सर्वत्र बापा तुजला प्रणाम
विश्वीं तुझा विक्रम तो महान
आहेसि सर्वातरि तू समान. ३

सखा म्हणोनी तुज बाहिले मी
हे कृष्ण हे यादव आदि नामीं

महिमा तुझा तो मनिं ना स्मरून,
प्रमाद केले अति लाडवून. ४

केलेत तूझे उपमर्द नाना
शय्येंत खेळांतहि जेवताना,
अेकांति वा रे सकलां समोर
उदरांत घाली अपराध घोर ५

चराचरांचा तू बाप थोर
गुरुराज पूज्य संसारसार
त्रिलोकिं देवा तुझिया समान
नाहींच, तूझ्याहुनि श्रेष्ठ कोण ? ६

म्हणोनि देवा प्रणिपात घ्यावे,
माझ्यावरी नाथ प्रसन्न व्हावें,
पिता सुतालाहि सखा सखीला,
तसे तुम्ही घ्या पदरीं अम्हाला. ७

अपूर्व रूपा बघुनी हरी रे,
संमुग्ध झालो मनिं मी परि रे,
व्यथा मनाला जडली भयानें,
तें रूप दावी तरि तू दयेनें. ८

चक्रादि हातीं शिरिं तो किरीट,
दावा पुन्हा तें सगुण स्वरूप,
हे विश्वमूर्ते मज धैर्य द्यावें,
या लाडक्याचें मन नीववावें. ९

गीता अ० ११. श्लोक ४७ ते ४९

**श्रीभगवान वदे:—** गज़ल ( राग :— मांड )

**ममात्मयोग रचित हें दिव्य विश्वध्यान,**
**दिसलें तुलाच पार्था मद्भक्त तू म्हणून. ॥ धृ० ॥**

ब्रह्माण्डव्यापि रूप घडलेंच ज्ञानतेजें,
हें सकलवस्तुमूळ निश्चल अनंत मान. १

म्हणताति 'नेति नेति' ते वेदही जयाला,
तप यज्ञ अध्ययनही कामा न येइ ज्ञान. २

होई मुळीं न व्यथित होऊ नको विमूढ,
या रूपदर्शनानें मानी स्वतःस धन्य. ३

हें रूप हेमगिरि वा अमृतसमुद्र मान,
कीं कामधेनु लाभे चिंतामणीसुखाण. ४

न धरी मनांत भीत पाहीच प्रेमभावें,
हें कृष्णरूप फिरुनी होऊनिया सभान. ५

गीता अ० ११ श्लोक ५०

संजय वदे :—

गज़ल

( राग :–माड. चाल : वरील गीताचीच)

अैसे म्हणूनि देवें निज बालकृष्णरूप,
दावोनि अर्जुनाला केलेंच धैर्यवान. ॥ धृ० ॥

तें विश्वरूप वसन रुचलें न अर्जुनाला,
तो कृष्णरूपिं सान दावी घडी करून. १

हो शिष्यहट अैसा गुरु कोण करिल पूर्ण ?
जगिं दास पार्थ जैसा श्रीकृष्णसा गुरु न. २

गीता अ० ११ श्लोक ५१

पाहुनि बालसखा, अतां हें मम झालें शांत,
गेली ती भीत, अतां मी आलो भानांत. ॥धृ०॥

विमूढ होतो मी, लोपला असे अहंकार,
शांतच झाले रे, सकलही इन्द्रिय व्यापार. १

शरीरग्रामीं या, माजली होती बंडाळी,
शांतविली देवा, फिरुनि तू होउनि वनमाळी. २

विश्वरूपसिंधूत, तरंगत निष्फल होतो मी,
सगुणमूर्तितीरा, नेइ प्रभु नावाडी नामी. ३

हृदय शुष्क माझें, जाहलें होतें श्रीरामा,
बोधवृष्टि करुनी, हरितलें पुन्हा घनश्यामा. ४

आतां श्रीरंगा, कधि न मी सोडिन तव पाय,
आण तुझी घेतो, तूचि मम सखा बाप माय. ६

गीता अ० ११. श्लोक ५२ ते ५५

**श्रीभगवान वदे :—** ( राग :– भैरवी. दादरा. )

भाग्य उदेलें तुझें भाग्य उदेलें,
कुणि न देखिलें तें तूंच देखिलें. ॥ धृ० ॥

ज्यास्तव श्रीशंकरही जोगि जाहले,
कैलासीं जाऊनि तप करित बैसले,
विश्वरूप तरिहि तयां नाहिं गवसलें,
नाहिं गवसलें, नाहिं गवसलें, तें तूंच देखिलें. १

योगीजन शीण होति योगसाधनीं,
रटण करिति जन्मभरी नाम ऋषिमुनि,
विश्वरूप तरिहि तयां नाहिं गवसलें,
नाहिं गवसलें, नाहिं गवसलें, तें तूंच देखिलें. २

मेघांची चातक जशि वाट पाहती,
देव मनुज मम दर्शन सकल वांछिती,

विश्वरूप अर्जुनि कुणा नाहिं गवसलें,
नाहिं गवसलें, नाहिं गवसलें, तें तूंच देखिलें. ३

दिसत न जें तपध्यानें वेदाध्ययनें,
पावन झालासि विश्वरूप दर्शनें,
विश्वरूप अर्जुनि कुणा नाहिं गवसलें,
नाहिं गवसलें नाहिं गवसलें, तें तूंच देखिलें. ४

## विशेषगीत. अभंग

( राग:–भैरव )

प्रभु द्वारकेचा राणा, मग बोलला अर्जुना. १
जैशा अनंत वर्षाधारा, आकाशातुन येती धरा. २
गंगा धावे सिंधूकडे, तैसा भक्त ये मजकडे. ३
जीव अवघे सान महान, स्थावर जंगम मन्मय जाण. ४
सम झाली चित्तवृत्ति, तिचें नाम परमा भक्ति. ५
अैशा भक्तीनें मी जाण, बापा झालो भक्ताधीन. ६
काष्ठ अग्निरूप होई, तदा काष्ठ नाम जाई. ७
सूर्यचंद्राचा प्रकाश, होतां तिमिर पावे नाश. ८
विश्वरूपाची प्रतीती, अहंकार नूरें चित्तीं. ९
होई भक्त मत्स्वरूप, ब्रह्मसुख घे अमूप. १०
अैशा भक्ता आलींगाया, धावुनी ये मी कौंतेया. ११
पडू न दे कसली वाण, आण तुजी घेतो जाण. १२

गीता अ० ११. श्लोक ५५

## विशेषगीत ( राग:–भैरव. त्रिताल. )

मजस्तव कर्म सदा करी,
सर्वस्वी मज स्वीकारी. ॥ ध्रु० ॥

राहुनिया निःसंग सदा,
सकलांवरि मनिं प्रेम धरी. १

भेटिन तुजला मी अंतीं,
वचन तुला हें देइ हरि. २

## भावांजली

( राग :–भैरवी. त्रिताल. )

विश्वरूपा नमनें तुला. ॥ धृ० ॥

भरुनी भावांजली,
ओविलीं फुलें मोकळीं,
अर्पितो अंघ्रियुगलीं,
विश्वरूपाचिया मंगला ! १

इतिश्री गीतज्ञानेश्वरीचा विश्वरूपदर्शनयोग नामें अकरावा अध्याय समाप्त

ॐ तत्सत् ब्रम्हार्पणमस्तु.

# अध्याय १२ वा

## भक्तियोग

### गुरुस्तवन अभंग (रागः– भीमपलास)

गुरुकृपे अंबेमाते, करी उपराम बाळातें. १
संसाराच्या वृत्तीतून, बोध अंगाई गाऊन. २
गुरुकृपे कल्पलते, पुरवि कोड मम सर्व ते. ३
गुरुकृपे मायबाई, घेई पदरीं मज लवलाही. ४

गीता अ० १२ श्लोक १

### अर्जुन वदे :— अभंग ( राग :–दरबारी कानडा)

तदा अर्जुन म्हणे देवा, नित्य बोध मज द्यावा. १
प्रभु सगुण साकार, आणि निर्गुण निराकार. २
कोणी उपासती त्या सगुणा, कोणी ध्याती निरंजना. ३
भक्त किंवा योगीजन, योगमर्मज्ञाते कोण ? ४

### विशेषगीत

दोन प्रकाराचे, भक्त तव असती जगतांत. १
भजती व्यक्तरुपा, कुणी ते ध्याती अव्यक्त. २
उभयामाजीं रे, कोण तुज उत्तम ते गमत? ३
सांगे कृष्ण सख्या, जाणण्या उत्सुक मी बहुत. ४

गीता अ० १२ श्लोक २

श्रीभगवान वदे :— अभंग

नाम ध्याती निरंतर, जया मीच प्राणाधार. १
जयांमयीं प्रेमभाव, जणु गंगौघ अपूर्व. २
झाले मद्रूपीं तल्लीन, तयां खरें योगज्ञान. ३
करिति सगुणोपासना, तेची भक्त योगी जाणा. ४

गीता अ० १२ श्लोक ३ व ४

अभंग

मांडोनीया योगासन, आणि समाधी लावुन. १
करीताती प्राणायाम, योगी होऊनी निष्काम. २
निराकार निरंजनीं, मन लावोनी निर्वाणीं, ३
इंद्रियांना समवून, समबुद्धीतें वरून. ४
जनकल्याणीं जे रत, तेची माझें परम भक्त. ५

गीता अ० १२, श्लोक ५

अभंग

परी अव्यक्तोपासनीं, क्लेश अधिकतर मानी. १
कामक्रोधादि साचार, देती उपद्रव अपार. २
निराकारीं मन लावणें, जणू नभाशीं भांडणें. ३
तृषा तृषें भागविणें, क्षुधा क्षुधें शांतविणें. ४
सदा दुःखची भोगणें, आणि मृत्यूशीं झुंजणें. ५
भक्तिमार्ग म्हणुनी सोपा, सहज लाभे ईशकृपा. ६

गीता अ० १२ श्लोक ६ व ७

अभंग ( रागः– बिहाग )

निज काया वाचा मन, मज केले समर्पण. १
निज अवघीं कर्मे जयें, मज अर्पीयेलीं स्वयें. २

गीतज्ञानेश्वरी

# अध्याय १२ वा

## भक्तियोग

### गुरुस्तवन अभंग (रागः– भीमपलास)

गुरुकृपे अंबेमाते, करी उपराम बाळातें. १
संसाराच्या वृत्तीतून, बोध अंगाई गाऊन. २
गुरुकृपे कल्पलते, पुरवि कोड मम सर्व ते. ३
गुरुकृपे मायबाई, घेई पदरीं मज लवलाही. ४

गीता अ० १२ श्लोक १

### अर्जुन वदे :— अभंग ( राग :–दरबारी कानडा)

तदा अर्जुन म्हणे देवा, नित्य बोध मज द्यावा. १
प्रभु सगुण साकार, आणि निर्गुण निराकार. २
कोणी उपासती त्या सगुणा, कोणी ध्याती निरंजना. ३
भक्त किंवा योगीजन, योगमर्मज्ञाते कोण ? ४

### विशेषगीत

दोन प्रकाराचे, भक्त तव असती जगतांत. १
भजती व्यक्तरुपा, कुणी ते ध्याती अव्यक्त. २
उभयामाजीं रे, कोण तुज उत्तम ते गमत? ३
सांगे कृष्ण सख्या, जाणण्या उत्सुक मी बहुत. ४

गीता अ० १२ श्लोक २

श्रीभगवान वदे :— अभंग

नाम ध्याती निरंतर, जया मीच प्राणाधार. १
जयांमयीं प्रेमभाव, जणु गंगौघ अपूर्व. २
झाले मद्रूपीं तल्लीन, तयां खरें योगज्ञान. ३
करिति सगुणोपासना, तेची भक्त योगी जाणा. ४

गीता अ० १२ श्लोक ३ व ४

अभंग

मांडोनीया योगासन, आणि समाधी लावुन. १
करीताती प्राणायाम, योगी होऊनी निष्काम. २
निराकार निरंजनीं, मन लावोनी निर्वाणीं, ३
इंद्रियांना समवून, समबुद्धीतें वरून. ४
जनकल्याणीं जे रत, तेची माझे परम भक्त. ५

गीता अ० १२, श्लोक ५

अभंग

परी अव्यक्तोपासनीं, क्लेश अधिकतर मानी. १
कामक्रोधादि साचार, देती उपद्रव अपार. २
निराकारीं मन लावणें, जणू नभाशीं भांडणें. ३
तृषा तृषें भागविणें, क्षुधा क्षुधें शांतविणें. ४
सदा दुःखची भोगणें, आणि मृत्यूशीं झुंजणें. ५
भक्तिमार्ग म्हणुनी सोपा, सहज लाभे ईशकृपा. ६

गीता अ० १२ श्लोक ६ व ७

अभंग ( रागः— बिहाग )

निज काया वाचा मन, मज केले समर्पण. १
निज अवघीं कर्मे जयें, मज अर्पीयेलीं स्वयें. २

आणि जयें निज चित्त, केलें मज समर्पित. ३
अैसे दुर्मिळ भक्तजन, तेची माझे रे स्वजन. ४
त्यांच्या संसाराची चिंता, वाहतो रे मीच पार्था. ५
आला जरी त्यावरि घाला, त्याची लाज वाटे मजला. ६
संसारातुन त्या ताराया, घेई मीच अवतारा या. ७
त्यांचीं कामें मीच करी, त्यांचीं विघ्नें दूर सारी. ८
माझ्या नामाच्या त्या नौका, तयां भवसिंधुतारका. ९
भक्त माझे रे साचार, केला पशूंचाहि उद्धार. १०
चिंता करू नको वाया, सज्ज भक्तां मी ताराया. ११
म्हणुनि टाकी भवासक्ति, करी अनन्य माझी भक्ति. १२

## विशेषगीत

माझ्या सगुण रुपा, भजति जे अनन्य भावानें
मानी मी त्यांना, भक्त अत्यंतच प्रेमानें ॥ ध्रु० ॥
वश करुनी अवधीं, इन्द्रियें भजती ब्रह्मरुपा.
रत जे भूतहितीं, तयांही लाभे ईशकृपा. १
क्लेश अधिक होती, साधनीं अव्यक्तासक्तां,
देहाहंकार, येइ तो द्वाड आड पार्था २
सकल स्वकर्मे जे, अर्पुनी भजती सगुण रुपा,
निशिदिनिं आळविती, ध्यानिं, मनि मलाच जे बापा. ३
चित्त मला देती, भक्त जे असती मत्प्रेमी,
भवसिंधूमधुनी, तारितो त्यांना शीघ्रच मी. ४

गीता अ० १२, श्लोक ८ ते १२

## अभंग

मन आणि बुद्धि होऊनी निश्चयी,
लावी माझे ठायीं परम भक्ता. १

अहंकार तूझा गळूनी जाईल,
माझा तू होशील आपोआप. २
वास तूझा माझ्या ठायीं निरंतर,
होईल साचार जाण पार्था. ३
धनंजया मनीं संशय धरी न,
प्रतिज्ञा घेऊन कथी तुज. ४
चित्त जरी मज देऊ न शकसी,
होई तू अभ्यासी तयालागी. ५
कांहीं काळ तरी धरी माझे ध्यान,
निज बुद्धि मन लावुनीया. ६
अभ्यासानें लागे तैशीच संवय,
सर्व कांहीं होय साध्य पार्था. ७
अभ्यास कराया जरी तू अशक्त,
स्वकर्मे अर्पीत मला राही. ८
मजस्तव कर्मे करी जो सर्वची
सिद्धि ती तयाची दासी होई. ९
त्यजीयेला जेणें कर्तृत्वाभिमान,
भक्त तोची धन्य काय वानू! १०
कर्मसमर्पण कठिण कां वाटे ?
फलासक्ति नेटें त्यजी बापा. ११
वृक्षवेलीं फळें दुग्ध त्यागी धेनू,
देई कन्या दान जनक जैसा. १२
न करी कर्मातें अपेक्षा धरून,
हाची बोध मान शांतिप्रद १३

अभ्यासाहुनी ते ज्ञान असें भलें,
ध्यान तें चांगलें ज्ञानाहुनी. १४

कर्मफलत्याग भला ध्यानाहून
शांति त्यागातून नांदतसे. १५

## विशेष गीत

### गज़ल (राग :–बागेसरी)

चित्त मन लावी मयीं तू करुनिया दृढ निश्चय,
वास तव मम अंतरीं मग सांगतो निःसंशय. ॥धृ०॥

चित्त जरि तुज देववेना नित्य अभ्यासूनिया
करुनि घे मज आपुलासा वांछुनीच धनंजया. १

असमर्थ अभ्यासांत कां ? हो मदर्थ कर्मपरायण,
माझियास्तव करुनि कर्में मजसि घे तू साधुन. २

तेहि ना साधे जरी, मम ध्यास तुजला लागु दे,
जिंकुनी निज मानसा तू कर्मफल टाकून दे. ३

ज्ञान ते आहे विशेष सकल अभ्यासाहुनी,
ध्यान ते रे श्रेष्ठ आहे जाण त्या ज्ञानाहुनी. ४

कर्मफल त्यागातुनी मत्प्राप्ति होई सत्वर,
श्रेष्ठ तो ध्यानाहुनी त्यागांत शांति निरंतर. ५

गीता अ० १२ श्लोक १३ ते २०

( चाल :–राम स्मरावा राम, सदोदित. )

भक्त मला प्रिय मान तोचि रे. ॥धृ०॥
सकल जिवांवरि ज्याची माया
जगन्मित्र धरि क्षमा मनीं या

निरभिमान ममताच ना जया
सुखदुःखांत समान. १

योगयुक्त जो सदानंदित,
निश्चय ज्याचा कधीं न ढळत,
मन बुद्धि जयें मजला अर्पित,
गाउ किती गुणगान ! २

आवडतो जो बहु सकलांना,
चाहृतसे जो सकल जिवांना,
हर्ष क्रोध भय चिंता न मना,
मम रूपीं रममाण. ३

निरपेक्षी शुचि दक्ष उदासी,
व्यथाहीन निर्मम संन्यासी,
पाप जळें ज्याच्या सहवासीं,
भक्त जीव कीं प्राण ! ४

शत्रु मित्र जो मानि समान,
सम मानी मान नि अपमान,
सुखदुःखीं सम संगविहीन,
पुरुषोत्तम तो जाण. ५

धरि मी त्याला मुगुटासम शिरिं,
चरणचिन्ह तत् मिरवि मम उरिं,
त्या खेवाया येतो भूवरिं,
लागे त्याचें ध्यान. ६

भक्तिसुधारसपान करोनी,
सर्वस्वी मन्मय होऊनी,
श्रद्धेनें लागे मद्भजनीं,
त्राता मी भगवान ! ७

## विशेष गीत. गज़ल

( चाल :–अमल कंद हसत मद. )

भूतमात्रीं द्वेष ना ज्या मैत्रि करुणा नेहमीं,
नाहिं ममता गर्व वा सुखदुःखि सम जो नित क्षमी,
सतत संतोषी असे रे योगि जो दृढनिश्चयी,
बुद्धि मन अज अर्पिलें जै भक्त मज प्रिय फार तो. ॥ धृ० ॥

वाटतो सकलां हवासा चाहतो जो सकल जीवा,
नाहिं ईर्षा हर्ष भय उद्वेग मज प्रिय फार तो. १
सांडिला कर्तृत्वभाव राह तो निर्लेप जो,
वानु किति त्याच्या गुणा रे भक्त मज प्रिय फार तो. २
शत्रु मित्र समान मानी मान ना अपमान ज्या,
दुःखसुखिं शितोष्णिं सम तो संगविरहित जाण तो. ३
तुल्य निंदा स्तुति जयाला रत सदा मच्चिंतनीं,
नाहिं ज्या आसक्ति कसली भक्त मज प्रिय फार तो. ४
राहि जो संतुष्ट नित्य प्राप्त अवध्या स्थितिमयीं,
स्थिरमति तो भक्तियुक्त भक्त मज प्रिय फार तो. ५
पिउनिया धर्मामृता रममाण रे मद्रूपिं जो,
नित्य श्रद्धायुक्त राहे मी तया आलिंगितो. ६
सोडुनी वैकुंठधामा अवतरुनि येतो जगीं,
भेटण्या भक्तास माझ्या त्याकडे मी धावतो. ७
भेटतां तो भक्त ऐसा नयन भरुनी पाहतो,
लोचनें ओलावती मम मी तया आलिंगितो. ८
लाज लज्जा सांडुनी मी राबतो त्याच्या घरीं,
निशिदिनीं चिंता तयाची मीच बापा वाहतो. ९

दृष्ट ना लागो तया ओवाळितो मी लिंबलोण,
पूजितो मी त्या स्वयें अन् आरती ओवाळितो. १०

भिन्न मुळि नाहींच आम्ही रूप तो माझेंच रे,
व्यक्त तो अव्यक्त मी रे तोच मी अन् मीच तो. ११

सोडुनीं वैकुंठधामा लाडकी माझी रमा,
धावुनी येतो तयाचें विघ्न अवघें सारितो. १२

इतिश्री गीतज्ञानेश्वरीचा भक्तियोग नामें बारावा अध्याय समाप्त.

ॐ तत्सत्ब्रम्हार्पणमस्तु.

# अध्याय १३ वा

## क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग

गीता अ० १३ श्लोक १ ते ४

श्रीभगवान वदे :— अभंग

शरीर हें क्षेत्र जाण, क्षेत्र जाणे तो क्षेत्रज्ञ. १
अरे क्षेत्रज्ञ तो मींच, जाण पार्था निश्चयेंच. २
जयें उभय होती ज्ञात, तेंची ज्ञान रे यथार्थ. ३
अेक क्षेत्राचे विकार, आणि कार्यं ही साचार. ४
अट्टाहास अर्थासाठीं, धर्मशास्त्रें तीं करीती. ५
तरी नाहीं अेक मत, जाण कोणाचेंही होत. ६
कुणी म्हणती वेद खोटे, अरे पाखंडी जन ते. ७
योगी करिती तपश्चर्या, हेंची ज्ञान संपादाया. ८
राज्यभोग ते त्यजूनी, शंभु बैसले स्मशानीं. ९
याच निर्णयास्तव देख, ब्रह्मा झाले चतुर्मुख. १०
तरी झाला नाहीं ज्ञात, तुज सांगतो क्षेत्रार्थ. ११

— क्षेत्रक्षेत्रज्ञाच्या अर्था संबंधी भिन्न भिन्न मतांतरें —

कर्मवादींचें मत (अभंग)

आधीं सांगतो तुज रे, भिन्न भिन्न मतांतरें. १
कर्मवादी म्हणतात, क्षेत्र जीवाच्या ताब्यांत. २
प्राण आहें शेतकरी, इंद्रियें हीं वृषभ भारी. ३
कर्मफळें जीं तू देखे, जीव भोगी सुखदुःखे. ४

### सांख्यवादीयाचें मत

सांख्यवादी म्हणती साचा, सर्व खेळ प्रकृतीचा. १
अरे त्रिगुणात्मक प्रकृति, पीक क्षेत्रीं पीकवे ती. २
आणि संसारखळयांत, जीव रगडला जात. ३
होइ संध्या मग अव्यक्त, अंत जाण तो निश्चित. ४

### संकल्पवादींचें मत. (अभंग.)

श्रेय देती संकल्पातें, पहा संकल्पवादी ते. १
म्हणति संकल्पची मूळ, चराचरा सूक्ष्म स्थूल. २
अहंकार बुद्धिसहित, व्यवहार चालवीत. ३
संकल्पाविन पाही, क्षेत्र चालेना कदाही. ४

### स्वभाववादीयांचें मत. ( अभंग )

स्वभाववादि प्रसिद्ध, म्हणति क्षेत्र स्वभावसिद्ध. १
कोणी नाहीं त्याचा कर्ता, क्षेत्र श्रमफळदाता. २
घनीं पाणी आणी कोण ? नक्षत्रांना धरी कोण ? ३
कोण ताणीतो गगन ? वाऱ्या वारा घाली कोण ? ४
देहावरी रोम किती, त्यांची कैशी रे उत्पत्ति ? ५
सदा भरल्या सिंधूंत, पाणी कोण रे भरीत ? ६
स्वभावेंच रे या गोष्टी, आपोआप घडताती. ७

### अभंग ( राग :—बहार )

ऐसे वाद ते अनेक, छंदऋषींचे त्या देख. १
बृहत्सामसूत्रि वेदांच्या, झाली आहे त्यांची चर्चा. २
तरी नाहीं कळो आले, वृथा सकल शिणले. ३
तुज सांगतो साद्यंत, क्षेत्रक्षेत्रज्ञाचा अर्थ. ४

गीता अ० १३ श्लोक ५ व ६

## अभंग

महाभूतें अहंकार, बुद्धि प्रकृति साचार. १
दशेंद्रियें मन पहा, आणि विषय त्यांचे दहा. २
द्वेष इच्छा सुख दुःख, धृति चेतना संघात. ३
अशा छत्तीस तत्वांचें, शरीर घडलें हें साचें. ४

## क्षेत्राच्या छत्तीस तत्वांपैकीं प्रत्येकाचा अर्थ.

## अभंग

पंचमहाभूतें, सर्व जाणताती ज्ञाते. १
बघें मायेच्या उदरांत अहंकार राही सुप्त. २
तोची चैतन्य चेतवी, आणि देहातें नाचवी. ३
बुद्धि तिलाच रे म्हणी. विषयांना ओढुनि आणी. ४
आणि जीवा देई साचें, अनुभव सुखदुःखाचे. ५
तीच करीते साचार, योग्यायोग्याचा विचार. ६
तिचा साथी तो विवेक, पुण्यपापाचा पारीख. ७
जिला प्रकृति म्हणती सांख्य, तीच जाण तू अव्यक्त. ८
ज्यांत पाही रे कौंतेया, सर्व अंतीं पावति विलया. ९
आणि दाही इंद्रियें तीं, त्यांची सकलां माहिती. १०
मन भासतें आपणा, परी मात्र ती कल्पना. ११
पुष्टि देई भ्रम अज्ञाना, करी निर्माण वासना. १२
भोगविते इन्द्रियांना, पहा विषयभोग नाना १३
असे भ्रमाचें भंडार, मन जाण तू साचार. १४
आणि दाही विषय पाही, तयां कोण जाणत नाहीं. १५
इच्छा तीच असे वृत्ति, जयें इंद्रियां ये मस्ती. १६

पहिलें लक्षण, नको मूळीं मानपान.
नको ते हारतुरे, सभेमाजींही जाणें रे
नको तें नेता होणें, नको भाषण करणें.
नको तीं उद्घाटनें, नको नमस्कार घेणें.
ज्ञानी मानापाना भिऊन, बैसे एकांतीं जाऊन.
अमानित्व असें जाण, पहिलें ज्ञानाचें लक्षण,
ऐक रे धनंजया. १

ज्ञानाचीं लक्षणें—अदंभित्व.

दुसरें लक्षण, दंभ नसणें तें जाण
जाऊ दे गेले प्राण, कोणा सांगे ना स्वपुण्य,
कुटी ना कधीं फोल, दानधर्माचे ते ढोल.
शरीरा भूषवीना, आढ्यतेनें मिरवीना.
उदार उपकारी, भूका कंगाल जरी,
वरुनी दिसे वेडा, अंतरीं ज्ञानी गाढा.
अदंभित्व जया अंगीं, ज्ञानी थोर तो जगीं.
वंदुनी जीवेभावें, त्याचें चरणोदक घ्यावें.

ज्ञानाचीं लक्षणें :–अहिंसा.

तिसरें लक्षण, अहिंसा असे जाण,
अहिंसा नामें देख, हिंसा करीताती लोक.
विज्ञानीं शोधासाठीं, वेडूकें चीरताती,
कुटिरें तोडूनी तीं मंदिरें उभारीती,
करणें उपवासा प्राण कष्टवीणें हिंसा,
कर्मकांडी म्हणताती, हिंसेला अहिंसा ती,

खरी अहिंसा

नेहमीं कृपादृष्टि, प्राणिमात्रीं दुःखी कष्टी.
वाणींत दया फार, मुख प्रेमाचें आगर.

बोलणें अति सौम्य, मूर्तिमंत नादब्रह्म,
तीची अहिंसामूर्ति, ज्याची वाटे ना भीति.
संकोचही तयाचा, वाटे ना कोणा साचा,
चाले तो मार्गात, जीव सारे वाचवीत.
टाकी मंद मंद पदा, जीवां जपे तो सर्वदा.
टाकी पद सांभाळून, स्वामी समाधी भंगो न
हातही हालवीना, परोपकाराविना,
अहिंसा जशी मनीं, दिसे तैसी ती वर्तनीं.
अहिंसा मूर्तीमंत, जयारूपें वावरत.
तीची रे महाज्ञानी, शिर माझें तयाचरणीं.
अैक रे धनंजया.

नाचीं लक्षणें :–क्षमा व आर्जव

गीत (चाल :–काल खरा कलिकाला झाला.)

क्षमा जयाचें अंतःकरणीं,
मानी पार्था त्या तू ज्ञानी. ॥ धृ० ॥

निंदा स्तुतिची जया चाड ना,
इष्टानिष्टा सुखदुःखांना
सहन करी जो सम मानोनी. १

धरा चराचर भारा वाही,
त्रिभुवनभारा जसा शेषही,
भार साहि जो आनंदोनी. २

आर्जव गुणही तयांत विलसे,
सरल नम्र निष्कपटी अैसे
नमितो सकलां देव मानुनी. ३

ज्ञानाचीं लक्षणें :–आचार्योपासना.

**अभंग** ( चाल :–जो आवडतो सकलांना. )

गुरुपायीं लीन सदा, तोची ज्ञानाची संपदा. १
निज सद्गुरुला तो जाण, करी सर्वस्वार्पण, २
त्याचा देह तो सुंदर, गुरुभक्तीचें मंदिर, ३
गुरुग्रामाकडिल वारा, करी तो त्या नमस्कारा, ४
जरी वसे अन्या ठायीं, लक्ष सदा सद्गुरुगेहीं. ५
गुरुवीना क्षण क्षण, जया वाटे युगसमान. ६
गुरु स्वजन कोणी भेटे, इंद्रपद लाभे वाटे, ७
गुरुगृहिची कळतां वार्ता, अति मोद तया चित्ता. ८

ज्ञानी भक्ताची गुरुपुजा

**अभंग** ( चाल :–प्रेम कोणीही करेना )

करोनीया सिंहासन, गुरुमूर्ति करि स्थापन. १
करीतसे मानसपूजा, करी प्रसन्न सद्गुरुराजा. २
गुरुचरणीं करितो देख, प्रेमाश्रूंचा तो अभिषेक. ३
फुलें सात्विक भावाची, गुरुचरणीं वाही साची. ४
जाळी अहंकार धूप, ओवाळितो ज्ञानदीप. ५
सांडुनीया अवघें द्वंद्व, अर्पि ऐक्याचा नैवेद्य. ६
ऐसा पूजी सद्गुरूस, मानी ब्रह्मा विष्णु महेश. ७
सद्गुरूच्या ध्यानरंगीं, तरंगे तो प्रेमतरंगीं ८
वर मागे करुनि प्रसन्न, सदा लाभो सद्गुरुचरण. ९

ज्ञानी भक्ताची गुरुसेवा **अभंग**

होई गुरुचा पाईक, करी सर्व कामें देख. १
जोवरि जीव असे जीवीं, गुरुसी अनन्य भावें सेवी. २

आणि वदे अैसी वाणी, देह पडो गुरुकारणीं. ३
मानी सद्‌गुरुसो दैवत, तीर्थक्षेत्र परम पवित. ४
गुरु तोची मातापिता, गुरु बहिण बंधू चुलता. ५
गुरु माझें सर्व कांहीं, गुरुविना कोणी नाहीं. ६
अैसे मानूनी मनांत, करी तया तो प्रणिपात. ७
मुखीं गुरुनाम जप, त्याचें धुवुनी गेलें पाप. ८
गुरुचरणरजःकण, करी मस्तकीं धारण. ९
करी अैसी गुरुसेवा ती, तोच मानी ज्ञानमूर्ति. १०
अैसी आचार्योपासना, करी, ज्ञानी तोची माना. ११

ज्ञानाचीं लक्षणें:– शुचिता व आत्मनिग्रह.

( चाल:– वद घनःश्याम श्रीराम )

रे, असे सदा शुचित, ज्ञानवंत. ॥ ध्रु० ॥

कर्पूरासम तनुकांती,
रत्नासम अंतर्दीप्ति,
करि सदा पुण्य कर्में तीं,
प्रभुज्ञानें जो स्नात, ज्ञानवंत. १

जरि शुद्ध असें आचरण,
परि अंतःकरण मलीन.
तो कधीं न लाभे ज्ञान,
जणु प्रेंत विभूषीत, मान तात. २

जो अंतर्बाह्य शुचित,
जणु स्फटिक गृहामाधि ज्योत,
जरि देह भ्रमे विषयांत,
मन ज्याचें निर्लिप्त, ज्ञानवंत. ३

जो अंतरास बाहेरी,
जाउ न दे इंद्रियद्वारीं,
जो कामाशांना वारी,
करि निग्रह जो सतत, ज्ञानवंत. ४

ज्ञानाची लक्षणें:- इन्द्रियार्थेषु वैराग्यम्

( चाल :- कौसल्येचा राम बाई. )

विषयविरागी योगी ज्ञानि मानि तो,
शम दम तप व्रत कार्यि लीन तो. ॥ धृ० ॥

अन्न ओकलेलें बापा कुणी चाटि कां ?
शवाप्रती आलिंगन कुणी देइ कां ?
जळत्या घरांत व्यर्थ कुणी जाइ कां ?
बचनाग विषरुचि कुणी घेइ का ?
व्याघ्रसिंहगुहेमाजीं कुणी जाइ कां ?
तसें मानि विषयसुख वमनची तो. १

ज्ञानाचीं लक्षणें:—अनहंकार.

( राग:- दरबारी कानडा, त्रिताल )

सकल सुकर्म करी, ज्ञानी,
'मी पण' मुळीं न धरी. ॥ धृ० ॥

वर्तन ज्याचें सरल निगर्वित,
सूर्यासम वा गंगेसम नित,
वेलीसम तो लवे सदोदित,
आत्मस्तुति न करी. १

तनमन वाणी कर्मामधुनी,
अहंपणाचा लोप करूनी,

देहवृत्तितुनि अलिप्त होउनि,
जनामधीं विचरी. २

चित्राहातीं शस्त्रां दिधलें,
बैलापाठीं लाडू लाधले,
उभयां त्यांचें महत्व कसलें ?
देहास्था न धरीं. ३

ज्ञानाचीं लक्षणें:—जन्ममृत्यु जरा व्याधी दुःखदोषानुदर्शनम् ।

( राग:—धनाश्री. )

सावध राही सर्वच काळीं, जन्ममृत्युचे फेरे टाळी ॥ धृ० ॥
नको नको तो जन्म पुन्हा, नको नको स्तनपान पुन्हा. १
वर्ते जो रे असे मानुनी, तया म्हणावें आत्मज्ञानी. २

वृद्धावस्थेचें वर्णन (कटाव)

होइ आयुष्याची माती, नको रे वृद्धावस्था ती,
नको देहाची अधोगति, नको रे वृद्धावस्था ती. ॥ धृ० ॥

तारुण्यांतील सुंदर डोळे, होती जणु परिपक्व पडवळें,
डोळ्यामधुनी वाहे पाणी, छाती टाकी तें भिजवूनी,
नाकामाजीं शेंबुड भरला, मोरिमधें जणु गाळ साचला,
ओठ रंगले जे पानांनीं, लाळ वाहते अतां त्यातुनी,
दांत आणि दाढाही गेल्या, येइ जोर तो मात्र जिभेला,
डोक्याला तर पडलें टक्कल, केसांसह ती गेली अक्कल.
वृद्धावस्था तीं, नको रे वृद्धावस्था तीं. १

तोंडावाटे शब्द निघेना, कानांनीं ऐकू येईना,
बघतां बघतां वृद्ध वानर, त्यासम होई अवघें शरिर,

कंप सुटे तो सर्वांगाला, कमरेचा तर कणा मोडला,
पथारींत चाले मलमूत्र, घाण पसरते ती सर्वत्र,
कंटाळति नातेवाइक ते, नवस करिति हा लवकर मरु दे,
भुतासारखा दिसतो सकलां, स्त्रियामुळेंही भीती त्याला,
रात्रभरी ती चाले ढास, होई सकलां अतिशय त्रास,
शरीर झालें अवघें जर्जर, प्रेतकळा ये सर्वांगावर,
किती करावें त्याचें वर्णन, प्रभो वाचवा अशा दशेतुन.
वृद्धावस्था ती, नको रे, वृद्धावस्था ती! २

## ( चौपाई )

असें वृद्धपण येण्याआधीं, मन लावी देवाच्या नादीं. ॥धृ०॥
श्रवण करूनि घे तो हरिकीर्तन, मुखें चालवी नामस्मरण. १
करूनी घेतो तीर्थयात्रेला, जोंवरि जोम असे पायांना. २
जोंवरि दिसत असे नयनांना, तोंवरि घे श्रीरंगदर्शना. ३
हात चांगले असति जोंवरी, दानधर्म करूनी घे तोंवरी. ४
सत्कर्मे जो करि तारुण्यीं, तया म्हणावें आत्मज्ञानी. ५

ज्ञानाचीं लक्षणें :—औदासिन्य : **अभंग**

ज्याचें अंगीं औदासिन्य, तोची मूर्तिमंत ज्ञान. १
नाहीं लोलुपता त्या ठायीं, पुत्र कलत्रा विषयीं. २
मानी यात्राळूंचा मेळा, अवघ्याच कुटुंबाला. ३
किंवा अेका तरूवरती, जणू खगांची वसती. ४
मानी अवघ्याची गोताला, घडीभरिचा गोपकाला. ५
चित्त ज्याचें सिंधुसमान, लाभ हानींत समान ६
नर अैसा दिव्य गुणी, जगीं जाणावा तो ज्ञानी. ७

गीता अ० १३ श्लोक १० व ११

ज्ञानाची लक्षणें :— भक्तिरव्यभिचारिणी

(चाल :–भक्तजन सदा.)

ज्ञानि तो सदा, करितसे अनन्य भक्ति, ज्ञानि तो सदा. ॥धृ०॥

मिळण्या संसारसुख, स्वर्गीचें वा देख,
वांच्छा तो धरि न मनीं कसलिही कदा. १

एकांतीं वास हवा, गिरिकंदरिं गुहिं वनिं वा,
लोकवस्तिमधिं वसणें मानि आपदा. २

मग्न ईशध्यानांत, आत्मयोग साधीत,
हंस जसा जल वारुनि सेवितो दुधा. ३

ज्या ज्ञानीं भ्रान्ति नसे, मोह भुसे देव दिसे,
अैसी तो प्राप्त करी ज्ञानसंपदा. ४

अज्ञानोयदतोऽन्यथा, अज्ञानाचीं लक्षणें—

गज़ल ( राग :– दरबारी कानडा. )

रे महा अज्ञानि तो जो धडपडे मानास्तव,
हार गजरे भाषणें अधिकार लोलुप जो जिव. ॥ धृ० ॥

मूर्तिमंतच दंभमानी पुण्य करि जरि अल्पही,
ढोल कुटितो तो तयाचे आत्मस्तुति करि अक्षयी. १

लाभ होतां देत पेढे हानि होतां उर पिटे,
आवडे त्याला खुशामत आत्मनिंदा ना पटे. २

प्रेम तो दाडी वरूनी वैर भरले अंतरीं,
सद्‌गुरुचें नाम घ्याया लाज वाटे त्या परी. ३

करित गुरूची टिंगल खेळे तयाशीं दंगल,
गुरुवरा बदनाम करणें नेम त्याचा निश्चल. ४

करित चाळे सर्वदा तो सतविण्या सद्गुरुप्रति,
हो तयाचें तोंड काळें गुरुस सतवी दुर्मति. ५

नांवही घेणें नको ते रे अशा गुरुद्रोहिचें,
म्हणुनिया गुरुचरणतीर्थें पाप धूतो वदनिचें. ६

मलिन अंतर्बाह्य जो अन् रुचति धन दारा जया,
विधिनिषेधा मानि ना हवि बाहुपाशीं नव प्रिया. ७

पापपुण्य विचार नाहीं करित तो द्रव्यार्जनीं,
करितसे बाजार काळा दुर्गति त्याची झणी. ८

नाहिं त्या स्थिर वास तो रे मंदिरीं वा निज घरीं,
करित राही जो सदा चांभारचौकशि घरोघरीं. ९

नाहिं लेशहि संयमहि ज्या, धर्मपालन ना करी,
लाजलज्जा सांडुनी जो फेंकि धर्माज्ञा दुरी. १०

विषयिं राही मत्त तो रे माकडासम चंचल,
नित्य नूतनस्त्रीसुखास्तव चित्त ज्याचें व्याकुळ. ११

रंगतो रमणीसवें तो चित्रपट नित पाहुन,
व्यसन जडलें स्त्रीसुखाचें मानितो तें भूषण. १२

जन्मभरि जो खंगला रे पुत्र स्त्री द्रव्यार्जनीं,
नाहिं आस्था ईशभजनीं व्यर्थ आला जन्मुनी. १३

## अभंग.

मीच काय तो ज्ञानी, असी घमेंड जयामनीं. १
आणि म्हणे जना मूर्ख, तोची मानी महामूर्ख. २

जया अंगीं दोष फार, आणि गुण दोन चार. ३
करी त्यांचा गाजावाजा, तोची जाण मूर्खराजा. ४
अहंकार मद मत्सर, यांचे जिवंत माहेर. ५
गुणीजना अपमानी, मूर्खाणाम् शिरोमणि. ६
अहोरात्र जो मानव, खपे देहपुष्टिस्तव. ७
रोजगार कुटुंबसुख, हेंचि ध्येय ज्याचें देख. ८
असे काळाच्या दाढेंत, नसे तया त्याची खंत. ९
पीडिताती जरी व्याधी, करी विचार ना कधीं. १०
अरे संसारांत सुख, मानि तोची महामूर्ख. ११
जया तारुण्याचा मद, तोची मानी मतिमंद. १२
अंगीं आलें वृद्धपण, तरी आशा ती सुटे न. १३
मौज वाटे तरूणांना, बेजारीतां म्हाताऱ्यांना. १४
परी विसरती ते पाही, तेही होणार तैसेही. १५
होती बायकांचे बंदे, तेची अक्कलेचे कांदे. १६
अविचारें कार्ये करी, योग्यायोग्यां ना विचारी. १७
टिके तारुण्य चिरकाल, असें मानूनी घे फोल. १८
कळो नये निज चूक, तोचि मानी महामूर्ख. १९
पडे संसारकर्दमीं, मायामोहाच्या विभ्रमीं, २०
तरी बाहेरी पडें ना, तोची महा मूर्खराणा, २१
आणि मेल्यावरी पाही, त्याचा घरांत जीव राही. २२
सदा स्त्रियांपुढे देखा, नाचे मर्कटासारखा. २३
कुटुंबाच्या तैनातींत. करी जीवन व्यतीत. २४
आणि मातापित्यालागी, अव्हेरीतो तो अभागी. २५
चकवीतो तो गुरूला, आराधीतो बायकोला. २६
करी पूर्ण मनोरथां, निज कांतेच्या सर्वथा. २७
न दे आईवडिलां कांहीं, म्हणे पैसा पुरत नाहीं. २८

आपुल्याच अपत्याचें, कोड पुरवीतो साचे, २९
करी पगार तो जाण, बायकोच्या रे स्वाधीन. ३०
आणि घर भरी साचें, बायकोच्या माहेरचें ३१
अैसा दुर्गुणांचा अर्क, तोची मानी महामूर्ख. ३२

अज्ञानाची लक्षणें (चालू)

(चाल :–जळो जळो अैसा जीवना रामविना.)

जळो जळो अैसें जीवन, ज्ञानविन. ॥धृ०॥

महा पंडित जरी वेदशास्त्रनिपुण.
करि सकलही ग्रंथांचें रटन,
घेई भाषा अवगत त्या करुन,
परि नाहीं अनुभव आत्मज्ञान. १

जरि शास्त्री त्याला जगत म्हणी
तरि पढतमूर्ख तो अज्ञानी,
निज विद्येचा जो अभिमानी,
परि नाहीं अंगीं संतगुण. २

गीता अ० १३. श्लोक १३ ते १८

ज्ञेय म्हणजे काय?

## अभंग

ज्ञेय जाणण्या उचित, तयें होई जीवन्मुक्त. १
तेची ब्रह्म आदिरहित, नाहीं सत् वा असत्. २
हात पाय सर्वा ठायीं, शिरें नयनें नी वदनेंही. ३
तया सर्व बाजु कर्ण, राही सकलांना व्यापून. ४
इन्द्रियांस देई ज्ञान, विषयांचें तेंची मान. ५
तरी इन्द्रियेंरहित, तया ज्ञेय म्हणतात. ६
नाहीं कोठेंही आसक्त, तरी सकलांना धारीत. ७

जरी असे गुणातीत, गुणोपभोग दिसें घेत. ८
अंतर्बाह्य व्यापीयेले, सकल भूतां तयें भलें. ९
असें वास्तवीक स्थीर, दिसें चंचल अस्थिर. १०
असें अणूहुनी सान, विश्वरूपोही महान, ११
जरी भासतसें दूर, तरि निकट निरंतर. १२
मूळ असें अविभक्त, प्राणीमात्रीं ते विभक्त. १३
असें सर्जक पोषक, तैसें मारक तारक. १४
सूर्यचंद्रा प्रकाशवी, तिमिराला तें लोटवी. १५
ज्ञानरूपें ज्ञेयरूपें, ज्ञानें जाणणें तें सोपें १६
सकल चित्तीं विद्यमान, तया ज्ञेय नाम जाण. १७
क्षेत्र ज्ञान ज्ञेय कैसे, तुज कथीयेलें सर्वांशें. १८
याची रहस्या जाणून, भक्त होती मयीं लीन. १९

ज्ञेयाचें वर्णन. **विशेष गीत**

( राग :–बहार–त्रिताल )

हरि ॐ परब्रह्म तें
ज्ञेय भासतें साधुजनातें. ॥धृ०॥

संबोधिति ज्या विश्वतोमुख,
विश्वबाहु विश्वपाद देख
विश्वश्रोत्र विश्वचक्षु लोक
तात्विक जाणते. १

मूळ असें तें बघ अद्वैत.
सहज आकळे म्हणता द्वैत,
गुरु शिष्या या मार्गे सतत
देती बोध ते. २

ज्ञेया इन्द्रिय गुण नसती ते,
सगुण सेन्द्रियहि केले त्यांतें,
विषयांशीं त्या जोडुनि नातें
नवल हे वाटतें! ३

अेकच भावें जिवा व्यापितें,
उत्पत्ति स्थिति लय घडवी तें,
ब्रह्मा विष्णु महेशही तें,
शून्याकार तें. ४

जीवीं जीवन मनांत मन तें.
नयनीं नयन, कर्णि कर्ण तें,
वाणित वाणी, कर्मि कर्म तें,
विश्वाभास तें. ५

गीता अ० १३ श्लोक १९ ते २२

( जाति :–नववधू )

रे लग्न लागलें नित्याचें.
पुरूषाशीं त्या प्रकृतिचें. ॥धृ०॥

युगान्तराचे असति अनादि
उभयहि ते जिवलग संबंधी
संग तयांचा होई न कधीं
गुण विकार अपत्य तिचें. १

प्रकृतिच कार्यकारणा हेतु,
सुखदुःखाचे भोग परंतु,
पुरुष भोगितो बघ गंमत तु.
विचित्र नातें उभयांचें. २

प्रकृतिच करिते सर्वच कांहीं.
पुरुष स्वस्थ बैसोनी राही,
अशि उभयांची प्रीतसगाई
विश्वीं अनंत खेळ तिचे. ३

ब्रह्म सनातन असे पुरुष तो,
तसाच निर्गुण निराकार तो,
प्रकृतिचा त्या स्वामि असे तो,
विश्वच फळ त्या अैक्याचें. ४

क्षणोक्षणीं ती नवता धारी,
म्हणति गुणमयी तिज संसारी,
मनासही ती उद्युक्त करी
दैवी गुणमयि नाम तिचें, ५

मुळांत पुरुषा विकार नाहीं,
प्रकृतिच होई सर्वच पाही.
नामे रूपें धारुनि घेई,
विकार सकलहि पुरुषाचे. ६

करि पुरुषाचें तेज नष्टही,
आधिन करुनी वेड लाविही,
जन्म मृत्युचें सर्व घावही,
सहन करी तो प्रकृतिचें. ७

पुरुषा जन्ममरण तें नाहीं,
सुखदुःखाचे भोग कदाहीं,
असे मात्र तो भास सदाही,
गुणमयीच कारण त्याचें. ८

पुरुषा गुण विकार मुळिं नाहीं,
तत्प्रतिबिंबच प्रकृतिंत पाही,
प्रकृतिकरवी करवि सदाही,
नाटक हें संसाराचें ! १

गीता अ० १३, श्लोक २४ ते २७

**गज़ल** ( चाल :–असे पति देवचि ललनाना. )

आणती याच पुरुषातें महात्मे विविध मार्गांनीं,
कुणी लागूनिया ध्यानीं आत्मचिंतनहि तें करुनी. ॥ धृ० ॥

कुणी ते सांख्ययोगानें कुणी ते कर्मयोगानें,
जयांना आत्मज्ञान हवें गुरुमुखें श्रवण तें करुनी. १
सद्गुरु तोच जाणावा खपे जो लोककल्याणीं,
निर्गुणी आत्मज्ञानी तो सदा रत श्रीहरीभजनीं. २
अशाचा मंत्र घेवोनी होउनीया सदाचरणी,
हरिपदीं लीन होवूनी तरति ते या भवामधुनी. ३
क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगें जन्मती चराचरहि मानी,
तोच रे तरूनि जाई या दुःखमय संसृतीमधुनी. ४
अेकता पुरुषप्रकृतिची दिसे ज्या तोच रे ज्ञानी,
विनाशी सर्वभूतांत बघे अविनाशि तो ज्ञानी. ५
खरा तो दिव्य द्रष्टा रे सदा तो लीन हरिचरणीं,
किती वर्णू अशा ज्ञात्या धन्य तो धन्य या भुवनीं.

गीता अ० १३, श्लोक २८ ते ३१

**गीत.** (राग :–मालकंस. त्रिताल)

जो सम दृष्टी पाही.
परमात्मा सर्वांतरिं भरला,
समगुणेंच राही.

तत्व असें ज्या मनीं बिंबलें,
नाश तया नाहीं. ॥ धृ० ॥

याची देहीं याची डोळा
पाहातसे निज मुक्ति सोहळा,
ब्रह्मरूप तो मुक्तचि झाला
परमगतिस लाही. १

मुक्त खेळ हे गुणि मायेचे
त्यामधि अकर्तृपण आत्म्याचें,
जाणी जो या तत्वा साचें
ब्रह्मरूप होई. २

विविध भूति जो अेकत्वाला
बघुनि ब्रह्मसंपन्न जाहला,
तया दर्शनें सुखचि सुखाला
अैक अैक भाई ! ३

आत्मा वास करितसे देहीं
मिथ्या हेंच कथन मुळि पाहीं,
जळि प्रतिबिंब खरा रवि नाहीं
देह लया जाई. ४

आत्मा परि तो अनादि सिद्ध,
निराकार निर्गुणहि प्रसिद्ध,
लक्षणरहित जाणतो बुद्ध,
अलिप्त तो देहीं. ५

गीता अ० १३ श्लोक ३२ व ३३

( राग :–भूप. चाल :–उगवे पहा प्रभात.)

आकाशा त्या सर्वगताला लेप सख्या कुठला ?
शरीरधर्म लागतील कां कधि या आत्म्याला ? ॥ धृ० ॥

अेकच द्युमणी प्रकाशवीतो सकलहि जगताला,
आत्मा देहीं प्रकाशुनीही कधिं न देह झाला. १
दीप घराला प्रकाशवीतो दीपक घर कां रें ?
अग्नि असे तो सूप्तकाष्ठिं जरि काष्ठ अग्नि कां रें ? २
सूर्यानें तें मृगजळ भासें मृगजळ रवि कां रे ?
देहीं आत्मा असुनि तयाचें नातें नाहीं रे. ३

गीता अ० १३ श्लोक ३४

## अभंग १

जोडी विजोड ती, नामें ब्रह्म नी प्रकृति. १
सत्य अक्षय तें ब्रह्म, क्षयी मिथ्या माया भ्रम. २
ब्रह्म निर्गुण निर्विकार, माया स्थूल दृग्गोचर. ३
ब्रह्म अेकमेव अेक, माया स्वरूपी अनेक. ४
ब्रह्म असें तें निश्चल, माया लटिकीं ती चंचल. ५
ब्रह्म असें सूत्रधार, माया नाटक करि साचार. ६
ब्रह्म आहे विश्वव्यापी, माया अखिल विश्वरूपी. ७
जैसा राजहंस थोर, घेई क्षीर टाकी नीर. ८
उन्मीलीतां ज्ञाननेत्र, उमजे उभयांतिल अंतर. ९

## अभंग २

याच ज्ञानासाठीं, मुमुक्षूंची आटापिटी. १
शास्त्रें घालती पालथी, कोणी योगा आचरती. २
गुरुसेवा करोनीया, कुणी संपादिति ज्ञाना या. ३
आत्मा निर्गुण रे ज्ञाकला, गुणी मायाभ्रमें भला. ४
हेंची ज्ञालें जया ज्ञात, त्याची फिटली अवघी भ्रांत. ५
जाणी उभय अंतरातें, तोची पावे परम गतीतें. ६

इतिश्री गीतज्ञानेश्वरीचा क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग नामें तेरावा अध्याय समाप्त.

ॐ तत्सत्ब्रह्मार्पणमस्तु.

# अध्याय १४ वा

## गुणत्रयविभागयोग

### गुरुस्तवन

(चाल:- महाराज गुरुमहाराज तुमचा मीच लाडका चेला.)

महाराज गुरुमहाराज आम्हा पाव पाव रे सदया. ॥ धृ० ॥

गमसी साक्षात् ब्रम्हज्ञान,
माया अवघी तव आधीन,
दर्शन पाप ताप करि हरण,
रे महिमा तूझा श्रुति शास्त्रेंही जाणती न गुरुराया. १

अमुचा तूच खरा कैवारी,
तूझी कृपाच आम्हा तारी,
संसारातुनि या उद्धारी,
रे तूच अम्हा आधार मंगलमूर्ती नमितो पाया. २

माझी एकच रे अभिलाषा,
धुवुनी टाकी माझ्या दोषा,
देई सकलां ज्ञानप्रकाशा,
त्या परब्रह्म ब्रह्माण्डनायका सदा सदा अळवाया. ३

मानुनि घेतो तूझी आज्ञा,
रचीन गीता गीतें नाना,
लाविन भजना मी सुजनांना,
होवोत सुखी जे म्हणतिल प्रेमें माझीया गीतां या. ४

गीता अ० १४ श्लोक १ व २

**श्रीभगवान वदे :—** (राग :–भूप, ताल–दादरा.)

परम गहन आत्मज्ञान अैक पुन्हा बापा,
ज्या पुढती भवज्ञान पावत क्षणि लोपा. ॥ ध्रु० ॥

भवज्ञान क्षुद्र अशा भवसुखास मानी,
स्वर्ग अंति साधाया प्रेरितसे यज्ञीं,
द्वैतभाव निर्मितसे फोल रे म्हणूनी,
आत्मज्ञान त्वरित तुझ्या हरिल त्रिविध तापा. १

गुणि मुनिजन सेविति निजज्ञानामृतधारा,
आत्मरंगि संसारा मानिती पसारा,
ध्यानिमनीं भक्तीचा फुलविती फुलोरा,
साधुसंत करुनि घेति मुक्तिमार्ग सोपा. २

आत्मज्ञान ग्रहण करुनि मम पदास येई,
विश्वा जरि आदि अंत अमर तो सदाही,
होई तो नित्य पूर्ण मत्स्वरूप भाई,
घालणेंच मग न लगे जन्ममृत्युखेपा. ३

गीता अ० १४ श्लोक ३

**अभंग**

जीवा करी माया बद्ध, विविध नामे ती प्रसिद्ध,
महद्ब्रह्म तें साकार, महत्तत्त्वाचें माहेर. १
गुणविकारा देई जन्म, म्हणुनि महद्ब्रह्म नाम.
कुणी अव्यक्त संबोधी, तोचि अव्यक्त मतवादी २
गुणमयी माया भ्रान्ती, अैसे वेदांती म्हणती,
तिचें नाम 'अज्ञान' ही, टाकी जीवा भ्रान्तीमयीं. ३

आच्छादीतें हें अज्ञान, क्षेत्रज्ञातें त्या चैतन्य,
अरे मीच विश्वपिता, माया विश्वाची या माता. ४

बघ अपत्य आमुचें विश्वरूप बालक साचें.
जिवा मायेच्या संयोगें, प्रथम बुद्धि तत्व जागे. ५

त्याच बुद्धि तत्वातून, मग उद्भवें हें मन,
मन ममतेच्या संयोगें, अहंकार जीवा लागे. ६

आणि पंचमहाभूतें, घेती जन्म त्यांतूनी ते,
उद्भवती विषयेंद्रियें, तीन गुणें मंडित जे. ७

तदा जन्मते वासना, तिच्यामुळें योनी नाना,
असे मम माये संगें, विश्वांकुर फुटती वेगें. ८

त्यांचे प्रकार ते चार, अंडजादि ते साचार,
तेची चार हात पाय, महा प्रकृति शिर होय. ९

प्रपंच हें त्याचें पोट, निवृत्ति ही त्याची पाठ,
आणि वरी स्वर्गलोक, मध्यंतरी मृत्युलोक. १०

अधांतरीं तें पाताळ, अमुचें बाळ लडिवाळ,
केला बघे त्रैलोक्याचा, आम्ही पाळणा तयाचा. ११

आणि योनि लक्ष चौऱ्यांशी, त्याची बोटें असतीं साची,
असा बाळ नाना देही, नाना अवयव रूपें घेई. १२

मोहरूपी स्तनपानातें, माया करवीते तयातें.
मग चढे तया बाळसें, विश्वरूप तीची भासे. १३

तया ब्रह्मा बाळपण, आणि विष्णु तें तारुण्य,
सदाशिव जरावस्था, लय उत्पत्ति स्थिति त्या. १४

महाप्रलय त्याची शेज, तिथे पहुडे बाळराज,
पुन्हा कल्पोदय होतां, विषयज्ञानें जागे परता. १५

गीता अ० १४, श्लोक ४

(राग :—मालकंस, त्रिताल.)

भेदभाव अजुनी कां मनीं ? ।। धृ० ।।

शरीर अवयव भिन्न काय ते
सकलहि भूतीं पार्था सुमते ?
मन बुद्धी ती पंचहि भूतें
असती ना भरुनी ! कां मनीं ? १

एकच तंतू अनेक वसनें,
एकच माती अनेक भवनें,
अेक लतेला अनेक सुमनें
येती ना फुलुनी ? कां मनीं ? २

नटलें त्रिभुवन चराचरांनीं,
मद्रूपचि रे भरलें त्यातुनि,
अंध होसि कां नयनें असुनी,
अेकच मी त्रिगुणी, कां मनीं ? ३

सकल योनितुन अगणित मूर्ती,
बघ रे, कौंतेया संभवती,
माया जननी रे त्यांची ती
पिता मीच असुनी, कां मनीं ? ४

गीता अ० १४ श्लोक ५ व ६

## अभंग

(चाल :—मुखासाठीं करिसी तळमळ सारखी.)

अवघें विश्वजाळ. तीन गुणांचा हा खेळ. १
असे जननी ती प्रकृति, तीन गुणा जन्म दे ती. २

मूळ बीजची अज्ञान, वृत्ति उपजते त्यातून. ३
तीच तीन गुणी भिन्न सत्व रज तमी जाण ४
आणि याच तीन गुणें, आत्मा बांधीला मायेनें. ५
आत्मा होई देहधारी, तोच अपशकुन भारी. ६
तदा जागे तो अभिमान, 'हाच देह मी' म्हणून. ७
जीव पाळी देहधर्म, दुःख भोगीतो आजन्म. ८
वृथा लागे सुखापाठीं, मिळे दुःखची शेवटीं. ९
जीव असे सत्वगुणी, म्हणे मीच महाज्ञानी. १०
तया अवघे देतां मान, तदा जाइ अहंकारून. ११
म्हणे मीच खरा सुखी, अवघें ज्ञान माझ्या मुखीं. १२
असे बैल ते सत्वाचे, ज्ञानभारवाही साचे. २३

गीता अ० १४ श्लोक ७

(चाल :–सब मिल रामभजन करलेना.)

## रजोगुणी श्वान

तृष्णा सांकळ गाळिं खूण. ः। धृ० ः।

तृष्णेचा तो दास खास रे रजो गुणी मान
अंग करी संचार कामना जाई तो वाहून. १

टाकी फुटक्या कवडी वरुनी जीवहि ओवाळून,
आणि घेइ तो अल्पहि लाभे भाग्यवंत मानून. २

चरितार्थाची चिंता राही निशिदिनि त्यालागून,
बसे चालवित प्रचंड गिरण्या मिलमालिक होऊन. ३

इतक्यानेंही समाधान त्या होतच नाहि अजून,
परदेशीं व्यापार करोनी टाकी स्वगृह भरून. ४

विमें घेउनी अनेक खातीं पेढ्यामधिं उघडून,
शेअर घेतो काम काढितो लाचाही देऊन. ५

पोरा-बाळांसाठीं राखी हवेल्याहि बांधून,
स्वजन अपात्रहि कामा लावी लायक दुरि सारून. ६

देशभक्तिचा आव आणुनी निवडणुका जिंकून,
उच्च पदीं गंगेंत वाहत्या घेई हात धुवून. ७

मरणोत्तरही स्वर्गी पोषण लाभावेंच म्हणून,
उभारूनिया विहिरिं सराई करि तरतूद इथून. ८

अचाट कर्में रजोगुणी करि साहसही खेडून,
अंतीं दुखें मरत बिचारा भार इथें टाकून,
स्वकरें गळा फास लावून, बंदुकगोळ्या वा खाऊन. ९

गीता अ० १५ श्लोक ८

( चाल :—'म्हातारी' ची )

तोचि तमोगुण रे, घालवी व्यवहारिक ज्ञान,
मोहरूपि रात्रीं, काळामेघच जणु मान. ।।धृ०।।

धरितें आधार, तयावरि अवघें अज्ञान,
निज कर्तव्याचें, राहि ना तया मुळीं भान. १

अविवेकाचाही, तमोगुण असे महामंत्र,
मूर्खपणाचें कीं, असें तें मद्याचें पात्र. २

सत्व रजा सारून तमोगुण होई बळवान,
जडहि इन्द्रियांना मनाला मूढ करी जाण. ३

तमोगुणी असतो, आलस्याची रे, खाण,
जांभाळ्यां देई, कुठेंही तो सुस्तावून. ४

निद्रा तर त्याला, वाटते फारच प्रियमाण,
निजुनच राही तो, जसा कीं असुर कुंभकर्ण. ५

दगडासम अचल, पडे तो कुशी हि बदलेना,
कसलेंही त्याला, मुळीं तें भानच राहीना. ६

सुस्त जीव वा तो, बसे रे मान खालि घालून,
करि न कामधंदा, कांहिही कुठेंहि मन लावून. ७

करि अथवा कामें, असति जी फार प्रमादयुत,
आळशिपिंडच तो, तमोगुणि ओळख जगतांत. ८

गीता अ० १४ श्लोक १०

(चौपायी.)

सत्व गुणाची होतां वृद्धि, जीव भोगितो सुखसमृद्धि. ।।धृ०।।
रजोगुण सख्या प्रेरि जिवाला, अचाट कर्मे करावयाला. १
तमोगुणानें ज्ञान झाकितां, बळावते कर्तव्यमूढता. २
रजा तमाला त्या जिंकून, सत्व बळावे मधुन मधून. ३
रजसत्वाला तम तो जिंकी, तम सत्वा घे रज जिंकून. ४

गीता अ० १४ श्लोक ११ व १५

सात्विकाचें वर्णन. (चौपायी)

सत्वगुण यदा अंगि बळावे, ज्ञान प्रकाशें तिथें स्वभावें. ।।धृ०।।
विवेक तोही होई जागा, राजहंससम होई नर गा, १
इन्द्रियांवरी लावि लगाम, कधीं न माजवि त्यांचें स्तोम. २
कधीं न करितो निषिद्ध कर्मा, सत्वगुणाची हीच पौर्णिमा. ३
होई त्याचा बुद्धिविकास, सकलहि शास्त्रें अवगत त्यास. ४
तशात त्याचा होतां अंत, जाई तो स्वर्गासी पार्थ. ५

तेथें सकल सुखें भोगोनी, अवतरतो अवनीवरि ज्ञानी. ६
थोर अशा त्या भक्तकुलांत, घेई जन्म तो पार्था परत. ७

राजसाचे वर्णन. (चौपायी)

राजस पुरुष महाव्यापारी, त्याच्या लोभाची बलिहारी. ॥धृ०॥
नारीवरि त्या प्रीतच भारी, क्रीडांगण त्या दुनिया सारी. १
कधीं न राही स्वस्थ बसून, करी योजना सदा महान. २
गिरण्या असती त्याच्या खूप, परदेशीं व्यापार अमूप. ३
हवा राहण्या भव्य महाल, नोकर चाकर मोटरि विपुल. ४
बांधि मंदिरें विहिरीं वाव, नांवलौकिकाची त्या हाव. ५
सत्तेसाठीं धडपडतो तो, विसाव्यास तर किमपि न घेतो. ६
मरतो जेव्हां अशा स्थितींत, पुन्हा जन्मतो नरलोकांत. ७

तामसाचें वर्णन. (चौपाई)

वृद्धि पावतो यदा तमोगुण, जीवनास व्यापी अज्ञान. ॥ धृ० ॥
चहूंकडे व्यापिते निराशा, जीवन भासें आमावास्या. १
सकल इंद्रियें वर्तति स्वैर, करी सदा तो भ्रष्टाचार. २
घुबुडासम तिमिरावरि प्रीति, निषिद्ध कर्में अति आवडती. ३
ज्ञानशून्य संमोहें ग्रसित, पुनश्च जन्मे नीच योनिंत. ४

गीता अ० १४. श्लोक १६ ते १८

अभंग

सत्वगुण पुण्य कर्में तो निर्मळ,
मधुर रसाळ फळें दाता. १
दिसाया सुंदर कटु ती लिंबोळी,
तैसी कटुता फळी राजसाच्या. २

विषमूळा जैसे विषची अंकुर,
अज्ञान अघोर तामसाचें. ३

ज्ञान उद्भवतें सत्वगुणातून,
लोभ रजातून आपोआप. ४

आळस अज्ञान प्रमाद त्रिदोष,
तमोगुण त्यांस पोषीतसे. ५

सत्वगुणी जाती स्वर्गलोकाप्रति,
मृत्युलोकीं वसती राजसातें. ६

खाति येथें सुखदुःखाची खिचडी,
मृत्यु घडोघडी पावती ते. ७

लिहूनी ठेवीली नरकाची सनद,
तमोगुणी मंद धनी तिचा, ८

रज तम दोन्ही नरकाचें साधन,
राखी सात्विक मन धनंजया. ९

स्वर्ग मृत्यु नर्क गुणांचे ते भेद,
मूळ वस्तु शुद्ध जाणी बापा. १०

गीता अ० १४ श्लोक १९

अंतःकरण सूक्ष्म देहाच्या आकारें,
तीन गुण बारे मूर्त होती, १

तीन्हीची उत्पत्ति ब्रह्मयाच्या सत्तेनें,
आधार देहानें दिधला तयां. २

तीन्ही गुण निजधर्मानुसार,
करीती व्यवहार याच देहीं. ३

ज्ञानबोध होतां गुणांचा संचार,
मिथ्या तो साचार स्वप्नापरी. ४

नट जैसा करी स्त्रीवेष धारण.
स्वतःसी भुलून जाई न तो. ५

ज्ञानी भूलती ना मूळ स्वरूपाला,
चालो गुण लीला वरी वरी. ६

भिन्न भिन्न कर्मा गुण ते कारण,
ज्ञानी उदासीन साक्षीभूत. ७

सूर्योदयीं होती अनेक घटना,
सूर्यनारायणा काय त्याचें ? ८

सर्व कर्मे व्हाया माझीच रे सत्ता,
तरी मी अकर्ता जाण बापा. ९

गुणातें उद्भवी, गुणा विकसवी,
गुणा लया लावी अंतीं मीच. १०

ऐसें ज्याच्या मनीं उदेलें रे, ज्ञान,
गुणातीत धन्य वंदनीय. ११

गीता अ० १४ श्लोक २०

( राग :–दुर्गा, त्रिताल. )

गुणातीत होई, पार्था,
कर्मबंधनें टाकुनि देई. ॥ धृ० ॥

उद्भवताती बघ हे त्रिगुण,
मिथ्या तनु अभिमानातून,
'अहंब्रह्म' तत्वा अनुभवुन,
अनित्य गुण पाही. १

सर्प काचळी दे टाकूनी,
अहंभाव त्यजि गुणामधूनी.
जन्ममरण देहालागूनी,
मुक्तच तू भाई. २

गीता अ० १४ श्लोक २१

अर्जुन वदे :— ( चाल :—माझा प्राण सखा जिवलग. )

परिसुनि मेघश्याम गर्जना,
मयुरासम तो करी नर्तना,
अर्जुन विचारितो श्रीकृष्णा,
गुणातीत लक्षणें. १

गुणातीत तो कसा वर्ततो ?
कसा गुणावरि मात करी तो ?
भगवंताला प्रश्न करी तो ?
उत्तर तें ऐका. २

गीता अ० १४, श्लोक २२

श्रीभगवान वदे:— (अभंग)

गुणवृद्धीक्षय, गुणातीता सम द्वय. १
ज्ञानप्रकाश सत्वाचा, हर्ष होई ना तयाचा. २
रजोगुण हो प्रवृत्त, नाहीं तया मनी खंत. ३
आणि मोह तमोगुणी, दूर राही त्यापासूनी. ४
गुण असोत नसोत, नाहीं द्वेष आशा खंत. ५
ऐसा गुणातीत झाला, सरती गुणांच्या मेखला ६

गीता अ० १४ श्लोक २३

## अभंग

गुण प्रवृत्त देहांत, गुणातीत, गुणातीत. १
पावे ना तो गुणविकार, गुण कर्ते मानी स्थिर. २
चाले गुणांची ती लीला, गुणातीत तो चळेना. ३
चाले गुणांचा तो धंदा, गुणातीता नाहीं बाधा. ४
गुण जावोत राहोत, गुणातीत, गुणातीत. ५

गीता अ० १४ श्लोक २४ व २५

( जाति :– नववधू )

रे गुणातीत तूं तोचि जाण
सुखदुःखा मानी समसमान. ।ध्रु०।

अश्म्याला कांचनलोहाला,
प्रियाप्रियाला निंदास्तुतिला,
तुल्य मानितो, नसे तयाला,
कुणी सान वा कुणि महान. १

मित्र नसे त्या अरिही नाहीं,
मान नसें अपमान कदाहीं,
विषमता न अंगास शिवेही,
हर्ष खेद ना, ज्ञानवान. २

नसे अहंता मनीं लेशही,
आत्मानंदी लीन सदाही,
समाधी न भंगते कधींही,
स्वयंप्रकाशित तेजवान. ३

गीता अ० १४ श्लोक २६

( चाल :–वद घनश्याम श्रीराम, ममात्माराम )

रे भिन्न भिन्न नामी
अेकची मी,
या अैक्य बुद्धिनें जाणे मजसी
तीच भक्ति नामी. ॥धृ०॥

नभि चंद्र सूर्य नी तारे,
भूवनीं चराचर सारे,
भिन्न भिन्न जरि रूपीं रे,
हे भेद सख्या तू सत्य न मानी
विश्वरूप तें मी. १

मी भक्त, भक्त मी मान,
नाहींच निराळे जाण,
रे भक्ति भक्त नी भजन,
या तीन्ही मधुनी वास करीतो मीच मीच रे मी.

भेदाला मिटवुनि ज्ञान,
तें त्याचें होइ विलीन,
माझ्यांतच रे संपूर्ण,
रे भक्त असा जो मला जिंकितो
त्याला काय कमी ? २

मज भजुनी अनन्य भावें,
तो ब्रह्मदशेला पावे,
गुण बंधन तया न ठावें,
तो भक्त सखा मम मुगुटशिरोमणि
मीच तयास नमी. ३

गीता अ० १४ श्लोक २७

( राग :–तेलंग–त्रिताल )

मीच ब्रह्म मानी, पार्था,
नित्य अचल निर्विकार निर्गुण,
धर्मधाम रे मीच सनातन,
अनुपम सौख्यनिधान निरंजन,
राहिं विश्व भरुनी. १

इतिश्री गीतज्ञानेश्वरीचा गुणत्रय विभागयोग नामें चौदावा अध्याय समाप्त.

ॐ तत्सत् ब्रम्हार्पणमस्तु.

# अध्याय १५ वा

## पुरुषोत्तमयोग

### गुरुस्तवन

(चाल :–श्रीगुरुराया सदया तुकया)

श्रीगुरुराजा सद्गुरुराजा नमन तुला रे नमन तुला. ॥धृ०॥
अक्षतास अक्षता कशाला आवाहन तें करण्याला ?
हृदयासन सुंदर मांडियलें करितो प्राणप्रतिष्ठेला. १
प्रेमाश्रूंनीं करि अभिषेका मंगल विमल स्वरूपाला,
लावि वासनाचंदनलेपा घे इंद्रिय पुष्पांजलिला. २
अहंकार तो धूप जाळुनी ओवाळी निर्हंताला,
पंचारति करि ज्ञानेशाची दिपवुनि पंच प्राणांना, ३
देहाच्या पादुका करूनी घाली तूझ्या चरणाना,
ब्रह्मस्वरूपा अनन्यभावें आलो देवा शरण तुला. ४
मी पण नैवेद्यास समर्पी कृपाप्रसादा देइ मला,
भक्तिभाव राहु दे अंतरीं हीच प्रार्थना पदकमला. ५

### प्रास्ताविक ओव्या

आधीं कथिले भगवंतांनीं, योगी भक्त आणि ज्ञानी,
परम प्रिय मजलागुनी, मुक्ति तयांना निश्चित. १

आतां या अध्यायांत ज्ञान वैराग्यासहित, १
असावें तें भगवंत, सांगती पार्था प्रेमानें. २

वैराग्याविन ज्ञान, व्यर्थ तें पंडितपण,
लाभे कैसें सत्य ज्ञान, वैराग्याविन सांग मा ? ३

वैराग्य तेंचि जाणणें, संसाराला मन विटणें,
भरलें विषमय मिष्टान्नें, संसार ताट मानुनी. ४

अश्वत्थाच्या रूपकानें, पटविला श्रीरंगानें,
नश्वर संसार हा चातूर्यानें, अर्जुनालागी बोधुन. ५

अहो अध्याय पंधरावा, आत्मज्ञानाची पौर्णिमा,
यांत पूर्णरूपीं पुरुषोत्तमा, डोळे भरूनी पहा हो ! ६

अध्याय हा नित्य पठावा, नश्वर मानावें या भवा
अनन्य भावें भजावा, श्री पांडुरंग हरि. ७

### भजन

श्री पांडुरंग हरि, जय पांडुरंग हरि,

गीता अ० १५ श्लोक १ ते ३

**श्रीभगवान वदे :—**

( रागः– दुर्गा, त्रिताल )

मूळ वरी, शाखा अधाला
बघ कौंतेया अश्वत्थाला ।। ध्रु० ।।

शाखा पर्णांची या न मिति,
जीर्ण लोपती, नव अंकुरती.
म्हणुनि लोक त्या अव्यय मानिति,
परि न उद्याची शाश्वति याला. १

छंदांच्या पर्णानीं लवला,
अनंत जीवांचा हा मेळा,
नसे नित्यता भववृक्षाला,
कळे गूढ हे वेदविताला. २

शाखा त्यांच्या वरती खाली,
स्वर्गमृत्युलोकीं पाताळीं,
पहा पसरल्या दूरी जवळी,
उच्च नीच त्या योनी सकला. ३

तीन गुणांनीं तरु पोषियला,
विषयभोग तत् आलापाला,
मधेंच मानवि शाखा याला,
कर्मबंधनीं गुंतित झाल्या. ४

रूप तरूचें खरें नसें हें,
आदि मध्य अंतहि त्या नोहे,
दृढ मूळी जरि झाड दिसें हें,
असंग शस्त्रें छेदि तयाला. ५

गीता अ० १५ श्लोक १

ऊर्ध्वमूलवर्णन.

## अभंग

नाहि जयालागी अंत आदि मध्य, रूपरस गंध नाहीं जया. १
नाहि जया नाद नाहि जया भेद, नित्य अमर्याद स्वरूपीं तें. २
स्वयंप्रकाशित आनंदी आनंद, निर्गुण निर्द्वन्द्व ज्ञानरूप. ३
ऐसें परब्रह्म ऊर्ध्वमूल जया, संसारवृक्षा या पाहि बापा. ४

संसृतिवृक्ष वर्णन. (चाल :—सुंदर उद्यान)

. दिसे हा संसृति वृक्ष महान, कारण त्या अज्ञान,
मात्र भ्रमाचा असे भोपळा, मायें रचिला छान. ॥ ध्रु० ॥

महतत्व रे अहंकार मन पंचमहाभूतें,
वृक्षाची लोंबती अंकुरें अनंत शाखावान. १

क्षणोक्षणी तो नवता पावे विधविध रंगी छान,
क्षणभंगुर त्या म्हणती अवघे जन अश्वत्थ सुजाण. २

लय उत्पत्तिहि नित्यच चाले अव्यय म्हणेल कोण?
गळति अंकुरें नवीन फुटती न कळत याला मान. ३

या वृक्षाचे करिति वेद ते छंदयुक्त गुणगान,
अनित्य तरुचें मर्म जाणती वेदमूर्ति विद्वान. ४

गीता अ० १५ श्लोक २ (गज़ल)

या पहा ब्रह्माण्डवृक्षा नाम ज्या अश्वत्थ रे,
रिक्त देव्हाराच तो बघ नाहिं त्यामधिं राम रे! ॥ध्रु०॥

मूळ तें अज्ञान अवधें प्रकृतिचें त्या खोड रे,
रे पहा त्यातून फुटलीं प्राणियांची अंकुरें. १

भेद ते नर मादि अवघे विषयभारें लाधले,
गुणरजाचें मनुजफाटे मनुजलोकीं पसरले. २

कर्मजाळामधि मनुज ते अेकमेकीं गुंतले,
भोग सरतां नष्ट होती नविन जन्मा घातले. ३

पसरती दुष्कर्म शाखा फुंकता वारा तम,
वासनावेली मघूनी जन्मतात नराधम. ४

भ्रष्ट नर पशुपक्षि होती जीवजंतु कोणिही,
व्याघ्र वृश्चिक सर्प होती गवत माती दगडही, ५

सत्वगुण वादळ सुटें सद्वासना अंकुर फुटे,
बुद्धि ज्ञान विवेक फाटे शमदमासम धाकुटे. ६

धर्म व्रत तप वेदपठनहि शास्त्रविद्या डाहळ्या,
उपरतीची लाल शाखा ज्ञानवैराग्यहि मुळ्या. ७
रविशशी ग्रहमंडळें तीं पितर ऋषि विद्याधर,
वरुण इंद्र मरुत् फळें तीं लोंबती रे सुरवर. ८
वरि तपस्वी ज्ञानि ते बध ऋषभ कश्यप मुनिवर,
वृक्ष फलभारेंच या रे लवत राहि निरंतर. ९
ब्रह्मशिवलोकास त्या गेल्याच फांद्या कांहि त्या,
नाहिं त्यावरि जीव मुळिंही ब्रह्म ब्रह्मच ब्रह्म रे ! १०

गीता अ० १५ श्लोक ३

( चाल :–ते रूप पाहूं चला. )

संभ्रमि कां पडलासी ? बापा,
वृक्ष दिसे हा अगाध तुजला,
म्हणुनि काय भ्यालासी ? ॥ ध्रु० ॥

अज्ञानच मुळि मूळ जयाचें,
अनित्य आहे रूप तयाचें,
लोक पिंजरे हे मायेचे,
मिथ्या मानी यासी. १

ज्ञानद्युमणि तो होता उदित,
तोच तरूचा मानी अंत,
भ्रांतिमुळें रे हा जीवाप्रत,
भासतसे अविनाशी. २

अभावरूपी संसृति तरुला,
आदि मध्य नी अंत कोठला ?

अरे तयाला विलंब कसला,
निर्मूलन करण्यासी ? ३

दृढ निश्चयें ज्ञान खड्गानें,
विवेक बुद्धि नि वैराग्यानें,
अद्वैताच्वा त्या ओजानें,
छेदी भववृक्षासी. ४

गीता अ० १५ श्लोक ४

( राग :–काफी, त्रिताल. )

पाही आत्मस्वरूपा पार्था,
द्वैत पटल तें सारुनि अवघें
पाही आत्मस्वरूपा. ॥ धृ० ॥

येणें ना जेथुनि माघारी
परम पदा त्या शोधी अंतरीं
विसरूनि नामा रूपा. १

ज्यास्तव त्यजुनी संसाराला
मुमुक्षु जन जाती विजनाला
करावया जपतपा. २

स्वर्गब्रह्मशिवलोकलालसा
ज्ञानाचा अभिमानहि खासा
सारुनि या विक्षेपा. ३

ज्याच्यामधुनी सकल पुराणी
प्रसूत झाली प्रवृत्ति मानी
शरण जाइ भवबापा ! ४

गीता अ० १५, श्लोक ५ व ६

( चाल :–असे पती देवचि ललनांना. )

जिंकुनी मोह संगदोषा असति जे पूर्ण निर्मानी
मुक्त जे कामनामधुनी नित्य अध्यात्मि रंगोनी ॥ धृ० ॥

त्यजुनि सुखदुःख द्वंद्वाना जाति जेथें महाज्ञानी
तेचि मम अव्ययपद मानी तेचि मम अव्ययपद मानी. १

जयातें सूर्य दिपवीना चंद्रही दिपविना अग्नि
जिथें जाता न जन्म पुन्हा परम मम धाम तें मानी. २

गीता अ० १५ श्लोक ७ ते ९

( चाल :–परम कृपाळू ईश्वरा. )

अंशच माझा जीव तो
आकर्षी तो मना प्रकृतिला
आणि इंद्रियांनाहि तो ॥ धृ० ॥

वायु जसा ने पुष्पपरागा
जीव सांडिता शरीरसंगा
नेत निजसवें मनेन्द्रियें गा
अन्य शरीरीं जात तो. १

कर्ण चक्षु रसना स्पर्शाचा
होउनि शास्ता घ्राण मनाचा
विषय सेविता नित्यच साचा
अज्ञ जना तो भासतो. २

गीता अ० १५ श्लोक १० व ११

## अभंग

जीव आला जीव गेला, जीव भोगी विषयांना. १
जीव आहे गुणान्वीत, अज्ञ असे मानीतात. २
ज्ञानी मानीती सर्वथा, जीवात्म्यासी रे अकर्ता. ३
जीव दिसे भोक्ता देहीं, तैसा नसे तो कदाही. ४
देहा उत्पत्ति विलय, जीव अविनाशी अव्यय. ५
असे मानिती जे जन, तेची आत्मज्ञानी जाण. ६
योगी रत साधनेंत, मज बघती स्वचित्तांत. ७
असंस्कारी अविचारी, दुरात्म्यासी न दिसे हरि. ८
शास्त्रनिपुण ते असोत, परी वैराग्याविन व्यर्थ. ९
असो विवेकी ती वाणी, विषयचिंतन अंतःकरणीं. १०
घरीं पूजो अनेक ग्रंथ, परी अहंकारी चित्त. ११
घेवो कोटयावधी जन्म, कधि न लाभे आत्माराम. १२

गीता अ० १५ श्लोक १२ ते १४

(चाल :– मधुरा बिंबाधरा.)

रे, माझें तेज तें. ॥ धृ० ॥

विलसे जें रविचंद्राग्नींत
ग्रहनक्षत्रीं तें. १

आदित्यांतिल मम तेजानें
जगत हें भासतें. २

मीच होउनी भूमीगत रे,
धारि सकल भूतें. ३

चंद्रम्यांत मी वसुनि पोषितो,
औषध वेलीतें. ४
प्राणियांत वैश्वानर होउनि
अन्न चतुर्विध तें ५
प्राणापानसमानयुक्त रे
पचवी मी सुमते. ६

गीता. १५ श्लोक १४

## विशेषगीत. ( ओवी )

मीच वैश्वानर होऊनी, प्राणियांच्या देहीं वसुनी
प्राणापाना समानोनी, अन्न सेवी चतुर्विध.

गीता अ० १५ श्लोक १५

( चाल:– उगवे पहा प्रभात )

सर्वांतरयामी, मीच रे,
सकल जिवांची स्मृतिही मीच
विस्मृति ती ही मी. ॥ धृ० ॥
मीच विषय त्या वेदसंहितीं,
मला वर्णिता पार न येती,
'नेति नेति' ते म्हणती अंतीं,
वेदवेद्य तो मी. १
वे दां ता चें सा र ग्र ह ण,
त्यांचा ज्ञाता ज्ञेय ज्ञान,
आत्मसुखहि तें मी रे मान,
आत्मज्ञानहि मी. २
स्थूल सूक्ष्म रे सकल पदार्थ
चराचरा मी केलें व्याप्त,
कांहि न मजविन ब्रम्हाण्डांत,
निरुपाधिक परि मी. ३

गीता अ० १५ श्लोक १६

क्षरपुरुष वर्णन:– ( चाल:–निजरूपीं जगदाकृति भासा )

दोन पुरुष असती या लोकीं
क्षराक्षर नामेंच विलोकी. ।। धृ० ।।

लघुगुरुही गतिमानहि स्थिर जो
मन बुद्धीनें गम्य असे जो
पंचतत्वयुत नामरूपि जो
त्रिगुणांकित तो 'क्षर' वदती कीं. १

दिसे सकल जी माया सृष्टि,
जिला लागली लय उत्पत्ति
असत्य अज्ञानच ती भ्रांति,
जगप्रकृति अश्वत्थहि 'क्षर' कीं. २

सकल चराचरिं जो साकार,
चैतन्यचि जें नाम तया 'क्षर',
प्रतिबिंबच तें असतें मात्र,
बिंब तयाहुनि आगळेंच कीं. ३

आत्मा तो भ्रांतींत राहुनी,
सुखदुःख मना घे लावोनी,
आणि अहंता ममता दोन्ही
निजपरभावा कल्पितसे कीं. ४

मात पिता स्त्री संतति माझी,
म्हणत बिचारा होई राजी,
खपे जन्मभरि त्यांच्या काजीं,
विपुल तया संपत्ति हवी कीं. ५

आत्मस्वरूपा गेला भुलुनी,
भ्रमत राहि तो संसारातुनि,
देहधारि संसारि होउनी,
अशा जिवा 'क्षर पुरुष' म्हणा कीं. ६

अक्षरपुरूष वर्णन. (राग :–पिलु)

रे 'अक्षर' म्हणा तयाला. ॥ धृ० ॥

मातिहि नाहीं, मूर्तिहि नाहीं,
लोंदा तो मधला. १

पाणी नाहीं तरंग नाहीं
शुष्क तडागाला. २

भासहि नाहीं बोधहि नाहीं,
मधल्या ज्ञान दशेला. ३

मायेसह संबंध जयाचा,
अैशा चैतन्याला. ४

शुद्ध ज्ञान विपरीत ज्ञानविन,
मधल्या अज्ञानाला. ५

वृक्ष जाउनी फलामयीं त्या,
बीज भाव जो आला. ६

ज्यातुनि होई लय उत्पत्ति,
उपाधींत अज्ञानी रुतती,
नित्य अशा पुरुषाला. ७

भवोपाधि ती यास लागली,
ब्रम्हस्थिति याहुनी वेगळी,
अश्वत्थाच्या मूळाला. ८

जगीं जिवाला तत्कार्यांना,
व्यवहाराला कारण झाला,
ज्ञानाविन ना नाश जयाला,
'अक्षर' म्हणा तयाला. ९

गीता अ० १५, श्लोक १७ ते १९

(राग :—बागेसरी, त्रिताल.)

उत्तम पुरुष त्याहुनी भिन्न,
परमात्मा नामें जगिं मान्य. ॥ धृ० ॥

त्रयलोकीं ज्याचें अधिपत्य,
धारणपोषण करितो नित्य. १

स्वामी अव्यय ईश्वर साचा,
प्रभु दयाळु त्राता सकलांचा. २

क्षराक्षराहुनि जो अत्युत्तम,
लोक वेद म्हणती पुरुषोत्तम. ३

जाणति जे रे हें मन्नाम,
भजती ज्ञानी मज निष्काम. ४

भासें जग मग मिथ्याभास,
भेदभाव मनिं नुरला ज्यास. ५

मम भजनीं रममाण सदाही,
मजविन त्यास रुचेना कांहीं. ६

तयास मी श्रीहरि पुरुषोत्तम,
देई मत्पदिं चिरसुखधाम. ७

## विशेष गीत.

मुनिजन मन रंजन, करा हो पुरुषोत्तम दर्शन.
करा नमन नमन, मनोरम पुरुषोत्तमदर्शन ॥ धृ० ॥

अज्ञानाचें जया वावडें,
ज्ञानाच्याही जें पलीकडे,
क्षराक्षराच्याहूनि आगळे,
निरजन निर्गुण, करा हो. १

द्वैताद्वैतहि नाहीं ज्यांत,
असें नसेंचा होई अंत,
संसाराची फिटते भ्रांत,
त्रिविधतापहरण, करा हो. २

दृष्यादृष्यहि विलीन झाले,
ज्ञान लोपलें ब्रम्हहि नुरलें,
अशा दशेला नांव कोठलें ?
नामरूपहीन, करा हो. ३

नादाला जे देई नाद,
स्वादालाही देई स्वाद,
ब्रह्मानंदा ब्रह्मानंद,
चिदानंद चिद्घन, करा हो. ४

पूर्णत्वाचा पूर्ण विराम,
पुरुषांमध्यें तो पुरुषोत्तम,
विश्रामाचाही विश्राम,
जगत आदिकारण, करा हो. ५

लय उत्पत्तिहि होते ज्यातुन,
पावे ना परि तें परिवर्तन,
प्रकृतिपुरुषाहुनि जें भिन्न,
सकललोकजीवन. करा हो. ६

गीता अ० १५ श्लोक २०

सांगितले पार्था, तुला मी गुह्य शास्त्र शांत,
ब्रह्मज्ञानयुत, माझिया भगवद्गीतेंत. ॥ धृ० ॥
मुनिव्यासें, निज ज्ञानकरांनीं मथिलें नवनीत. १
वाहे ही ज्ञानामृतगंगा व्हा रे व्हा स्नात. २
मंथुनि विचार क्षीरसागरा झाली श्री प्राप्त. ३
माझी ही खरि वाङमयमूर्ति माझें गुणगीत ४
भवबंधनमुक्तीचा मानी महामंत्र ज्ञात. ५
गीतागानें होत सज्जना सकलसौख्य प्राप्त. ६

## भजन.

**गोपाल कृष्ण, राधाकृष्ण.**

इतिश्री गीतज्ञानेश्वरीचा पुरुषोत्तमयोग नामें पंधरावा अध्याय समाप्त.

ॐ तत्सत्ब्रह्मार्पणमस्तु.

# अध्याय १६ वा

## दैवासुरसंपद्विभागयोग.

### गुरुस्तवन

(रागः– ललित दादरा.)

सद्गुरु प्रसन्न झाला कीं कीं ज्ञानरवि उदेला,
अज्ञान तिमिर गेला भ्रम सकल दूर झाला. ॥ धृ० ॥

भ्रममूलक जगताचा तो भास नष्ट झाला,
तो ज्ञान द्युमणि खुलवी अद्वैतरूपि कमला. १

मग जीवपक्षि त्यजुनी देहाभिमानमाळा,
संचार करित व्योमीं आनंदमग्न झाला. २

कीं कमलवासनेंत अलिजीव गुंतलेला,
त्या द्युमणि उदयकालीं तो पूर्ण मुक्त झाला. ३

स्थित जीव ईशभेदी नदिच्याहि दो तिरांना
निशि जे वियोगदुःखी धुंडित परस्परांना ४

रे, बुद्धिज्ञानरूपीं त्या चक्रवाकयुगला
मीलन प्रभातिं होतां आनंद मोद झाला. ५

रविराजगुरु दुरावी त्या भेद तस्कराला,
निःशंक योगि धरि त्या आत्मानुभव पथाला. ६

सद्गुरु स्वयंप्रकाशित त्या ज्ञानभास्कराला,
निवृत्ति ज्ञानदेवा करु सकल वंदनाला. ७

पोहे सुदामजी मी भावें प्रभू तुम्हाला,
अर्पितसे करुनि घ्या ही गोड गीतमाला. ८

## प्रास्तवीक गीत.

( चाल:--पायीं हळु हळु चाला सारखी. )

पुरुषोत्तमदर्शन, होइ ना आत्मज्ञानाविन. ॥ धृ० ॥
तीच ज्ञानप्राप्ति, करुनि दे दैवी संपत्ति, १
निजज्ञाना मारी, तीच रे संपत्तिच असुरी, २
द्वय संपत्तींचें, निरूपण ऐकुनि घे साचें. ३
दोहींचे घर्षण, म्हणावें तें मानवि जीवन ४
जीवन रणांगणीं, पांडव कौरव चमु मानी, ५
सामोरे झाले, सामना करावयास भले. ६
रक्षक श्रीकृष्ण, जिंकिती पांडव–दैविगुण. ७

गीता अ० १६ श्लोक १ ते ३

(राग :– भैरव, त्रिताल.)

धन्य तेचि जगतीं, महात्मे, धन्य तेचि जगतीं,
सर्वस्वाला मला वाहुनी मलाच जे भजती. ॥ धृ० ॥

अभय सत्वसंशुद्धि चित्तीं,
ज्ञानयोगिं ज्या व्यवस्थित मति,
यज्ञ दान तप स्वाघ्यायिं रति,
तप आर्जव मूर्ति–महात्मे. १

सत्य अहिंसामय तें जीवन,
राग लोभ तो कुणावरी न,
त्याग शांति मनि तसें अपैशुन,
नाहि भेदनीति–महात्मे. २

भूतदया अंतरीं सदाही,
विलासांत लोलुपता नाहीं,
वर्तन मृदु नवनीताहुनिही,
चराचरीं प्रीति–महात्मे. ३

हरिभक्तीचें तेज विलसतें,
क्षमा प्रियतमा गमें जयातें,
सदा धैर्य अंतरांत रमतें,
ते मंगलमूर्ति–महात्मे. ४

निरभिमान झाले अद्रोही,
दास तयांचा मी रे होई,
ज्यांच्यापाशीं असे सदा ही,
दैवी संपत्ति–महात्मे. ५

गीता अ० १६ श्लोक ४

## अभंग

करवि निश्चित नरकप्राप्ति, तीच असुरी रे संपत्ति. १
तिचे सहा महादोष, जणू काळकूट विष. २
हेंचि चांडाळ मंडळ, करी कात्यान तात्काळ. ३
त्यांचा दंभ तो नायक, बढवि पुण्याचे ढोलक. ४
होतां मान विद्या प्राप्त, नारी स्तुति धन वित्त. ५

करी जना जो उन्मत्त, तोचि दर्प मानी सत्य. ६
करी जीवा ईश्वर द्रोही, प्रभु नामही ना साही. ७
म्हणे जाळा त्या वेदांना, आग लागो त्या धर्माला. ८
टाका देवाला गिळून, म्हणे तोची रे अभिमान. ९
ज्ञान ऐश्वर्य अन्याचें, जया बघवेना तें साचें. १०
तिळपापड हो अंगाचा, तोची पुतळा रे क्रोधाचा. ११
जया सर्पासम मन, दृष्टि जणू अग्निबाण. १२
असे वृश्चिकदंशी वाणी, आणि करवती करणी. १३
वर्तन कठोर अधम, तया पारुष्य हें नाम. १४
पापपुण्य खिचडी करुन, खाती खुशाल स्वादाविन. १५
नाहीं विवेक बुद्धि ज्यास, अंध अज्ञानी ते खास. १६
दंभ दर्प नी अभिमान, क्रोध पारुष्य अज्ञान, १७
सहा दोष ज्या अंतरीं, रौरवाचे ते अधिकारी १८

गीता अ० १६ श्लोक ५ व ६

(चाल :—दे हाता या शरणांगता.)

लोकीं दैवी असुरी जन वसती सदा ॥ धृ० ॥

मोक्षदा दैवि संपदा,
बांधिते असुरि त्या मदां,
भोगवि सकल आपदा,
शोक न करि अर्जुना जन्म तुझा दैवी कुलिं मानदा. १

गीता अ० १६ श्लोक ७ ते १५

( चाल :—रे हिंद बांधवा. )

ज्या सद्वृत्तीची नसे चाड ती माणसेंच कां तीं ?
ज्या असत्य भ्रष्टाचारि अमंगल मनिं असुरी वृत्ति ॥धृ०॥

जग असत्य ईश्वरविहिन,
त्या काम करी उत्पन्न,
जीवांस सकल सामान्य,
व्यभिचारि नराधम ईश्वरद्रोही वृथाच बडबडती. १

करिताती कर्मे क्रूर,
सकलांशीं धरिती वैर,
वागती मनस्वी स्वैर,
ते जगताचा परिपात कराया अवतरती जगतीं. २

कामांध दुष्ट आचरणीं,
मदमत्त दंभि अभिमानी,
मोहाला ते बळि पडुनी,
नित लोका हानीपीडाकारक कर्मे आचरती. ३

करिताति जन्मभरि चिंता,
मरणोत्तरचीही चिंता,
स्त्रीविना अन्य ना वार्ता,
ते रमणींशीं रमण्यांत धन्यता मानुनिया घेती. ४

किती आशा त्यांची तीव्र,
कामांध क्रोधि ते फार,
सुखभोगास्तव अनिवार,
रे निशिदिनि कुटिलहि प्रपंच करुनी धनसंचय करिती. ५

अम्हि विपुल धनाचे स्वामी,
मिळवूच अजुनिही लक्ष्मी,
परधनास शोषू आम्ही,
त्यां इन्द्रासनही थिटें गमे अशि हाव तयांची ती. ६

अरिमर्दन आम्ही करुन,
होणार महा बलवान,
अम्हि ईश्वर सुखसंपन्न,
हो आम्हासम आम्हीच जगीं या करिती आत्मस्तुति. ७

ते कुबेर ब्रम्हा विष्णु,
हो समोर अमुच्या दीन !
करू आम्ही नाना यज्ञ,
त्या नाच तमाशीं रंगू आम्हिच जल्पति मूढमति. ८

गीता अ० १६, श्लोक १६ ते १७

( चालः—रुद्राम आवाहन सारखी )

अर्जुना सांगतो तुजसि गुज कीं,
असुरियांची गती अंक लोकीं ॥ धृ० ॥

करिति निज संस्तुति,
मानधनमद अति,
दंभयुत विधिविहिन यज्ञप्रिय कीं. १

घेति आहेर ते
देति बलि पशुसि ते
यज्ञ नाटक रचुनि कीर्तिस्तव कीं. २

विषयलंपट अति
मोहवश दुर्मति
करुनि पापें किती जाति नरकीं. ३

गीता अ० १६, श्लोक १८ ते २४

( चालः— देखो यारों अजब तमाशा )

अहंकार बल दर्प कामही क्रोधाच्या घडल्या मूर्ति,
द्वेष करिति ते माझा तैसा साधूंचाही मनी अति. ॥ धृ० ॥

पीडा देती आत्मारामा जारणमारण करुनि किती,
मद्यमांसयुत तीर्थप्रसादा सेवुनि कृतकृत्यच होती. १

साधुद्वेषि ते क्रूर नराधम संसारीं त्यां अधोगति,
खगयोनि वा पशुयोनि वा सर्पयोनि वा घडि घडि ती. २

तमोयोनि ती भयंकर अती प्राप्त करिति ते जन अंतीं
माझें दर्शन कधीं न त्यांना प्राक्तनिं त्यांच्या अधोगति. ३

कामक्रोध नी लोभ असति हे तीन द्वार रौरवाप्रति
हानिरूप हे त्रिदोषमंडळ त्यजिती त्यां लाभे मुक्ति. ४

मुक्ति लाभतां या त्रिकुटीतुनि कौंतेया ते जन जगतीं,
चतुर्विधहि पुरुषार्थ साधुनी पावताति उत्तमा गति. ५

कामी जे विधि शास्त्र सोडुनि निषिद्ध कर्मे आचरती.
पावती न ते सिद्धि सुखहि वा गति उत्तम त्यां कधीं न ती. ६

कार्याकार्यां व्यवस्थितीला शास्त्रप्रमाण म्हणुनि म्हणती,
समजुनि तीं शास्त्रोक्तच कर्मे करणें मनुजा उचित किती ! ७

इतिश्री गीतज्ञानेश्वरीचा दैवासुरसंपद्विभागयोग नामें सोळावा अध्याय समाप्त.

ॐ तत्सत्ब्रम्हार्पणमस्तु.

# अध्याय १७ वा

## श्रद्धात्रयविभागयोग

### गुरुस्तवन.

(चाल :-सुख साधना भजनागणा.)

गुरुराज रे, गणराज रे,
स्मरणें तुझ्या, जयलाभ रे ॥ धृ० ॥
मारी हर, त्रिपुरासुर,
स्मरुनी तुला, आधीं बरें,

मूढांस तूं, वक्रमुख,
ज्ञात्या परी, सूधाच रे. १

तूं रे जया, होसी सखा,
माया तया, त्यजि सत्वरें,
गुरुराजया, नमुनी तुला,
द्वैतास कां, आणू बरें ? २

गुणवर्णनीं, धरि मौन मी,
तेंचीं तुझें, वर्णन खरें,
तनु प्राण हे, तुज अर्पुन
विनवी अतां, भव हा पुरे ! ३

गीता अ० १७, श्लोक १

अर्जुन वदेः—

## साकी

शास्त्र नेणती परि जे तुजला श्रद्धेनें भजती,
त्यांची निष्ठा सात्विक राजस, तामस वा कोणती ?

गीता अ० १७, श्लोक २ ते ७

श्रीभगवानवदे :—

## ( साकी )

शास्त्रमार्ग तो दुर्गम आहे असें काय म्हणसी ?
त्रिविध असे ती श्रद्धा पार्था जाणुनि घेइ कशी. १

मानव जैसा सात्विक राजस तामस वा होई,
श्रद्धा त्याची तशीच तो रे त्रिविध रूप घेई. २

श्रद्धा लाभे गतसंस्कारें श्रद्धामय पुरुष,
जैसी ज्याची श्रद्धा होई तैसा तो खास. ३

सात्विक देवा पूजिति राजस यक्षराक्षसांस,
तामस श्रद्धावान पूजिती भूतखेतांस. ४

शास्त्रहीन जन पंडीतांचें वर्तन अनुसरून,
श्रद्धानावीं भवसिंधूतुन जाती रे तरुन. ५

दंभाहंकारानें युक्तच कामी रागि अति,
पाखंडी जन शास्त्रविरोधी अखंड तप करिती. ६

कष्टविती ते निज जीवाला अन्य जनांच्याही,
असुर लोक ते मानी निश्चित पीडिति मजलाही. ७

नांव नको घेणें पाप्यांचें तोंडहि न दिसावें,
दिसतां तें मन्नाम घेउनी पापमुक्त व्हावें. ८

म्हणुनी बापा सात्विकांची संगत बरि नित्य,
सात्विक कर्में तदाच घडती मानी हें सत्य. ९

आहाराचे यज्ञतपाचे भेदहि दानाचे,
अतां सांगतो तुला अर्जुना ओघानें साचे. १०

सात्विक श्रद्धा व्हाया आहे हितकर हें ज्ञान,
म्हणुनि अर्जुना प्रसन्न होउनि सांगति भगवान. ११

गीता अ० १७, श्लोक ८ ते २२

## साकी त्रिविध आहार

आयु सत्व बल आरोग्य सुख प्रीतिस देणार,
रसमय स्निग्धहि मोददायकहि सात्विक आहार. १

कटु अंबट खारटहि तिखट तो रुक्ष ऊष्ण फार,
दुःखरोगवर्धक दाहक अति राजस आहार. २

अर्धपक्व रसहीन शिळा दुर्गन्धयुक्त फार,
उष्टा तो अपवित्र मलिनही तामस आहार. ३

## त्रिविध यज्ञ

कर्तव्यास्तव फलेच्छेविना करिती जो यज्ञ,
शास्त्रयुक्त त्या म्हणती सात्विक सकल लोक सूज्ञ. १

वांच्छा राही ज्यांत फलाची अवडंबर तेंही,
यज्ञा अैशा म्हणती राजस सकल लोक पाही. २

शास्त्रविहिन अन्नदानविहिनहि मंत्रतंत्रविहिन,
श्रद्धाहिन दक्षिणाविहिनही तो तामस यज्ञ. ३

## त्रिविध तप

देव द्विज गुरु पंडित पूजन नम्रभाव शुचित,
ब्रम्हचर्य तें अहिंसा जयीं कायिक तप ज्ञात. १

कोणाचेंही मन दुखवीना खलु हितकर वाणी,
वेदाभ्यासा करणें तेची वाङमय तप मानी. २

प्रसन्न मन सौजन्य मौन तें आत्मविनिग्रहही,
अंतःकरणहि शुद्ध मानसिक तप तें रे भाई. ३

त्रिविध तप असें फलेच्छेविना युक्तचित्त करुनी,
श्रद्धापूर्वक करणें तेची सात्विक तप मानी. ४

सत्कारास्तव मानपुजेस्तव दांभिक होऊनी,
चंचल अस्थिर तप करणें तें राजस तप मानी. ५

मूढ दुराग्रहि होउनि पीडा देउनि शरिरास,
अन्य जनांच्या नाशा योजित तामस तप खास. ६

## त्रिविध दान

कर्तव्यच तें मानुनि करणें निरपेक्षी असुन,
देशकालपात्राला देखुन तें सात्विक दान. १

परत फेडिची आशा करुनी फलेच्छेस धरुन,
सक्ताईनें करणें त्याला म्हण राजस दान, २

देश काल पात्रा नच बघतां करणें जें दान,
सत्काराविन तुच्छबुद्धिनें तें तामस दान. ३

गीता अ० १७ श्लोक २३ ते २६

## अभंग

आधीं अनामी तें ब्रह्म, 'ॐ तत् सत्' पावे नाम. १
तयें ब्रह्माण्ड रचियेलें, ब्राह्मणातें निर्मीयेले. २
द्विजां देउनि वेदज्ञान, सांगे 'करा तदाचरण'! ३
तयां निर्वाहास्तव मग, म्हणे 'करा यज्ञयाग. ४

मग अपार ते लोक, निर्मी ब्रह्मदेव देख. ५
दिलीं द्विजां तीहीं भुवनें, जहागिरी ब्रह्मदेवानें. ६
ॐ तत् सत् उपयुक्तता, त्याची अैका ती व्यवस्था. ७
करा यज्ञ तप दान, ॐ आरंभी म्हणून. ८
तयें तुटे कर्मबंधन, तेंची मोक्षाचें कारण. ९
कर्मयोगी मुमुक्षु जन, 'तत्' नाम उच्चारून. १०
फलाशेला ते त्यजीती, यज्ञ दान तपा करितीं. ११
'इदं न मम' म्हणती, कर्म देवा समर्पीती. १२
द्वैतभाव घालविण्या, 'सत्' शब्दाची योजना. १३
कर्म केलें ब्रह्मार्पण, बुजो तीही आठवण. १४
'सत्' नाम त्याजसाठीं, कर्मयोगी योजीताती. १५
जरी असें कर्मीं न्यून, सत् नाम काढी भरून. १६

गीता अ० १७, श्लोक २७ व २८.

## ( साकी )

यज्ञ दान तप स्थिरतेलाही 'सत्' असे म्हणती,
त्यासाठीं जीं कर्में घडती त्यांसहि 'सत्' उक्ती १

'ॐ तत्सत्' या मंत्रें कर्में ब्रह्मार्पण करुनी,
ब्रम्हरूप जन होती श्रद्धा मंत्री राखोनी. २

अश्रद्धेनें यज्ञदान तप जें केलें जातें,
असत् म्हणति त्या इह परलोकीं नाहीं श्रेयस तें. ३

कोट्यावधि अश्वमेध होवो ॐतत्सत्वीन,
नाहीं त्यांचें पुण्य अल्पही व्यर्थंच तें हवन. ४

वसुधेला जरि रत्नें भरुनी दिधली रे दान,
ॐतत्सत्विन मोल तियेचें मानी रे शून्य. ५

अेका पायीं उभे राहुनी लाखो वर्षेही.
केलें मोठें तप मंत्राविन व्यर्थच तें जाई. ६

महामंत्रि या श्रद्धा राखुनि कर्मे करि बा रे,
वदति श्रीहरि त्रितापहारी कृष्ण अर्जुना रे. ७

संग्रामाचा इकडे चाले मोठा व्यापार,
बाण माप घेण्यास मापुनी रक्ता तैयार. ८

अशा प्रसंगीं अर्जुन डोले आत्मानंदांत,
भगवंतच ज्या बोध देति तो माना कृतकृत्य. ९

ॐ तत् सत् इति मंत्र जपानें होउ कर्ममुक्त,
कृष्ण कृष्ण जय बोला डोला भजनानंदांत. १०

इतिश्री गीतज्ञानेश्वरीचा श्रद्धात्रयविभागयोग नामें सतरावा अध्याय समाप्त.

ॐ तत्सत्ब्रह्मार्पणमस्तु

गीतज्ञानेश्वरी

# अध्याय १८ वा

## मोक्षसंन्यासयोग

### गुरुस्तवन

( राग :–दुर्गा, त्रिताल. )

प्रभु कसा स्तवु मी तुला,
तव वेड जडलें मला. ॥ ध्रु० ॥

वससी मम हृदयांत,
नाहिं मुळीं आपणांत द्वैत,
मानु कसा तुज वेगळा. १

वर्णवाया शक्ति नाहिं देवा,
करवुनी घेइ तूच सेवा,
जीव पदीं लीन जाहला. २

गुणातीत खरा गुरुराय,
ज्ञानमूर्तीच अवर्णनीय,
मौन बरें स्तवण्या तुला. ३

निष्क्रीयता हीच माझी पूजा,
अलिप्तता ध्यान गुरुराजा,
मज साथी तूच अेकला. ४

## प्रास्तविक ओव्या

( चाल :—वास घेरे तान्ह्या बाळा. )

रत्नखचित देवालय, गीताग्रंथ महाकाय,
अठरावा अध्याय, त्याचा कलश हा होय,
अर्थचिंतामणीयुक्त, तेजस्वी तो प्रकाशीत,
ऐका या अध्यायांत, असें सकल गीताशास्त्र.
रत्नखचित देवालय ! १

देवालय असें भलें, त्याचे पंधरा मजले,
सोळावा अध्याय साचा, घुमटाच्या आकाराचा,
सतराव्या अध्यायाची, बैठक ती कलशाची,
अठरावा अध्याय, भव्य कलश हा होय,
त्यावरी मुनी व्यासें, गीताध्वज चढवीलासे,
रत्नखचित देवालय ! २

दिव्य हें देवालय, रची व्यास देवराय,
याचीया गाभाऱ्यांत, प्रेम शांति श्री नांदत,
करा नामसंकीर्तन, विश्वरूपाचें दर्शन,
कोणीही सुखें घ्यावा, देवालयीं या विसावा,
प्रपंच विसरावा, पांडुरंग आळवावा,
नमूनी ज्ञानदेवा, गीताप्रसाद सेवावा,
रत्नखचित देवालय ! ३

गीता अ० १८ श्लोक १

अर्जुन वदे :— ( साकी )

संन्यासाचें तत्व जाणण्या उत्सुक मी बा रे,
त्यागाचाही पृथक अर्थ तो कथि हृषिकेशा रे. १

गीता अ० १८ श्लोक २ ते ४

**श्रीभगवान वदे:—** (साकी)

यज्ञयाग धर्मार्थ बांधणें कूप धर्मशाळा,
परोपकारी कर्मे करणें त्यजुनि कामनेला १
धरुनि कामना धर्म करी तो फोल मानि खास,
काम्यकर्मन्यासाला म्हणती पंडित संन्यास. २
संध्या पूजा वैश्वदेवहीं नित्याची कर्मे
श्राद्ध पर्वणी यात्रा अैशी नैमित्तिक कर्मे. ३
कर्मे अैसी रे नित्याचीं नैमित्तिकही तीं,
फलाशेविना करणे त्याला त्याग असें म्हणती. ४
कोणी म्हणती सर्वच कर्मे त्यागावी बा रे,
फलत्यागा ते करू न शकती म्हणुनि वल्गना रे. ५
यज्ञ दान तप कधीं न त्यजणें जरी क्लेश त्यांत,
सात्विककर्मी परिश्रम कधीं वाया नच जात. ६
भूक लागतां उत्तम रुचकर अन्न जेवणें रे,
पाकसिद्धिचे श्रम केल्याविन सांग कसें बा रे ? ७
कोणी त्यागा कर्मे कोणी फल त्यागा म्हणती,
भिन्न भिन्न कर्माविषयीं मतमतांतरें जगतीं. ८
त्यागाविषयीं निश्चित मत मम परिसुनि घे बा रे,
त्यागाचे त्या तीन प्रकारहि जाणुनि घेई त्वरें. ९

गीता अ० १८, श्लोक ५ ते ९

( राग :—काफी. )

कर्म तर कर्मा मारतें,
कंटकास तो कंटक काढी,
तत्व असें सत्य तें. ॥ धृ० ॥

यज्ञ याग तप आदि कर्म तें,
सात्विक वृत्तिस पोषक असतें,
चित्तशुद्धिही तयेंच होते,
कधीं न मुळिं त्यजि तें. १

कर्तृत्वाचा त्यजि अभिमान,
फलेच्छाहि ती दे टाकून,
कर्म करी कर्तव्यच म्हणुन,
कधीं न तें बाधतें. २

नित्य कर्म तें करीत रहावें,
वाट बिकट कां पद कापावे ?
मोहें त्यजिती निज कर्तव्यें,
तामसीच जन ते. ३

कर्म असें तें क्लेशदायक,
म्हणुनि त्यजिति त्यां देहासक्त,
त्यागफळ तयां न मिळे देख,
राजस त्यागी ते. ४

कर्म करी कर्तव्य म्हणूनी,
अभिमान फलाशा टाकूनी,
त्याग तोच तू सात्विक मानी,
कळलें ना सुमते ? ५

गीता अ० १८ श्लोक १० व ११

( राग :–पिलु. )

कर्में काम्य जरी, तयांचा वीट मनीं न धरीं ॥ धृ० ॥

शुद्ध चित्त तो संशयरहित,
कर्मफलास तिलांजलि देत,

होइ खरा तो जीवन्मुक्त,
सत्कर्मेच करी. १

सर्वकर्मफलत्याग असंभव,
तयास जो देहधारि मानव,
कर्मफलांची सोडी हाव,
मुक्ति घेइ पदरीं. २

गीता अ० १८ श्लोक १२

( रागः– मांड. )

जन्मजन्मांतरीं, भोग कां चुकले कोणातरी ? ॥ ध्रु० ॥

इष्टानिष्ट मिश्र फलांनीं
फिरुनी अवतरतो या अवनीं
देव, मनुज कृमि कीटक होउनि,
प्राणी मरणोत्तरी, सदा जो सकाम कर्म करी. १

कर्मांतुनि तें फल उद्भवतें,
फलातुनी त्या कर्म उपजतें,
कर्मचक्र तें घुमत राहतें,
मुक्ति तयाला वरी, त्यागि जो फलाशा न मनिं धरीं. २

गीता अ० १८, श्लोक १३.
( राग :– दरबारी कानडा. )

आत्मा मुक्तचि रे, मान तु ॥ ध्रु० ॥
पंच कारणें कर्म घडें तें,
सांख्यमत पहा हेंच सांगतें,

जाणति कर्म मर्म जे जन ते,
बंधन त्यासि नुरे. १

## विशेष गीत

( चाल :–क्षण आला भाग्याचा–सारखी )

बोध सांगतां अर्जुनाप्रति
प्रेमरंगि रंगले श्रीपति,
देवाचेंही भान हरपलें,
अर्जुनास आलिंगन दिधलें. ॥ ध्रु० ॥

आनंदी आनंद जाहला,
प्रेमसागरीं अर्जुन न्हाला,
तो साक्षात् सुखरूपचि झाला,
फार आवडे श्रीरंगाला. १

विनवी अर्जुन भगवंताला,
' करूं नको मज अतां वेगळा,
सहन होइ ना मज भिन्नपण,
हरी हरुनि घे मम अर्जुनपण ' २

देव बोलले, ' पार्था राया !
घालवुनी अपल्या द्वैता या,
करू सांग कोणावरि माया,
उकलु कुठें रे, या मम हृदया ?' ३

अर्जुन बोले हे यदुराया,
' मर्जी तूझी तसा राखि या,
असु दे दीनावरि परि माया ! '
राहो मन्मति लीन चरणि या !' ४

गीता अ० १८ श्लोक १४

## अभंग.

देह हेची अधिष्ठान, कर्म घडायातें जाण. १
जीव तोची मानी कर्ता, 'देह मीच', मानी वृथा. २
निजरूपा तो विसरला, जीव नामातें पावला. ३
अवध्याची देहक्रिया, 'मीच करी' भ्रम तया. ४
आला कर्त्याचा आरोप, जीवावरी आपोआप. ५
होतीं दाहीही इन्द्रियें, कर्मा कारणची स्वयें. ६
भिन्न वायूंचे व्यापार, कर्म घडवीती साचार. ७
सकल इंद्रियें दैवतें, होतीं कर्मा कारणि भूत. ८
यांत आत्मा काय करी ? पार्था विचारति श्रीहरि. ९

गीता अ० १८ श्लोक १५

( चाल :–तू माझा यजमान. )

कर्माची कारणें, तीच तू कर्म हेतु जाणि रे ॥ ध्रु० ॥

देह झिजे तो देहासाठीं,
जीव राबतो जीवासाठीं,
इन्द्रियेंहि निज सौख्यासाठीं,
अन्य हेतु नाहिं रे. १

असोत कर्में विधिसर न्यायीं,
किंवा असोत तीं अन्यायी,
कर्म नाम त्या असती सदाही,
पंच हेतु मोखरे. २

गीता अ० १८ श्लोक १६

( राग :–दरबारी कानडा, त्रिताल. )

अकर्ताच असूनी, आत्मा,
कर्ता घे मानुनी,
आणि गळ्यामधिं घे ओढोनी,
कर्माचीं लोढणीं. ॥ धृ० ॥

नलिकेवरिच्या शुकासारखा
बंधन भ्रमिं भ्रमुनी,
पंच हेतु ते पंचकारणें,
कर्माची असुनी,
घे ना ध्यानिमनीं. २

गीता अ० १८ श्लोक १७

(चाल :–प्रीतिचा भिकारी आला.)

अहंकार घालवुनी जो ब्रह्मरूप झाला,
देहभाव टाकुनि अवघा कर्ममुक्त झाला. ॥ धृ० ॥

आत्मज्ञानि होउनि दुरि जो घालवी भ्रमाला,
बंधनांत राहील मग तो सांग ना कशाला ? १

वधुनि टाकिलें जरि त्यानें अखिलही जगाला.
अहंभाव नसतां त्याचा दोष तो कुणाला ? २

' अकर्ताच आत्मा ' झालें ज्ञान हें जयाला,
करुनि सकल कर्मेंही तो त्याहुनी निराळा. ३

गीता अ० १८ श्लोक १८ व १९

## अभंग

ज्ञाता तोचि जीव ज्ञेय विषय सर्व,
द्वया अेकजीव करि ज्ञान. १
विषयांच्याकडे घेई जीव धाव.
कर्माचा उद्भव तयांतून. २
जीव मग कर्ता इंद्रियें कारण,
कर्मं विषय जाण होती बापा. ३
कर्मसंग्रहाचें विषयची मूळ,
जीव खेळे खेळ तयांशींच. ४
आत्मा तो अलिप्त अकर्ताच मानी,
सर्वस्वी त्यजुनी अहंभाव. ५
ज्ञान कर्म कर्ता गुण भेद तया,
जाण धनंजया सांख्यमतें. ६

गीता अ० १८, श्लोक २०.

( चाल :—तें रूप पाहूं चला. )

तें सात्त्विक ज्ञान अर्जुना,
तें सात्त्विक ज्ञान. ॥ धृ० ॥

ज्ञाता ज्ञेय ज्ञान तिन्ही हे होती जयिं विलिन.
सकल चराचरिं मीच श्रीहरि राहे व्यापून. १
बोध असा नित देइ मनाला करी स्वयंपूर्ण,
शिवापासुनी तृणपर्यन्त नाहीं कुणि भिन्न. २
अखिल विश्व प्रतिबिंबच माझें भेदभाव मुळि न,
मोक्ष लक्ष्मिचें मंदिर उघडें ज्ञात्या त्या जाण. ३

गीता अ० १८ श्लोक २१

( चाल :—भोळानाथ दिगंबर. त्रिताल. )

तें राजस ज्ञान, अर्जुना,
अखिलहि भूतें भिन्न भिन्न तीं घेई मानून ॥ धृ० ॥

आत्मज्ञान सुंदर देवालय, मोहभ्रान्तिचें निर्मुनि वलय,
करुनी टाकी अज्ञानमय, तद्वातावरण. १

अद्वैताला दूरी सारुनी, मूळरूप विसराया लावुनी,
नामरूपादिक भेद निर्मुनी, भुलवि जिवालागुन. २

पडद्यांवरि जरि नाचति भूतें, मानि खरा त्या चित्रपटातें,
विसरुनि जाई सत्य काय तें, भ्रान्तिमयीं पडून. ३

गीता अ० १८ श्लोक २२

( चालः— जळो जळो असे जीवन. )

जळो जळो अवघे ज्ञान रे तामस तें,
ज्ञाना नामा लाजवितें. ॥ धृ० ॥

मत्त होउनी वर्ते साचें,
लाज टाकुनी नग्नचि नाचें,
वावडे तया श्रुति शास्त्राचें,
सदाच विषयीं रत असतें. १

सेव्यासेव्या कांहि न पाही,
निंद्यानिंद्यहि विचार नाहीं,
स्त्रीसंगाची अति आवडही,
स्त्रीविन चैन न मुळि पडते. २

गीता अ० १८ श्लोक २४

( चालः– येई गा तु येई गा तु. )

अहंकार नाहीं ज्यांत राग द्वेष कांहीं,
कर्म सात्विक तें ज्यांत नाहिं कामनाही. ॥ धृ० ॥

नित्य नैमित्तिक जें जें कर्म घडे भाई,
' ॐ तत्सत् ' मंत्रें यदा ब्रम्हार्पण होई. १

उपकार बुद्धि ज्यांत दयादृष्टि राही,
कर्म सात्विक तें ज्यांत नाहिं कामना ही. २

गीता अ० १८ श्लोक २४

( चालः– येई गा तु. )

कर्म राजस तें ज्यांत खटाटोप फार,
कामना जयांत विचरे खुशाल ती स्वैर. ॥ धृ० ॥

विलसतो तयांतून सदा अहंकार,
अल्पशाहि लाभासाठीं पोखरे डोंगर. १

दृष्ट फलाशेवरि राही स्वार्थ ज्यांत मात्र,
नको तो कराया करी भलता व्यापार. २

गीता अ० १८ श्लोक २५

**अभंग**

तामस कर्माची लक्षणें ती अैक,
सदा अविवेक तयामाजीं. १

होतसे सर्वांना अपायकारक,
निपजवी दुःख पर्यायीं तें. २

स्वभावेंच कर्म तामस हिंसक,
मोहाचें प्रतीक मान तया. ३

श्रम त्यांत फार सामर्थ्याबाहेर,
फलाचा विचार नाहीं मुळीं ४

गीता अ० १८, श्लोक २६

( रागः—माड. )

कर्म करी तो, जरि परि न धरी अहंकार अंतरीं,
धैर्यानें अनहंकारानें कर्म सदा तो करी. ॥ धृ० ॥

परोपकारीं शरिर झिजवितो स्मरत अंतरीं हरि,
सिद्धि मिळो वा न मिळो त्याची खंत मुळीं ना धरी. १

निज कर्तव्या जागृत राहुनि कर्में जीं जीं करी.
'ॐ तत्सत्' इति मंत्रें सकलहि ब्रह्मार्पण तो करी. २

सात्विक कर्ता तयास म्हणती साऱ्या जगदांतरीं.
वर्णन त्याचें करतां करतां रंगताति श्रीहरि. ३

गीता अ० १८, श्लोक २७

( चालः— शांतवाया मानसा. )

जो विलासी सारस, स्वार्थसाधू राजस. ॥ धृ० ॥

रागि रमणीभक्त तो
कामनाआधीन तो
द्रव्यलोभी कंजुष, स्वार्थसाधू राजस. १

नीच कर्मी गुंततो
नीच योनित जन्मतो,
सर्प, मुंगुस, वायस, स्वार्थसाधू राजस. २

गीता अ० १८ श्लोक २८

( रागः– बहार, त्रिताल. )

तो कर्ता तामसी. ॥ धृ० ॥

इन्द्रियांस ज्ञो अति लाडवितो,
मूर्खांचा बाजार भरी तो
साधूंशीं छलकपट करी तो
वृत्ति राक्षसी. १

सदा खिन्न मन असें जयाचें,
दीर्घसूत्रि मदमत्सरि साचें,
नांव न घे ज्ञो कधि देवाचें,
पापी आळशी. २

गीता अ० १८, श्लोक २९

( साकी )

बुद्धि धृतीचे त्रिगुणयुक्त ते भेद सांगतो आतां,
वेगवेगळे सकलहि तुजला उणें न कांहीं करिता.
अैके धनंजया, लक्ष लावुनी सखया. १

गीता अ० १८, श्लोक ३०

( चालः– तोच चंद्रमा नभांत. )

बुद्धि सात्विकीच तें, कर्म मर्म जाणते,
उचित कर्म कोणतें, नीच कर्म काय तें ॥ धृ० ॥

काम्य कर्म सर्व तें, आणि कर्म अधम तें,
भिउनि दूर टाकिते, पुण्यकर्म वेचिते. १

शास्त्र नियम पाळिते, सत्य तेचि सेविते,
राजहंसि वृत्तितें, निर्णयांत राखिते. २
बंधनास तोडिते, मुक्तिमार्ग शोधिते,
अँसि बुद्धि लाभते, ज्यांस, धन्य धन्य ते! ३

गीता अ० १८, श्लोक ३१

( राग :– मांड )

बुद्धि राजस मान, पार्था,
चंचल अलीसमान ।। धृ० ।।
कमल सेविणें, काष्ठ चावणें, उभयहि अलिस समान. १
धर्माधर्म, कर्माकर्म, नाहीं त्याचें भान. २

गीता अ० १८, श्लोक ३२

अभंग.

अधर्म तो धर्म असत्य तें सत्य,
अनर्थ तो अर्थ वाटे जीस. १
अश्राव्य श्रवण अवाच्य वचन,
निषिद्ध वर्तन करवी जी. २
स्वर्गतुल्य मानी रौरव नरकाला,
सुस्ति आळसाला कुलदैवत. ३
सख्या अर्जुना रे, बुद्धि तामसी ती,
विपरीत रीती तीची सदा. ४

गीता अ० १८, श्लोक ३३ ते ३५

सात्विकधृति. ( अभंग )

राखी इन्द्रिया साचार, विषयांच्याहूनी दूर १
जयें इंद्रियें राहती, मनाचीये स्वाधीन तीं. २

मन बुद्धीच्या स्वाधीन, सदा करी हरिचिंतन. ३
तीच धृति सात्विक जाण, करी जीवन कृष्णार्पण. ४

### राजसधृति, ( अभंग )

राजस, धैर्य तें देहभाव दृढावतें. १
धर्म अर्थ कामासक्त, रत स्वर्ग संसारांत. २
पुत्र धन लाभासाठीं, करी अचाट कर्में तीं. ३
कामनांचें तें माहेर, करी जीवना साचार. ४
तेंचि धैर्य रे राजस, नाहीं जीवा शांति लेश. ५

### तामसधृति. ( अभंग ).

तीच धृति रे तामस, नीच गुणांची जी रास. १
आळसाचें घोर घर, आणि निद्रेचें माहेर. २
पापफळयुक्त झाड, करी देहाचेच लाड. ३
भय शोक विषाद चित्तीं, सदा सर्वदा नांदती. ४
युवावस्था मदमत्त, प्रिय तीयेसी अत्यंत. ५
अैशा धृतीच्या लक्षणा, सांगति श्रीरंग अर्जुना. ६

गीता अ० १८, श्लोक ३८ ते ३९—त्रिविध सुख.

### सात्विक सुख. अभंग १

करी जीव शिव अैक्य, तेंची खरें सुख देख. १
सुख नाहीं तेही शुद्ध, तयाचेही तीन भेद. २
ध्यान भजन सेवादिक, करी स्वाध्याय सात्विक. ३
सदा अभ्यासीं रमतें, करी दुःखांता प्राप्त तें. ४

### अभंग २

आरंभीं जें विषसम, परिणामीं अमृतोपम. १
सुख सात्विक तें साधनीं, कष्ट अपार होती मानी. २

प्रीति देहावरिल त्यागी, धरुनि वैराग्यातें अंगीं. ३
सोडितांना विषयघर, दुःख होतसे अपार. ४
सहन करणें आधीं दुःख, तदा लाभे सात्विक सुख. ५
शंभु प्याले हलाहल, दिधलें अमृत सोज्वल. ६
द्राक्षें आधीं तीं अंबर, परिपक्व होतां मिष्ट. ७
ज्ञानें वैराग्य जें पाके, निवताती सकल दुःखें. ८
बुद्धि होई रूपीं स्थिर, लाभे सात्विक सुखभंडार. ९
कष्टी वैराग्य ज्या मूळ, आत्मानंद प्राप्ति फळ. १०

## राजस सुख. ( अभंग )

लाभे विषयांच्यापासुन, तेंची राजस सुख तू मान. १
आधीं लागतें मधुर, अंती दुःख दे अपार. २
बोले आधीं गोड ठग, कापी गळाच तो मग. ३
वेश्या लुटुनी घेई धन, करी दरिद्रिनारायण. ४
आधीं गोड मग कडु, राजस सुख महाद्वाड. ५

## तामस सुख

(चालः— देखो भाई अजब तमाशा.)

अभक्ष्य भक्षण अपेय पान स्त्रीसंगातुन जें निपजें,
अन्याचें धन लुटुनी लाभें तें सुख तामस जाणिजे ॥ ध्रु० ॥

निद्रा आळस प्रमादातुनी तामस सुख पावें जन्म,
खरें पाहतां दुःखचि तें रे, सुख त्याला मिथ्या नाम. १

आरंभीं जें अंतींही जें चित्ताला मोहुनि टाकी,
जीवाला निःसत्व करी तें कांहीं राखी ना बाकी. २

गीता अ० १८ श्लोक ४०

( राग :–बहार त्रिताल )

नाहीं रे नाहीं रे, नाहीं रे ॥धृ०॥

प्रकृतिच्या या तीन गुणांतुनी
मुक्त अेकही वस्तु त्रिभुवनीं,
माया टाकि गुणें व्यापूनी
चराचर पाहि रे. १

देवाचे ही भेद पाडिते,
ब्रह्मा विष्णु महेश वध ते
तीन लोक त्रिगुणामुळेंच ते
देतो ग्वाहि रे. २

गीता अ० १८ श्लोक ४१

( चाल :–आधीं बीज अेकलें. )

जन्में मनुज भले
गुणकर्मयोगें भिन्न जाहले. ॥धृ०॥

ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शुद्र ते
स्वभावेंच वेगळे,
परि अंतीं मनुज भले,
भिन्न परि अंतीं मनुज भले. १

गीता अ० १८ श्लोक ४२

अभंग

बुद्धि आत्मरूपीं लीन, तीची जाण शमगुण. १
राखी इन्द्रियें स्वाधीन, तीची जाण दमगुण. २

नित्य ईश्वरचिंतन, तेंची तपाचें लक्षण. ३
मन सद्भावें परिप्लुत, देह सत्कर्में मंडित. ४
अंतर्बाह्य पवित्रता, तीच खरी रे शुचिता. ५
सहन करिते सकल दुःख, तिचें नाम क्षान्ति देख. ६
पीडादात्यावरी प्रेम, तया आर्जव हें नाम. ७
शास्त्रशुद्ध आचरण, ईशप्राप्तीचें साधन. ८
ऐसें कळे योगें जया, तेची ज्ञान धनंजया. ९
ईश सर्व शक्तिमान, करी निश्चित विज्ञान. १०
शास्त्रमार्गातें धरून, करी सदा सदाचरण. ११
पाळी धर्म आदरानें, तेंची आस्तिक्य मी म्हणे. १२
ऐसे नवगुणें मंडित, तेची ब्राम्हण पंडित, १३
शम दम तप शौच, क्षान्ति आर्जवरूपच, १४
ज्ञान विज्ञान आस्तिक्य, ब्रह्मकर्म स्वाभाविक. १५
नवगुण रत्नहार, मिरवीती द्विज साचार. १६
तेची माझे मायबाप, धरी त्यांचे मी ते पाय. १७
काय वर्णू त्यांची थोरी, त्यांचे चरण माझ्या उरीं. १८

गीता अ० १८ श्लोक ४३

## अभंग

क्षत्रिय तो शूर, ज्याच्या मनगटांत जोर. १
रणांगणीं लढताना, परावरी विसंबेना. २
तया गुणांचें तें तेज, दिपवीतें जगा सहज. ३
आणिबाणीच्या प्रसंगीं सदा धैर्य अंतरगीं. ४
क्रिया मंगल सर्वथा, करी राखून दक्षता. ५
असामान्य पराक्रम, तोची क्षत्रियाचा धर्म. ६
करी शत्रुला सपाट, कधीं दावीना तो पाठ, ७

क्षत्रिय तो सदा दानी दक्ष सदा प्रजापालनीं. ८
राखोनीया स्वामीभाव, मानी तया स्वकर्तव्य. ९
अैसा नक्षत्रांनी सात, क्षत्रिय तो आलंकृत. १०

गीता अ० १८ श्लोक ४४

( चाल :—लोटु नको मज दूर )

कृषिसंवर्धन धेनुपालन,
वाणिज्यहि तें धन संपादन,
वैश्यकर्म स्वाभाविक जाण. ॥नृ०॥

परिचर्यात्मक कर्म स्वभावें,
शुद्र, करितसे विनम्र भावें,
विठु वेडाचें ध्यान स्मरून
हिणवु नका शुद्रा अवमानुन,
त्यांच्या ठायीं मी नारायण,
वंदनीय चोख्याचें चरण. १

गीता अ० १८ श्लोक ४५

अभंग

निज कर्तव्यें करावीं, तयें संसिद्धि मिळवावी. १
अैसा देवमनोभाव, करा सर्व स्वकर्तव्य. २
तोच माना देवपूजा, अन्य कर्म तें वाणिज्य. ३
राहुनीया कर्मरत, करा वैराग्यातें प्राप्त. ४
माळ घाली मोक्षलक्ष्मी, ब्रह्माण्डाचे स्वामी तुम्ही. ५

गीता १८ श्लोक ४६

अभंग

अज्ञानाच्या लक्तरांचा, जीव पुतळा मानी साचा. १
तीन गुणांच्या सूत्रांनीं, देव नाचवि माया रचुनी. २

निज कर्मांनी अनुदिन, पूजावा तो नारायण. ३
होई प्रसन्न तो तदा, देई वैराग्यप्रसादा. ४
लागे श्रीहरीचा छंद, वमन वाटे भवबंध. ५
स्वकर्माचें आचरण, करी साधाया कल्याण. ६

गीता अ० १८ श्लोक ४७

( चाल :–जगीं धर्मविना धिक् जीवन रे. )

निज धर्म सदा श्रेयस्कर रे
वैगुण्य तयांत असें जरि रे ॥धृ०॥
धर्म परांचा सुलभ असू दे
आपणास तो त्याज्यचि रे. १
जाति स्वभावें नियत कर्म तें
करी सदा तो मुक्तचि रे. २
पाप तयाला कधीं शिवे ना,
पुण्यवंत तो धन्यचि रे. ३

गीता अ० १८ श्लोक ४८

( चाल :–कुलक्षयांत कुल धर्म नाश रे )

रहा नित्य निजकर्मे करित, त्यजू नको जरि दोष तयांत ॥धृ०॥
अग्नी जेथें धुम्र तिथेंही, दोषमुक्त मुळि कर्मचि नाहीं. १
सकलांनीं निजकर्म करावें, श्रमास भिउनी कधि न त्यजावें. २
भवरोगातुनि मुक्तिस्तव रे, दिव्य औषधी स्वकर्म कीं रे. ३

गीता अ० १८ श्लोक ४२

( चालः–उद्धवा शांतवन कर जा. )

संसार बंधनातीत, संसारावरि नच प्रीत. ॥ धृ० ॥
गृह दार पुत्र निज दुहिता, टाकिली तयांची ममता,
मुक्त बुद्धि विषयातून, ती आत्मचिंतनीं लीन.

तत्कर्मभोग ते सरती
लोपते अहं मम वृत्ति,
नवकर्म बंधनें तुटती
लाभतां गुरुकृपा त्यांत, नैष्कर्म्य सिद्धि हो प्राप्त. १

ती सिद्धि लाभली ज्यासी, तो खरा कर्मसंन्यासी,
जो संसारांत उदासी, तो खरा कर्मसंन्यासी,
अज्ञानहि नाहीं ज्ञान,
ज्ञेयही नसें ज्ञाता न,
नैष्कर्म्यसिद्धि ती जाण.
तो सकल क्रियांचा अंत, परमसिद्धि ती विख्यात. २

गीता अ० १८ श्लोक ५०

( चाल:-पतितपावन नाम ऐकुनी. )

परमसिद्धि नैष्कर्म्य सिद्धि ती ज्ञान परम सीमा,
ब्रह्मदशेप्रत यथावकाशें नेई जीवात्म्या ॥ ध्रु० ॥
वैराग्यानें गुरुकृपेनें विवेकबुद्धीनें,
ब्रह्म सत्य भ्रम अन्य सकल तें कळे आत्मज्ञानें १

गीता अ० १८ श्लोक ५१ ते ५३

( वृत्त साकी, राग:- कलिंगडा )

आधि बुद्धिमल धुवुनी टाकी विवेकतीर्थानें,
द्वैत टाकुनी आत्मचिंतनीं निमग्न मति करणें. ॥ ध्रु० ॥
वृत्ति निरोधें विषयांचा लय करि रे धैर्यानें,
दशेन्द्रियांना विषयवासना त्यागाया लावणें. १
विषयातुनि ते रागद्वेष मग गळूनीया जाती,
आत्मलक्षि मग जाउनि बैसे गिरिं गुहिं एकांतीं. २

विजनिं राहुनी मौन सेवुनी गुरुबोधा चिंती,
मिताहारि होउनी जिभेला लावी नच चट ती. ३

अल्पाहारें आळस त्यजि तो निद्रेलाहि अति,
चित्त आणि इन्द्रियें सकलही राखी अंकुशि तीं. ४

शरीरवाणी मन निज अवघें ध्यानीं तो लावी,
ध्याता ध्यान नि ध्येय त्रिपुटि ही आत्मरूपि विरवि. ५

मुमुक्षु मग तो योगाभ्यासें ध्यान करी स्थीर,
वैराग्यें सम साध्य करी तो आत्मलाभ थोर. ६

वैराग्याचें वज्र कवच तें अंगीं तो धारी,
राजयोगाश्वावरि बैसे मग त्याची स्वारी. ७

विवेकरूपीं मूठ जयातें ध्यान खड्ग हातीं,
संसाराच्या रणांगणीं मग कसली त्या भीति ? ८

अहंकार बल दर्प काम तो क्रोध परिग्रहही.
शत्रूंना या मारुनि विमुक्ति विजयश्री लाही. ९

विजय मिळवुनी राजेश्वर तो टाकुनी दे भाले,
निर्मम होउनि शांत मनें तो ब्रह्मपथीं चाले. १०

दैवि संपदा भेट देति ते मांडलीक राजे,
अमानित्वादि परिवारासह सम्राटच साजे ! ११

विवेकरूपी चोपदार तो ज्ञान छडीधारी,
राजपदीं सम्राटापुढती मारी ललकारी. १२

मारी ललकारी सारी त्या द्वैतातें सारी,
जागृतादि त्या तीन अवस्था वरिताति चवरी. १३

ऋद्धिसिद्धिचे थवेची थवे पुष्पवृष्टि करिती,
त्यावरुनी पुरुषार्थहि चारी ओवाळिति आरती. १४

अद्वैताच्या पडति मग शिरीं मंगलाक्षता त्या,
आनंदाच्या नौबति झडती विश्वीं सकलहि त्या. १५

लग्न लागलें ब्रह्मदशा मग होइ पट्टराणी,
राजा राणी भेद निमाला कोणी ना कोणी. १६

भाग्यवंत तो त्या सम नाहीं त्रिभुवनांत कोणी,
झाला त्याचा जन्म सफल तो वंदनीय ज्ञानी. १७

गीता अ० १८ श्लोक ५४

( राग:- शंकरा बहार )

ब्रह्मभूत जो ज्ञानी होतो, सदाच तो सुप्रसन्न असतो ।।धृ०।।
आकांक्षास तिलांजलि देतो, शोक तयाला मुळि न शिवे तो १
भेदभाव तत् विलया जातो, चराचरीं तो मला पाहतो. २
पराभक्ति मम साध्य करी तो, मद्रूपी तो विलीन होतो. ३
मद्भजनीं तल्लीन राहतो, आनंदीआनंद लुटे तो. ४

गीता अ० १८ श्लोक ५५

( चाल : लागू द्या विठूचा छंद )

मग उभारुनी बाह्या, गर्जना करिती यदुराया. ।।धृ०।।
अरे कर्मयोगि भक्त, माझा जीव प्राण सत्य. १
सत्य सत्य सत्य, सांगतो त्रिवार हें सत्य. २
वाणी गोविंद, तयाची क्रियाहि गोविंद. ३
भक्ताचें मौन, अर्जुना माझें तें स्तवन. ४
तो जें जें पाही, तें तें मी होउनि राही. ५
पडदा मायेचा, सरला दूर अतां अमुचा. ६

अंतर अंतरलें, त्याच्या माझ्या रे, मधलें. ७
तो मी मी तोच, नाहीं अन्य भाव साच. ८
कर्म नव्हें पूजा, मानी त्याची कपिविध्वजा. ९

विशेषगीत १ अभंग (राग:—मांड.)

जलांत तरंग कर्पुरि परिमल,
तेज तें विमल रत्नांतील. १

पटीं जसे तंतू माति ती घटांत,
अभिन्न तयांत नाहीं द्वंद्व. २

भक्त आणि मीही तैसेची अभिन्न,
होतां आत्मज्ञान नाचे भक्त. ३

संसारांत जें जें दिसे सर्व काहीं,
तें तें मीच पाही भक्त माझा. ४

विशेषगीत २ (चाल :— उद्धवा सांतवन करजा)

मी अजन्म निर्जर साच, अक्षर अविनाशी मीच ॥ धृ० ॥
मी अच्युत अचल अपार, अद्वितीय विश्वाधार,
मी अनादि अभयहि अमर, आनंदमयहि अनिवार,
मी निराकार साकार, मी सर्वव्यापि साचार,
रे घ्राणरहित तो मीच,
रे कर्णरहित तो मीच,
रे वाणिरहित तो मीच,
रे चक्षुरहित तो मीच, पुरुषोत्तम मी तो साच. १

रे नामरहित तो मीच, रे गोतरहित तो मीच.,
जाणे मज अैसा साच, तो माझा भक्त खराच,
अहंभाव विरहित साच, तो माझा भक्त खराच,

तो अबोल तरिही बोले,
तज्ज्ञानाज्ञान हरपलें,
जीवित्व शांतिमय झालें,
प्रति ब्रह्मानंदहि तोच, मज लागे त्याचा ध्यास. २

मग सौख्य होइ सौख्याला, अन् लाभ होई लाभाला,
भेटतें तेज तेजाला, विश्रामहि विश्रामाला,
विस्मय तो विस्मयिं विरला, ही अनुभूती ये त्याला,
रे, कर्मयोगि जो झाला,
अर्पुनिया सर्वस्वाला,
पावला मजसि ऐक्याला,
मायेचा करुनि विनाश, करि मज अपुलासा साच. ३

गीता अ० १८ श्लोक ५६ व ५७

( राग:– सोहनी, त्रिताल )

( चाल:– जल भरण्या चल जाऊ. )

भाव राखि मजवरी, मनुज जो, कर्म मदार्पण करी. ॥ धृ० ॥
सत्कर्मांनीं मला पूजुन,
ज्ञानप्रसादा घे मागून,
भक्त होई मम तोचि अनन्य, माझा आश्रय धरीं. १
चित्तमनानें कर्म समर्पुन,
माझ्या ठायीं बुद्धि गोवुन,
माझ्यांतचि होउनि तल्लीन, मज अपुलासा करी. २

गीता अ० १८ श्लोक ५८

( चाल:–जाऊ चल विजनांत. )

चित्त मला दे पाहू, पार्था. ॥ धृ० ॥
जन्म मृत्युभय हरेल ऐसा,

गोड गोड आत्मज्ञानाचा,
देइन तुज मी खाऊ. १

जीवभाव तव विलया जाइल,
मिथ्या तुजला मग भासेळ,
संसाराचा बाऊ. २

करि न अवज्ञा उन्मादानें
लागतील वा तुला साहणें
घाव भवाचे भाऊ ३

गीता अ० १८ श्लोक ५९ व ६०

(राग :–बागेसरी.)

अहंकार तो व्यर्थ चित्तीं न आण
धरणार नाहीं करीं चापबाण
स्वगोतासी मारावया; "कां म्हणून
वृथा वल्गना या ? धरी नित्य मौन.
तुझी रे तुला प्रकृति मूळ जाण
लढायास लावील कां आनमान ?
स्वभावेंच तें कर्म अवघें बरें न
न वांछी करावयास मोहा धरून
होवोनिया प्रकृतिला अधीन
करीशील संग्राम तू सत्य मान.

गीता अ० १८ श्लोक ६१

(राग :– बागेसरी–दादरा.)

ईश सकल हृदयिं वसुनि भ्रमवि सकल जीवा,
मायेच्या यंत्रावरि भ्रमवितसे सर्वां. ॥धृ०॥

सूत बांधि सूतातें, गवत गवतभारातें
जीव गोंवि जीवातें, सृजुनि देहभावा, १
टाकुनि दे अहंकार, युद्धाला हो तयार
करि प्रहार या अरिवर, घेउनि मम नांवा. २

गीता अ० १८ श्लोक ६२ ते ६४

( राग :– ललत भैरव मिश्र )

शरण जाई अच्युता, सर्व भावें भारता. ॥धृ०॥
नाम रूप जात गोत, नाहिं त्यांत कांहि अर्थ
घालवीना जन्म व्यर्थ, आळवी रे त्या अनंता. १
तत्प्रसादें परम शांति, जीवनीं या घे कशी ती,
आणि अंतीं पाव मुक्ति, परमधामा शाश्वता. २
गौप्य अवघें तुजसि कथिलें, हृदय उकलुनि दाविलें,
सांगणें कांहींच नुरलें, वाग समजुनि निज हिता. ३
परम प्रिय तू मजसि म्हणुनी, गुह्यतम वच या मुखातुनि,
चित्त देउनि अैक फिरुनि, बोल अंतिम मम अतां
' शरण जाई अच्युता '. ४

गीता अ० १८ श्लोक ६५

अभंग.

मन राहू दे माझ्यांत, होइ माझाच तू भक्त. १
करी माझ्याच पूजना, आणि मलाच वंदना, २
मग मी तुझाच तूझाच, तुझी आण घेतो साच,
मानुनीं घे, वचन सत्य, भक्त मज प्रिय अत्यंत. ४
वाणी क्रिया मानसास, करी अर्पण मलाच. ५

दुरी सारूनी द्वैतास, होइ माझाच माझाच. ६
मीच भक्तांच्या काजास, धारि मनुजावतारास. ७
विसरोनी देवपणास, होइ दासांचा मी दास. ८

गीता अ० १८ श्लोक ६६

अनेक धर्म पंथ रे, वाद मतमतांरें
माजलें जगांत या, मूळ अविद्याच रे. ॥धृ०॥

त्यजुनि भेदभाव सर्व, पाहि मला अेकमेव
धर्मभेद व्यर्थ व्यर्थ, गुंति ना तयांत रे, १
जीवभाव टाकुनी, स्वरूपिं लीन होइ तू
भिन्न भाव जधि नुरे, शरणागति तीच रे. २
शरण आलियावरी, पाश तुटते सत्वरी
पाप मुक्त मी करी, शोक करु नको बरें. ३
अद्वितीय मी असा, जाण तू मला कसा,
आत्मज्ञान हें खरें, पापपुण्य जाळि रे. ४
त्यागी रे सर्व धर्म नाहि त्यांत सार रे,
शरण ये मला त्वरें, पापमुक्त होइ रे, ५
बोलतां असें भलें देव पार्थ भेटले,
द्वैतभ्रमा खंडिलें, स्वरूप त्यास तें दिलें. ६
अर्जुन आनंदला, कृष्णरूपिं रंगला,
भजन करू लागला, कृष्ण कृष्ण कृष्ण रे. ७

## भजन.

कृष्ण कृष्ण कृष्ण रे, कृष्ण कृष्ण कृष्ण रे.

## विशेष गीत.

( राग :- आसावरी त्रिताल )

सर्व धर्म त्यजुनी पार्था, ॥धृ०॥
मज एका सर्वस्व मानुनी
येई शरण झणी,
करिन तुला मी पापविमोचन
किन्तु न धरि स्वमनीं. १

धर्मांची त्या चढते धुंदी
नको लागु तू त्याच्या नादी
नको घालवू अवधि त्यामधीं
रत हो हरिभजनीं. २

गीता अ० १८ श्लोक ६७

राग :-भैरवी.

सांगु नकोस तया, पार्था, ॥धृ०॥
गीतारूपीं तुझ्या माझ्या
गुजगोष्टी सखया, १

तपोहीन जो मलिनमानसी
नाहीं भक्ति जया. २

श्रवणेच्छा ती नाही त्याला
बोधच हा वाया ! ३

ज्या मनिं निंदा द्वेष अंतरीं
नाहिं दया माया
सांगु नकोस तया. ४

## गीता अ० १८ श्लोक ६८ ते ७२

( चाल:— लागू द्या विठूचा छंद. )

या गीतांचा ध्वनी, जाउ दे सकलाच्या श्रवणीं. १
पडतां तो कानीं, तरनि जातील पशुप्राणी. २
गा गीता गाणीं, अैकवा रसिकालागूनी. ३
भक्ती ही साची, माना अत्युत्तम प्रभुची. ४
गाउन अैकून, करा निज जीवन पावन. ५
याच जन्मिं साची, भेट घ्या प्रेमें श्रीहरिची. ६
गाउनि ही गाणीं, आळवी श्रीहरि जो कोणी. ७
रसिकांच्या नयनीं, आसवें प्रेमाचीं आणी. ८
डोलवितो त्यांना, भावें गाउनी गीतांना. ९
अंगीं रोमांच, त्यांचिया उभे करी साच. १०
त्या सम प्रिय भक्त, नाहीं कोणी त्रिजगांत. ११
तनमन लावून, संवादाचें अध्ययन. १२
करि जो प्रेमानें, पूजितो प्रभूस ज्ञानयज्ञें १३
करि जो श्रद्धेनें, श्रवण या गीतांचें सुमनें. १४
तोहि मुक्त होई, सुखानें शुभ लोका जाई. १५
संत तोचि धन्य, तया लाभेल महा पुण्य. १६
अैकुनिया बोधा, गेलि ना तुझी भवबाधा. १७
अज्ञानाचाही, नाश झाला ना लवलाही ? १८
सांग मला सखया, जगद्‌गुरु पुसती कौंतेया. १९

### भजन.

बोला हो बोला, जय जय कृष्ण कृष्ण बोला,
आनंदें डोला, घालवा मायेचा घाला.
बोला हो बोला, विठ्ठल विठ्ठल हरि बोला.

आनंदें डोला, पहा यमराजहि तो भ्याला.
बोला हो बोला, विठ्ठल विठ्ठल हरि बोला.
आनंदें डोला, आपुला करा विठ्ठलाला.

गीता अ० १८, श्लोक ७३

( रागः– ललतभैरव मिश्र. )

अर्जुनवदेः—

मोह पार गेला,
संदेहाचा तिमिर हरपला,
ज्ञानोदय झाला ॥ धृ० ॥

जन्मजन्मांतरीं आपुला,
संबंधच जडलेला,
कृपाप्रसादें तुझ्याच देवा
सकलहि आठवला. १

अर्जुन नच हा कुणी वेगळा,
मना बोध झाला,
जनार्दना हरि तुझाच मी ना,
भेदभाव विरला ! २

मानिन आतां तव वचनाला,
घे मम वचनाला,
करू कसा मी तुझ्या स्तुतीला,
शेष जिथें शिणला. ३

अहंभाव अवघा विरघळला,
आलो शरण तुला,
अनन्यभावें प्रणतवत्सला,
नमितो पदकमला. ४

गीता अ० १८ श्लोक ७४

( चाल :–प्रभातीची. )

**संजय वदे :—**

परिसुनि हरि अर्जुन संवाद, होतो आनंदीआनंद ॥ धृ० ॥
घेतां हरिबोधाचा लाहो, अंगावरि रोमांच उभे हो,
कंठ दाटला कंपहि सुटला, स्वेदहि सर्वांगी पाझरला,
संजय प्रेमद्रवीं विरघळला, धृतराष्ट्राला वदू लागला,
"परिसुनि श्रीहरिमुखिच्या बोला, कृतार्थ माझा जन्म जाहला."
भजनरंगि तो धुंद जाहला, 'कृष्ण कृष्ण जय' म्हणू लागला.

गीता अ० १८ श्लोक ७५

( राग :–भैरवी, दादरा. )

भाग्य उदेले नृपा भाग्य उदेले. ॥ धृ० ॥
अच्युतें स्वयें आत्मज्ञान बोधिलें,
अर्जुनास जें परम गुह्य कथियलें,
व्यासप्रसादें सकल मजसि लाभलें,
रामकृपेनें जसे दगडहि तरले. ॥ १ ॥

गीता अ० १८ श्लोक ७६ व ७७

( राग :–भैरव )

आठवून आठवून अद्भुत संवाद,
केशव कौंतेयाचा होइ मना मोद,
येती आनंदलहरि फिरुनि फिरुनि त्याला,
संजय अति प्रेमभरें सांगतो नृपाला. १

"अद्‌भुत तें विश्वरूप आठवोनि राया,
विस्मय आनंदहि अति होतसे मना या." २

निश्चल परि धृतराष्ट्र पुसत संजयाला,
कोणाचा विजय रणीं होइल वद मजला. ३

गीता अ० १८ श्लोक ७८

( राग:—भैरवी त्रिताल. )

न धरि मनिं संशया, नृपया,
पांडवविजय निश्चित रणि या. ॥ ध्रु० ॥

जेथें योगेश्वर शारङ्गधर,
जिथें धनंजय वीर धनुर्धर,
तिथेंच विजयश्रीमाहेर (मंदिर)
ध्रुव मन्मति राया. १

इतिश्री गीतज्ञानेश्वरीचा मोक्षसंन्यासयोग नामें अठरावा अध्याय समाप्त.

ॐ तत्सत्‌ब्रह्मार्पणमस्तु.

# शुद्धिपत्र.

| पृष्ठांक | पंक्ति | अयोग्य | योग्य |
|---|---|---|---|
| २ | ६ | देत | दंत |
| ९ | १४ | पाप | पापा |
| १६ | १३ | सफल | सकल |
| ३० | ११ | कर्मसांगि | कर्मसंगि |
| ३५ | ५ | चित्त | मना |
| ३८ | ११ | लिप्त | रुतति |
| ४१ | २ | ना मज | मज ना |
| ४५ | १० | मुक्तच | विमुक्त |
| ५४ | ९ | श्रीहरी चरणीं | श्रीहरिच्या चरणीं |
| ७० | ९ | ममैश्वर्ययोगा | मम योगैश्वर्या |
| ७५ | ५ | जेथ | जयें |
| ७९ | १ | घेउनि | संगे |
| ८६ | १ | परधामा | परम धामा |
| ८७ | ४ | दुर्मतिनी | दुर्मती नी |
| ८७ | १४ | नत | तव |
| ९० | ९ | पुरुजनांत | गुरुजनांत |
| ९४ | २ | सकल लोकपाला | सकललोकपाला |
| ९४ | ७ | मरूत | मरुत |
| ९६ | २० | विहगांच्या | विहगाच्या |
| ११८ | ७ | राह तो | राहतो |
| १२६ | ९ | करोनीया | करुनि हृदय |
| १२८ | १५ | अतहंकार | अनहंकार |
| १४१ | ९ | मंगलमूर्ति | मंगलमूर्ते |

| पृष्ठांक | पंक्ति | अयोग्य | योग्य |
|---|---|---|---|
| १४४ | १ | मालकंस | बागेसरी |
| १४४ | १ | भेदभाव | भिन्नभाव |
| १४४ | १४ | योनितुन | योनितुनि |
| १५० | २ | ती | तो |
| १५२ | १ | पुण | गुण |
| १५४ | ५ | विश्व | विश्वि |
| १५६ | १४ | राग दुर्गा | राग शंकरा मिश्र |
| १७१ | १७ | असुरी रे | आसुरि |
| १७२ | १४ | असुरी | आसुरि |
| १९२ | ११ | दृष्ट | दृष्टि |
| १९९ | १५ | मायबाप | बापमाय |
| २०४ | ८ | आकंक्षास | आकांक्षास |
| २०५ | ३ | कपिविध्वजा | कपिध्वजा |
| २०७ | १८ | करावयास | करायास |

**टीप :**—पान १९० वरील तें सात्विक ज्ञान, अर्जुना. या गीतांतील उपांत्य पंक्ति खालीलप्रमाणें आहे.

**असे झालें ज्ञान जयाला तया काय वाण ?**

मराठी ग्रं... संग्रहालय ठाणे
2302
दा. क्र.
22760

REFBK 0022470

REFBK-0022470